अकोला । सोमवार
दि. १४ जुलै २०२५
वर्ष : १९ अंक : १३४
पाने : ८ + ४

दैनिक
# अजिंक्य भारत
बातम्यांचा गतिमान पाठलाग

www.ajinkyabharat.com
स्वागत मूल्य ३ रुपये



ऋषभ पंत सर्वाधिक षटकार ठोकणारा फलंदाज
(पान ७ वर)

## थोडक्यात

### राऊतांना अब्रुनुकसानीची नोटीस देणार-शिरसाट



**पुणे :** शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे नेते संजय राऊत यांनी मंत्री संजय शिरसाट यांचा एक व्हिडीओ सोशल मीडियावर शेअर केल्याने एकच खळबळ उडाली आहे. मात्र राऊत यांनी प्रसारित केलेला तो व्हिडीओ मॉर्फ असल्याचा दावा शिरसाट यांनी केला.यानंतर आता संजय राऊत विरूद्ध संजय शिरसाट वाद समोर आला आहे. संजय राऊत यांना अब्रुनुकसानीची नोटीस बजावण्यात येईल. त्यांनी माफी न मागितल्यास पोलिसांत तक्रार देणार असल्याचा इशारा समाजकल्याण मंत्री संजय शिरसाट यांनी दिला. जिल्हाधिकारी कार्यालय येथे एका बैठकीनिमित्ताने शिरसाट आले असता पत्रकारांशी बोलताना ते म्हणाले. ''विरोधक मला टार्गेट करण्याच्या प्रयत्नात आहेत. त्यांच्या विरोधात खूप पुरावे आहेत, पण आता ते बाहेर काढण्याची इच्छा नाही. पण गरळ ओकली तर विरोधकांना त्यांच्याच भाषेत उत्तर देऊ. राऊत यांना अब्रुनुकसानीची नोटीस बजवणार असून, त्यांनी उत्तर दिले नाही, माफी मागितली नाही तर फौजदारी गुन्हाही दाखल करू' असा इशाराही शिरसाट यांनी दिला.

### लव्ह जिहादच्या आरोपामुळे खळबळ



**लखनऊ:** लखनऊमधील एका अल्पवयीन मुलीनं सासरच्या कुटुंबावर लव्ह जिहादसह अनेक खळबळजनक आरोप केले आहेत. पती मोहम्मद नझील आणि त्याच्या कुटुंबियानी बळजबरीनं बीफ खायला घातलं आणि मारहाण केली. तसेच बलात्कार केल्याचा आरोप अल्पवयीन मुलीनं केला आहे. आरोपींवर कठोर कारवाई कारवाई करावी, अशी मागणी पीडितेनं केली आहे.पीडितेनं म्हटलं की, शाळेत असताना तिची नझीलशी ओळख झाली आणि तेव्हापासून तिच्यावर अत्याचार सुरू आहे. नझीलच्या कुटुंबियांनी अनेकदा मारहाण केली, तसेच बलात्कार करण्याचा प्रयत्न आणि जीवे मारण्याची धमकी दिली, असा आरोप पीडितेनं केला. ४ एप्रिल २०२५ रोजी नझीलनं गळा दाबून जीवे मारण्याचा प्रयत्न केल्याचाही दावा पीडितेनं केला आहे. अल्पवयीन असताना नझीलनं बलात्कार केला आणि माझे नग्न व्हिडीओ काढले, असेही पीडितेनं तक्रारीत म्हटले आहे. व्हिडीओ व्हायरल करण्याची धमकी देत त्याने लग्नासाठी दबाव टाकला. लग्न करण्यापूर्वी मी इस्लाम धर्म स्वीकारावा, अशी बळजबरीही नझीलनं केली, त्यामुळे १८ ऑगस्ट २०२० रोजी इस्लाम धर्म स्वीकारल्याचे पीडितेने सांगितलं.

### दलाई लामा पोहोचले लडाखमध्ये

**लडाख:** तिबेटी धार्मिक नेते दलाई लामा शनिवारी त्यांच्या एक महिन्याच्या वास्तव्यासाठी लडाखला पोहोचले. लेहमधील दमण आणि सुरनाच्या पारंपारिक सुरांवर नाचणाऱ्या अनुयायांनी दलाई लामा यांचे भव्य स्वागत केले.त्यांच्या आगमनासाठी लेह विमानतळापासून जिवेत्सलपर्यंत रस्त्याच्या कडेला त्यांचे चाहते मोठ्या संख्येने जमले होते. त्यांच्याकडे पुष्पगुच्छ होते. त्यांनी धार्मिक नेत्याच्या सन्मानार्थ झेंडेही फडकावले.

# तिरुवल्लूरजवळ रेल्वेला स्फोटामुळे भीषण आग

## वंदे भारत, शताब्दीसह चेन्नईतील अनेक गाड्या रद्द

**तिरुवल्लूर: दि. १३ वृत्तसंस्था**

तामिळनाडूतील तिरुवल्लूर जवळ रविवारी सकाळी एक मोठी दुर्घटना घडली. डिझेलने भरलेल्या मालगाडीला भीषण आग लागल्यामुळे रेल्वे वाहतूक पूर्णपणे विस्कळीत झाली आहे. या आगीत ४ ते १३ टँकर वॅगन्स जळून खाक झाल्याची प्राथमिक माहिती मिळत आहे. सुदैवाने या दुर्घटनेत कोणतीही जीवितहानी झालेली नाही.रविवारी पहाटेच्या सुमारास ही मालगाडी तिरुवल्लूर स्थानकाजवळून जात असताना अचानक एका वॅगनमध्ये आग लागली. ही आग काही वेळातच अन्य डिझेल टँकरपर्यंत पसरली आणि आगीचे लोट व धुराचे





गडद वलय परिसरात पसरले.

अग्निशमन दलाच्या अनेक गाड्या घटनास्थळी दाखल झाल्या असून आग आटोक्यात आणण्याचे प्रयत्न सुरू आहेत.या घटनेमुळे चेन्नई-अरक्कोनम रेल्वेमार्गावरील विद्युत पुरवठा तातडीने बंद करण्यात आला, ज्याचा परिणाम थेट उपनगरी रेल्वे सेवांवर झाला आहे.

दक्षिण रेल्वेच्या अधिकाऱ्यांनी दिलेल्या माहितीनुसार, चेन्नई सेंट्रल येथून सुटणाऱ्या अनेक महत्त्वाच्या गाड्या रद्द किंवा वळवण्यात आल्या आहेत.घटनास्थळी राष्ट्रीय आपत्ती प्रतिसाद दल (), दक्षिण रेल्वेचे अधिकारी, व राज्य अग्निशमन दल तातडीने दाखल झाले आहेत. परिसरातील नागरिकांना सुरक्षित स्थळी हलविण्यात आले असून, आजूबाजूच्या घरी असलेले एलपीजी सिलेंडरही तातडीने हटवण्यात आले आहेत.या आगीची नेमकी कारणमीमांसा (पान २ वर)

## जम्मूत 'शहीद दिना'वर निर्बंध!

**जम्मू काश्मीर दि. १३ वृत्तसंस्था**

जम्मू आणि काश्मीरमध्ये १३ जुलै १९३१ रोजी डोगरा शासक हरि सिंह यांच्या विरोधात निदर्शनादरम्यान, श्रीनगर तुरुंगाबाहेर त्यांच्या सैन्याने केलेल्या गोळीबारात २२ जणांचा मृत्यू झाला. नॅशनल कॉन्फरन्स (एनसी) हा दिवस 'शहीद दिवस' म्हणून साजरा करू इच्छिते परंतु जिल्हा प्रशासनाने कार्यक्रमाला परवानगी दिली नाही. एनसीने त्यांचे अध्यक्ष फारुख अब्दुल्ला आणि इतर वरिष्ठ नेत्यांच्या वतीने नवहट्ट येथील नक्षबंद साहिब स्मशानभूमीत श्रद्धांजली वाहण्याची योजना अर्ज करून व्यक्त केली होती. परंतु श्रीनगरच्या जिल्हा दंडाधिकाऱ्यांनी तो फेटाळून लावला आहे.श्रीनगर पोलिसांनी सोशल मीडियावर एक सार्वजनिक सूचना जारी केली ज्यामध्ये १३ जुलै रोजी ख्वाजा बाजार, नवहट्टाकडे जाणाऱ्या सर्व लोकांना परवानगी देण्यात आलेली नाही. यासोबतच प्रशासनाच्या सूचनांचे पालन करण्याचे आणि कोणत्याही प्रकारचे उल्लंघन टाळण्याचे आवाहन करण्यात आले.

## अमरनाथ यात्रेदरम्यान अपघात एका ताफ्याच्या तीन बसची टक्कर



**जम्मू काश्मीर दि. १३ वृत्तसंस्था**

जम्मू आणि काश्मीरमधील कुलगाम जिल्ह्यातील खुदवानी भागात श्रीनगर-जम्मू राष्ट्रीय महामार्गावर अमरनाथ यात्रेच्या ताफ्याच्या तीन बस एकमेकांवर आदळल्या. या अपघातात १० हून अधिक यात्रेकरू जखमी झाले आहेत.बालटालकडे जाणाऱ्या यात्रेच्या ताफ्याच्या तीन बस एकमेकांवर आदळल्याची घटना ताचलू क्रॉसिंगनजीक झाली आहे. अपघातात जखमी झालेल्या सर्व यात्रेकरूंना तातडीने जवळच्या रुग्णालयात दाखल करण्यात आले आले. कैमोह रुग्णालयातील डॉक्टरांनी माहिती दिली की, सुमारे नऊ यात्रेकरूंना प्राथमिक उपचार दिल्यानंतर अनंतनागमधील सरकारी वैद्यकीय महाविद्यालयात दाखल होण्यास सांगितले आहे. सर्व जखमी यात्रेकरूंच्या दुखापती किरकोळ असून त्यांची प्रकृती स्थिर असल्याचे डॉक्टरांनी माहिती दिली. अपघातातील जखमी प्रवाशांसाठी प्रशासनाने आवश्यक ती सर्व पावले उचलली आहेत आणि त्यांच्या सोयी आणि सुरक्षिततेची खात्री करण्यासाठी सूचना देण्यात आल्या आहेत.

## उज्वल निकम यांची राष्ट्रपती नामनिर्देशित खासदार म्हणून नियुक्ती

**नवी दिल्ली : दि. १३ वृत्तसंस्था**

उज्वल निकम यांची राष्ट्रपती नामनिर्देशित खासदार म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. लोकसभा निवडणूक हरल्यानंतर राज्यसभेत राष्ट्रपती कोट्यातून त्यांची नियुक्ती करण्यात आली आहे.उज्वल निकम यांनी २०२४ लोकसभा निवडणूक लढवली होती. उत्तर मध्य मुंबई मतदारसंघात काँग्रेसच्या मुंबई प्रदेशाध्यक्ष वर्षा गायकवाड यांच्याविरोधात त्यांनी लढवलेली निवडणूक चुरशीची ठरली होती. अखेर वर्षा गायकवाड यांनी निसटती आघाडी घेत उज्वल निकम यांचा पराभव केला होता.

भारताच्या राष्ट्रपतींनी संविधानाच्या कलम ८०(१)() आणि त्याच



कलम (३) द्वारे प्रदान केलेल्या अधिकारांनुसार, प्रसिद्ध सरकारी वकील उज्वल देवराव निकम यांच्याबरोबरच केरळमधील ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते आणि शिक्षणतज्ज्ञ सी. सदानंदन मास्ते, भारताचे माजी परराष्ट्र सचिव हर्षवर्धन श्रृंगला, प्रख्यात इतिहासकार आणि शिक्षणतज्ज्ञ मीनाक्षी जैन यांना नामांकित केले आहे. पूर्वी नामांकित सदस्यांच्या निवृत्तीमुळे निर्माण झालेल्या रिक्त पदांच्या पार्श्वभूमीवर ही नामांकने आली आहेत.

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी भारतीय संविधानाच्या कलम ८० (१) (अ) अन्वये त्यांना दिलेल्या अधिकारांचा वापर करत या चारही व्यक्तींना राज्यसभेवर नामनिर्देशित केले आहे. या कलमानुसार, राष्ट्रपती साहित्य, विज्ञान, कला आणि समाजसेवा या क्षेत्रांमध्ये विशेष ज्ञान किंवा व्यावहारिक अनुभव असलेल्या व्यक्तींना राज्यसभेवर सदस्य म्हणून नामनिर्देशित करू शकतात. या नामनिर्देशनांमुळे राज्यसभेला विविध क्षेत्रांतील तज्ज्ञ आणि अनुभवी व्यक्तींचे मार्गदर्शन लाभणार आहे.

## 'लाडकी बहिण योजने'साठी नव्याने लाभार्थी वाढणार

**पुणे : दि. १३ वृत्तसंस्था**

विधानसभा निवडणुकीपूर्वी २०२४ मध्ये मोठा गाजावाजा करून सुरू करण्यात आलेल्या मुख्यमंत्री लाडकी बहिण योजनेचे पोर्टल गेल्या काही महिन्यांपासून बंद असल्यामुळे या योजनेस पात्र ठरणाऱ्या महिला लाभापासून वंचित आहेत.मतदानाचा अधिकार वयाच्या १८व्या वर्षी संविधानाने महिलेला दिलेला असताना लाडकी बहीण योजनेसाठी मात्र २१व्या वर्षी पात्र ठरविले जाते. विशेष म्हणजे गेल्या वर्षभरात विविध कारणातून योजनेसाठी वंचीत राहिलेल्या तसेच यावर्षी वयाची २१ वर्षे पूर्ण केलेल्या बहिणींचा समावेश लाडक्या बहिणी योजनेत होणार असतानाच शासनाने आता निधीच्या कारणास्तव या योजनेचे पोर्टलच बंद करून ठेवले असल्याची चर्चा आहे.

### निधीच्या कारणास्तव पोर्टल बंद



### अर्जाची छाननी सुरूच

लाडकी बहीण योजना सुरू झाल्यानंतर २ कोटी ६५ लाभ लाभार्थी महिलांनी नोंदणी केली होती. नंतरच्या काळात राज्य सरकारने निकषानुसार छाननी केल्यानंतर साधारण १९ लाखांहून अधिक लाडक्या बहिणी अपात्र ठरल्या. सध्या, लाडकी बहीण योजनेचा लाभ घेणाऱ्या लाभार्थी महिलांचे वार्षिक कौटुंबिक उत्पन्न अडीच लाखांपेक्षा कमी असावे, ही उत्पन्न मर्यादेची अट योग्य रीतीने पाळली जात नसल्याने राज्य सरकारकडून अर्थ विभागाच्या सहकार्यातून लाभार्थींच्या उत्पन्न पडताळणीचे काम सुरू आहे. यामध्ये आयटीआरची छाननीही होत आहे.

महाराष्ट्र शासनाने जुलै २०२४ पासून २१ ते ६५ वयोगटातील महिलांसाठी मुख्यमंत्री लाडकी बहीण योजना सुरू केली. या योजनेत सुरूवातीला दरमहा १५०० रुपये देण्याचे निश्चित केले. या योजनेच्या लाभाचे हप्ते बँक खात्यात वेळेत जमा होत नसले तरी लाभ मिळतो, या आशेने योजनेचा लाभ घेणाऱ्या महिलांची संख्या वाढत आहे. मात्र, या योजनेसाठी मोठा निधी खर्च होत असल्याने शासनाकडून या योजनेला कडक निकष लागू केले आहेत.

यानूसार सुरवातीला अर्जामध्ये तांत्रिक त्रुटीचे कारण देवून हजारे महिलांचे अर्ज फेटाळण्यात आले. त्यानंतरही पात्र लाडक्या बहिणींसाठी ही योजना सुरू असली तरी या योजनेसाठी आपल्या खात्याचा निधी वळविण्यात आल्याची ओरड अनेक मंत्र्यांनी जाहीरपणे केली आहे. विशेष म्हणजे या योजनेसाठी निधी कसा खर्च (पान २ वर)

## पाटण्यात भाजप नेत्याचा भरदिवसा गोळ्या झाडून खून

**पाटणा : दि. १३ वृत्तसंस्था**

बिहारची राजधानी पाटणा येथे भाजप नेत्याचा खूनाची घटना घडली आहे. भाजप नेते सुरेंद्र केवट यांना भरदिवसा गोळ्या झाडून ठार करण्यात आले. नामांकित उद्योजक गोपाल खेमका यांची त्यांच्याच घराबाहेर गोळ्या घालून हत्या झाली होती. त्याला आठवडा झालेला नसतानाच या हत्येमुळे राज्यातील कायदा-सुव्यवस्थेच्या स्थितीवर मोठे प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.५२ वर्षीय सुरेंद्र केवट शेखपूरा जिल्ह्यातील शेतामध्ये काम करत असताना, दुचाकीवर आलेल्या दोन अज्ञात हल्लेखोरांनी त्यांच्यावर चार गोळ्या झाडल्या. गंभीर जखमी स्थितीत त्यांना तत्काळ पाटणा



येथील एम्स रुग्णालयात हलवण्यात आले, परंतु उपचारादरम्यान त्यांचा मृत्यू झाला.घटनेनंतर भाजप आमदार गोपाल रवीदास आणि माजी मंत्री श्याम रजक यांनी रुग्णालयात भेट देऊन केवट कुटुंबियांचे सांत्वन केले. त्यांनी रुग्णालय प्रशासनास तातडीने शवविच्छेदनाची प्रक्रिया पूर्ण करण्यास सांगितले.ही हत्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर झाल्याने राजकीय वातावरण चांगलेच तापले आहे.

## बिहारच्या मतदार यादीत नेपाळ, बांगलादेश, म्यानमारमधील घुसखोरांचाही समावेश

**पाटणा : दि. १३ वृत्तसंस्था**

बिहारमधील मतदार यादीच्या पुनरावलोकन मोहिमेदरम्यान निवडणूक आयोगाने धक्कादायक माहिती उघड केली आहे. निवडणूक आयोगातील वरिष्ठ सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, या मोहिमेअंतर्गत घरोघरी जाऊन केलेल्या सर्वे क्षणात बूथ लेव्हल अधिकाऱ्यांना (बीएलओ) नेपाळ, बांगलादेश आणि म्यानमारमधून अवैधपणे आलेल्या व्यक्ती मोठ्या संख्येने आढळून आल्या आहेत.निवडणूक आयोगाच्या सूत्रांनुसार, १ ऑगस्ट २०२५ नंतर योग्य तपासणीअंती अशा व्यक्तींची नावे ३० सप्टेंबर २०२५ रोजी प्रसिद्ध होणाऱ्या अंतिम मतदार यादीतून वगळण्यात येतील. ३०




सप्टेंबरनंतर आयोग या घुसखोरांची नेमकी आकडेवारीही जाहीर करेल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे. बिहारमध्ये मतदार यादीच्या पुनरावलोकन अंतर्गत मतदारांकडून गणना अर्ज (जमा करण्याचे काम आता अंतिम टप्प्यात आले आहे.भारतीय निवडणूक आयोगाने दिलेल्या माहितीनुसार, शनिवार सायंकाळपर्यंत बिहारमधील ८०.११ टक्के मतदारांनी आपले गणना अर्ज जमा केले आहेत. २५ जुलै २०२५ या निर्धारित वेळेपूर्वी गणना अर्ज () संकलित करण्याचे काम पूर्ण करण्यासाठी आयोग वेगाने कार्यरत आहे. या कामासाठी ७७,८९५ बीएलओ आणि नव्याने नियुक्त केलेल्या २०,६०३ बीएलओंच्या मदतीने २५ जुलै २०२५ या अंतिम मुदतीपूर्वी अर्ज संकलनाचे काम पूर्ण करण्याच्या दिशेने आयोग वाटचाल करत आहे. या प्रक्रियेवर मुख्य निवडणूक अधिकाऱ्यांमार्फत (सीईओ) राज्यातील सर्व २४३ विधानसभा मतदारसंघांतील ३८ जिल्हा निवडणूक अधिकारी (डीईओ), मतदार नोंदणी अधिकारी (ईआरओ) आणि ९६३ सहायक मतदार नोंदणी अधिकारी (एईआरओ) (पान २ वर)

## मद्यधुंद ऑडी चालकाने फुटपाथवर झोपलेल्या ५ जणांना चिरडले

**नवी दिल्ली : दि. १३ वृत्तसंस्था**

दक्षिण दिल्लीतील वसंत विहार परिसरात एका मद्यधुंद चालकाने मध्यरात्री आपल्या ऑडी गाडीने फुटपाथवर झोपलेल्या पाच जणांवर गाडी घालून त्यांना गंभीर जखमी केल्याची धक्कादायक घटना घडली आहे.

या भीषण अपघातात एका आठ वर्षांच्या मुलीसह दोन जोडप्यांचा समावेश असून सर्वजण गंभीर जखमी झाले आहेत. पोलिसांनी तत्काळ कारवाई करत आरोपी चालकाला अटक केली आहे.ही घटना ९ जुलैच्या रात्री १:४५ वाजता वसंत विहार येथील शिवा कॅम्पच्या समोरील फुटपाथवर घडली. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, या वेळी पाचही जण रस्त्याच्या कडेला झोपलेले होते. चालक उत्सव शेखर (वय ४०, रहिवासी द्वारका, दिल्ली) याने आपल्या ऑडी गाडीने अचानक रस्ता सोडून फुटपाथवर घुसून सर्वांवर गाडी घातली. अपघाताच्या वेळी उत्सव शेखर हा मद्यधुंद अवस्थेत गाडी चालवत होता, हे वैद्यकीय चाचणीत स्पष्ट झाले आहे.घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी तातडीने घटनास्थळी धाव घेतली आणि जखमींना जवळच्या रुग्णालयात दाखल केले. प्रत्यक्षदर्शींनी दिलेल्या माहितीनुसार, एक पांढऱ्या रंगाची ऑडी कार झोपलेल्या लोकांवर चढवण्यात आली होती.या घटनेचा प्राथमिक तपास व प्रत्यक्षदर्शींनी दिलेल्या (पान २ वर)

## इंजिन कसे बंद पडले?: पायलटमुळे की यांत्रिक बिघाडामुळे?

### एअर इंडिया अपघाताच्या अहवालामुळे अनेक प्रश्न उपस्थित

**नवी दिल्ली : दि. १३ वृत्तसंस्था**

एअर इंडिया विमान अपघाताचा प्राथमिक तपास अहवाल नुकताच प्रसिद्ध झाला आहे. हा अहवाल एअरक्राफ्ट ॲक्सिडेंट इन्व्हेस्टिगेशन ब्युरो (एएआयबी) ने तयार केला आहे. अहवालात ''टेकऑफ झाल्यानंतर काही मिनिटांनी विमानाच्या इंजिनांना इंधन पुरवठा थांबला, ज्यामुळे हा अपघात झाला'' असे म्हटले आहे. जरी या अहवालात फक्त एक प्रमुख कारण सांगितले गेले असले तरी अपघाताशी संबंधित इतर अनेक प्रश्नांची उत्तरे अद्याप मिळालेली नाहीत. नागरी उड्डाण मंत्री राम मोहन नायडू यांनीही या अहवालावर आपली प्रतिक्रिया दिली आहे.



नागरी उड्डाण मंत्री राम मोहन नायडू यांनी अहवालावर आपली प्रतिक्रिया दिली आहे. या प्रतिक्रियेत त्यांनी, ''पूर्ण तपास अहवाल येईपर्यंत कोणत्याही निष्कर्षावर पोहोचणे योग्य ठरणार नाही.''असे म्हणत त्यांनी सर्वांना संयम बाळगण्याचे आवाहन केले आहे. अहवालानंतरही, इंधन पुरवठा अचानक का थांबला हे स्पष्ट झालेले नाही. ही तांत्रिक बिघाड होती की काही मानवी चुकांमुळे झाली? या प्रश्नांची उत्तरे अद्याप मिळालेली नाहीत.प्रारंभिक अहवालानुसार, दोन्ही इंजिन बिघाडाचे (डबल-इंजिन बिघाड) कारण इंधन पुरवठा अचानक बंद (पान २ वर)

## मोहीम फत्ते करून शुभांशु उद्या पृथ्वीच्या दिशेने झेपावणार

**नवी दिल्ली : दि. १३ वृत्तसंस्था**

भारतीय अंतराळ संशोधन संस्थेचे (इस्रो) अंतराळवीर ग्रुप कॅप्टन शुभांशु शुक्ला आंतरराष्ट्रीय अंतराळ स्थानकावर () १८ दिवस वास्तव्य केल्यानंतर १५ जुलै रोजी पृथ्वीवर परतत आहेत. एक्सिओम-४ (-४) मोहिमेअंतर्गत शुक्ला यांच्यासोबत कमांडर पेगी व्हिटसन, पोलंडचे स्लावोज उझ्नान्स्की-विस्निव्स्की आणि हंगेरीचे टिबोर कापू हे तीन अन्य अंतराळवीर या प्रवासात सहभागी आहेत. हे सर्वजण २६ जून रोजी अंतराळ स्थानकावर पोहोचले होते.नासाने दिलेल्या माहितीनुसार, चारही अंतराळवीर १४ जुलै रोजी भारतीय वेळेनुसार दुपारी ४ वाजून ३५ मिनिटांनी क्रू ड्रॅगन अंतराळयानातून पृथ्वीच्या दिशेने प्रस्थान करतील. हे यान १५ जुलै रोजी दुपारी ३ वाजता




कॅलिफोर्नियाच्या किनाऱ्याजवळ समुद्रात उतरेल. परतल्यानंतर, शुक्ला यांना पृथ्वीच्या गुरुत्वाकर्षणाशी जुळवून घेण्यासाठी आणि त्यांच्या आरोग्याची काळजी घेण्यासाठी फ्लाइट सर्जनच्या देखरेखीखाली सात दिवस राहावे लागेल.अमेरिकेची अंतराळ संस्था नासाने शनिवारी सांगितले की, ड्रॅगन अंतराळयान आयएसएसवरून चार अंतराळवीरांव्यतिरिक्त ५८० पाउंड (सुमारे २६३ किलो) पेक्षा जास्त सामान, नासाचे हार्डवेअर आणि ६० हून अधिक वैज्ञानिक प्रयोगांचा डेटा घेऊन १५ जुलै रोजी पृथ्वीवर परतणार आहे.

एक्सिओम-४ मिशनच्या कमांडर पेगी व्हिटसन यांनी आपल्या सोशल मीडिया हँडलवरील एका पोस्टमध्ये सांगितले की, त्या आणि त्यांची टीम आयएसएसवरील शेवटच्या दिवसाचा आनंद घेत आहेत. त्यांनी म्हटले की, शुक्ला यांनी आणलेल्या गाजराच्या हलव्याने आणि आमरसाने सर्वांची मने जिंकली आहेत.भारतीय अंतराळ संशोधन संस्थेने (इस्रो) सांगितले की, अंतराळातून परतणारे शुभांशु शुक्ला यांची प्रकृती उत्तम असून ते उत्साहाने भारलेले आहेत.

विशेष म्हणजे, इस्रोने या मोहिमेसाठी सुमारे ५५० कोटी रुपये खर्च केले आहेत. हा अनुभव २०२७ मध्ये सुरू होणाऱ्या महत्त्वाकांक्षी गगनयान मोहिमेच्या तयारीसाठी अत्यंत महत्त्वपूर्ण ठरणार आहे. आयएसएस ताशी २८,००० किलोमीटर वेगाने पृथ्वीची परिक्रमा करते. क्रू ड्रॅगन यान स्वयंचलितपणे स्टेशनपासून वेगळे होईल आणि हळूहळू वेग कमी करून पृथ्वीच्या वातावरणात प्रवेश करेल.

## पान 1 वरून...

### तिरुवल्लीरजवळ रेल्वेला ...

सुरू आहे. यामध्ये रेल्वेगाडी रुळावरून घसरल्यामुळे आग लागली का, की इंधनातील तांत्रिक बिघाडामुळे हा स्फोट झाला, हे अद्याप स्पष्ट झालेले नाही. रेल्वे प्रशासनाकडून यावर चौकशी सुरू करण्यात आली आहे.

### 'लाडकी बहिण योजने'साठी ...

करणार, असा प्रश्न न्यायालयानेही सरकारकडे उपस्थित केला होता. आता, शासनाच्या नियमानुसार वयाची २१ वर्षे पूर्ण करणाऱ्या बहिणींची संख्या गेल्या वर्षभरात वाढली असल्याने त्यांना या योजनेसाठी अर्जच करता येवू नये म्हणून शासनाने पार्टल बंद ठेवले असल्याची चर्चा सुरू आहे. गरजू महिलांना ही योजना लाभदायक ठरत असली तरी विधानसभेच्या काळात केवळ मतांवर डोळा ठेवून ही योजना सुरू करण्यात आली, हे आता उघड होत आहे.

**किती लाडक्या बहिणी अपात्र ?**

मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेतील नव्याने अपात्र ठरलेल्या लाडक्या बहिणींचा आकडा ५ लाख इतका झाला असल्याचे महिला आणि बालविकास मंत्री आदिती तटकरे यांनी त्यांच्या एक्सवर पोस्ट शेअर करीत ही माहिती दिलेली आहे. दि. २८ जून २०२४ व दिनांक ३ जुलै २०२४ मध्ये जारी केलेल्या शासन निर्णयानुसार अपात्र ठरणाऱ्या महिलांना, योजनेतून वगळण्यात येत आहे. पात्र लाडक्या बहिणींना योजनेचा लाभ देण्यासाठी सरकार कटीबद्ध असल्याची ग्वाही आदिती तटकरे यांनी दिली आहे, असे असले तरी तुर्तास तरी या योजनेचे पोर्टलच बंद करण्यात आले आहे.

### बिहारच्या मतदार यादीत ...

यांच्यासह क्षेत्रीय पथकांच्या कामकाजावर बारकाईने लक्ष ठेवले जात आहे.काँग्रेस नेते चरणसिंग सप्रा याबाबत पीटीआयशी बोलताना सांगितले की, मागील ४-५ निवडणुकांमध्ये निवडणूक आयोगाने ज्या पद्धतीने काम केले आहे, त्यावरून सरकार आणि निवडणूक आयोग एकमेकांशी हातमिळवणी करत आहेत अशी शंका निर्माण झाली आहे. आम्ही गेल्या काही निवडणुका पाहिल्या आणि आता बिहारमध्येही अशीच कारवाई पाहिली. आम्ही प्रश्न विचारले, त्यांनी उत्तर दिले नाही. आम्ही मागील निवडणुकांच्या मतदार याद्या मागितल्या, ते देत नाहीत. निवडणूक आयोग आहे की हुकूमशहा? आम्ही आता जनतेच्या न्यायालयात जात आहोत.''

### मद्यधुंद ऑडी चालकाने ...

माहितीनुसार, गाडी अतिवेगात होती. पोलिसांनी घटनेचा सीसीटीव्ही फुटेज आणि इतर पुरावे तपासत तपास सुरू ठेवला आहे.

दिल्लीत अपघातानंतर चालकावर गंभीर निष्काळजीपणाने वाहन चालवणे, जखमी करण्याचा प्रयत्न, आणि दारू पिऊन वाहन चालवणे अशा विविध कलमांखाली गुन्हा नोंदवला असून, पुढील चौकशी सुरू आहे.ही घटना एकटीच नाही. देशात दारूच्या नशेत वाहन चालवून अपघात घडवण्याचे प्रकार सातत्याने वाढत आहेत. १२ जुलै रोजी मुंबईतील वरळीमध्ये एका दारू पिऊन दुचाकी चालवणाऱ्या पोलिस कर्मचाऱ्याने ७५ वर्षांच्या वृद्धाला धडक दिली होती.गेल्या महिन्यात गुरगावजवळ एक ह्युंदाई क्रेटा चालकाने नशेत ई-रिक्शाला धडक दिली होती, ज्यात एकाचा मृत्यू तर चार जण गंभीर जखमी झाले होते. ही घटना शहरातील गरीब व दुर्बल घटकांवरील वाढत्या अपघातांचे प्रतिक बनली असून, रस्त्यावर झोपणाऱ्या लोकांच्या सुरक्षिततेचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे.

### इंजिन कसे बंद पडले...

झाला. अपघाताच्या वेळी विमानाने पुरेशी उंची देखील गाठली नव्हती, ज्यामुळे इंजिन पुन्हा सुरू करण्याचे प्रयत्न अयशस्वी झाले. सुरुवातीचा अहवाल आल्यानंतरही, अनेक प्रश्न आहेत, ज्यांची उत्तरे अद्याप मिळालेली नाहीत.एका इंग्रजी वृत्तवाहिनीशी बोलताना विमानचालन तज्ञांनी सांगितले की विमानाचा इंधन स्विच आपोआप बदलू शकत नाही. ही एक पूर्णपणे यांत्रिक प्रक्रिया आहे, ज्यामध्ये अनेक सुरक्षा व्यवस्था आधीच अस्तित्वात आहेत'' असे म्हटले. भारतीय हवाई दलाचे माजी पायलट एहसान खालिद म्हणाले, ''उतरल्यानंतरच इंधन स्विच रनपासून कट ऑफ पोझिशनमध्ये मॅन्युअली बदलला जातो. या स्विचखाली एक सेफ्टी गार्ड आहे, जो आतील स्प्रिंग हाताने वर उचलल्याशिवाय काढता येत नाही.'' म्हणजेच, ही प्रक्रिया स्वतःहून होऊ शकत नाही. कोणीतरी ते जाणूनबुजून किंवा चुकून बदलले असावे. एएआयबीच्या सुरुवातीच्या अहवालात एक महत्त्वाचा प्रश्न उपस्थित झाला आहे की इंधन कटऑफ स्विच कोणी बदलला आणि का. या संदर्भात, तपास पथकाने कॉकपिट व्हॉइस रेकॉर्डर (सीव्हीआर) मधील संभाषणाचा उल्लेख केला आहे, ज्यामध्ये दोन वैमानिक या विषयावर चर्चा करताना ऐकू आले.अहवालानुसार, ''कॉकपिट रेकॉर्डिंगमध्ये, एक पायलट दुसऱ्याला विचारतो, ''तुम्ही इंधन का कापले?'' यावर दुसरा पायलट उत्तर देतो, ''मी नाही केले.'' मात्र, अहवालात अद्याप हे स्पष्ट झालेले नाही की कोणत्या पायलटने प्रश्न विचारला आणि त्याचे उत्तर कोणी दिले. म्हणजेच कोणता पायलट कोणत्या भूमिकेत होता, ही माहिती अद्याप उघड झालेली नाही.ही उड्डाण सुमारे ३८ सेकंद चालली, परंतु अशा गंभीर परिस्थितीत फक्त एकच संभाषण होणे संशयास्पद मानले जाते. आता प्रश्न उपस्थित केला जात आहे की कॉकपिट व्हॉइस रेकॉर्डर (सीव्हीआर) चा डेटा अपूर्ण आहे का? संपूर्ण संभाषण जाणूनबुजून अहवालात समाविष्ट केले गेले नाही का? या प्रश्नांमुळे अपघात अधिक गूढ झाला आहे. आता संपूर्ण सत्य अंतिम अहवालाद्वारेच उघड होईल. तज्ञांच्या मते, दोन्ही इंधन कटऑफ स्विच एकाच वेळी बिघाड झाल्याने विचार करायला लावतो. तरीही, एएआयबी अहवालात एफएएच्या २०१८ च्या चेतावणीचा उल्लेख आहे, ज्यामध्ये असे म्हटले आहे की काही बोईंग ७३७ विमाने लॉकिंग फीचरशिवाय इंधन स्विच होते. बोईंग ७८७-८ व्हीटी-एएनबी विमानातही अशीच रचना होती. मात्र, एफएएने तेव्हा ते गंभीर धोका मानले नव्हते, परंतु आता प्रश्न उपस्थित केला जात आहे की तीच तांत्रिक त्रुटी या अपघाताचे कारण बनली का?

# मनपाची प्लास्टिकविरोधी कारवाई जोरात ; ६ क्विंटल कॅरीबॅग जप्त

दै. अजिंक्य भारत । प्रतिनिधी




**अकोला, दि. १३ :** अकोला शहरात प्लास्टिकविरोधी अभियानाला वेग आला असून महापालिकेने झोननिहाय धडक कारवाई सुरू केली आहे. केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळ तसेच महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या निर्देशानुसार महापालिका आयुक्त तथा प्रशासक डॉ. सुनील लहाने यांच्या आदेशावरून आणि उपायुक्त गीता ठाकरे यांच्या मार्गदर्शनाखाली ही कारवाई राबवली जात आहे.

मनपाच्या विविध विभागांनी शहरातील बाजारपेठा, दुकाने आणि व्यावसायिक प्रतिष्ठानांवर छापे टाकून प्रतिबंधित प्लास्टिकच्या कॅरीबॅग आणि इतर वस्तू जप्त केल्या आहेत. या कारवाईत एकूण ६ क्विंटल प्लास्टिक सामग्री जप्त करण्यात आली असून १५ हजार ५०० रुपयांचा दंडही संबंधित व्यापाऱ्यांकडून वसूल करण्यात आला आहे.

**१५ हजारांचा दंड वसूल**

राज्यात प्लास्टिकबंदीचे कायदे कडक असतानाही काही व्यापारी आणि दुकानदार अजूनही बंदी घालण्यात आलेल्या प्लास्टिकचा वापर करत असल्याचे लक्षात आल्यावर महापालिकेने ही मोहीम सुरू केली आहे. या मोहिमेअंतर्गत फड, दुकान, भाजीबाजार, किराणा दुकाने आदी ठिकाणी तपासणी करण्यात येत आहे.

मनपाकडून प्लास्टिकबाबत जनजागृती करण्यासह कडक कारवाईदेखील केली जात आहे. प्रतिबंधित प्लास्टिक वापरणाऱ्यांवर दंडात्मक कारवाई केली जात असून पुन्हा नियमभंग झाल्यास दुकाने सील करण्याची तयारी आहे. महापालिकेचे आवाहन आहे की, नागरिकांनी व दुकानदारांनी पर्यावरणपूरक पर्यायांचा अवलंब करावा व बंदी असलेल्या प्लास्टिक वस्तूंचा वापर टाळावा, अन्यथा पुढील कारवाईला सामोरे जावे लागेल.

## मारहाण, दमदाटी, अश्लील शिवीगाळ व जबरदस्तीने विष देण्याचा आरोप

### जिल्हा पोलीस अधिक्षकांकडे न्यायासाठी धाव

दै. अजिंक्य भारत । प्रतिनिधी

**पातूर, दि. १३ :** मजुरी करून उपजीविका करणाऱ्या बेलुरा बु. (ता. पातूर) येथील ओमकार हरिभाऊ अंभोरे या युवकाने जिल्हा पोलीस अधिक्षक अकोला यांच्याकडे थेट अर्ज सादर करून आपल्या सोबत झालेल्या गंभीर प्रकारांविरोधात कठोर कार्यवाही करण्याची मागणी केली आहे.

या अर्जात ओमकार अंभोरे यांनी नमूद केल्याप्रमाणे, कांता विष्णु पवार (रा. लहान उमरी) हिच्या बहिणीस ५०,०००/- रुपये वैयक्तिक कामासाठी एक महिन्याच्या मुदतीकरिता दिले होते. पैसे मागण्यासाठी गेले असता, २० एप्रिल २०२५ रोजी रात्री आठ वाजता भारतीच्या घरी बोलावून आरोपी सोहेल खान, त्याचा मित्र व कांता पवार या तिघांनी एकत्र येत ओमकारवर लाथाबुक्क्यांनी जबर मारहाण केली. त्याचप्रमाणे अत्यंत अश्लील भाषेत शिवीगाळ करून त्याच्या तोंडात उंदीर मारायचे औषध जबरदस्तीने भरवण्यात आल्याचे त्यांनी आरोपात म्हटले आहे. त्यानंतर १८ जून २०२५ रोजी पुन्हा एकदा आरोपींनी ओमकार याच्यावर हल्ला करून, रिपोर्ट मागे न घेतल्यास जीवे मारून टाकू अशी धमकी दिली. चाकू दाखवून दमदाटी करत शिवीगाळ केली. या सर्व प्रकरणी त्यांनी १९ जून रोजी पातूर पोलीस ठाण्यात तक्रार दिली होती, मात्र अद्याप कोणतीही कार्यवाही झाली नसल्याचे त्यांनी अर्जात नमूद केले आहे.

ओमकार अंभोरे यांनी जिल्हा पोलीस अधिक्षकांना सादर केलेल्या निवेदनात संबंधित आरोपींविरोधात तात्काळ कायदेशीर कार्यवाही करून न्याय द्यावा, अशी विनंती केली आहे.१९/०६/२०२५ रोजी पातूर पोलीस ठाण्यात दिलेल्या तक्रारीची छायांकीत प्रत. जोडलेली आहे .

> सदरच्या तक्रारीमध्ये घटना अकोला येथील असल्यामुळे तक्रार तिकडे पाठविले तर बेलुरा फाट्यावरील घडलेल्या घटने प्रकरण जमादार तारासिंग राठोड यांच्याकडे तपास दिलेला आहे .
>
> **पीएसआय मेश्राम**
> पोलीस स्टेशन पातुर

## गुरुपौर्णिमा महोत्सवात गोगाभक्तांचा उत्स्फूर्त सहभाग

दै. अजिंक्य भारत । प्रतिनिधी



**अकोला, दि. १३ :**दरवर्षीप्रमाणे यंदाही श्री रतनसिंह चावरीया महाराज संघाच्या वतीने गुरुपौर्णिमा महोत्सव मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. अकोल्यातील गणेश घाट गोगामेंडी मंदिर परिसरात पार पडलेल्या या महोत्सवाचे आयोजन संघाचे संस्थापक अध्यक्ष सचिन चावरे यांच्या नेतृत्वाखाली करण्यात आले होते.

कार्यक्रमाच्या प्रारंभी भीमनगर येथील चमन भगत झाझोटे, विजय नगर येथील कालु भगत निनोरे व सारसर भगत यांच्या नेतृत्वाखाली तीन प्राचीन निशान यात्रांचे आगमन झाले. गोगामेंडी मंदिर येथे प्रभात फेरीनंतर पूजा-अर्चा करण्यात आली. यावेळी गोगाभक्तांचे स्वागत उपस्थित मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. कार्यक्रमास वतन शायर बब्बु, पहेलवान गोयर, रामसिंह डीकाव चौधरी, अमन झाझोटे खलीफा, विजय पथरोड आदींची उपस्थिती होती. यांचा गौरव माजी महापौर मदन भरगड यांच्या हस्ते करण्यात आला. या प्रसंगी महाप्रसादाचेही आयोजन करण्यात आले होते. गोगाभक्तांनी मोठ्या श्रद्धेने सहभागी होत महोत्सवाची शोभा वाढवली. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी विशाल डीकाव, उमेश तांबोळी, विक्की गोहर, देवा भगत थामेत, कुणाल डीकाव, नरेश टमटमकार, सुशिल पाटील आदींनी विशेष परिश्रम घेतले.

कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी उपस्थित भक्तांचे सचिन चावरे यांनी आभार मानले.

## आपचे उपोषण सातव्या दिवशीही सुरु ; प्रशासनाच्या उदासीनतेवर रोष

दै. अजिंक्य भारत । प्रतिनिधी




**अकोला, दि. १३ :**अकोला महानगरपालिकेच्या कामकाजाशी संबंधित विविध प्रशासनिक मागण्यांसाठी आम आदमी पार्टीने ७ जुलैपासून मनपा कार्यालयासमोर उपोषण सुरू केले असून, रविवार (दि. १३ जुलै) रोजी या आंदोलनाचा सातवा दिवस होता. महानगर अध्यक्ष अल्हाद मसूद अहमद खान यांच्या नेतृत्वाखाली हे उपोषण सुरू असून, अद्याप प्रशासनाकडून ठोस निर्णय न झाल्याने कार्यकर्त्यांचा रोष वाढत आहे.

प्रथम दिवशी मनपाच्या अधिकाऱ्यांनी उपायुक्त गीता ठाकरे यांच्या वतीने चर्चेचा संदेश दिला होता. मात्र, ही चर्चा निष्फळ ठरल्यामुळे आंदोलन थांबलेले नाही. शहरातील प्रत्येक प्रभागात जनतेला चांगल्या आरोग्य सुविधा, शाळांमध्ये डिजिटल एलईडी बोर्ड, पंखे, स्वच्छतागृहे, स्वच्छ परिसर आणि शुद्ध पाणी उपलब्ध व्हावे, अशा मागण्या करण्यात आल्या आहेत.

तसेच सीमाविस्तार झालेल्या प्रभागांमध्ये सिमेंट काँक्रीट रस्ते व नाल्यांचे बांधकाम, एक दिवसा आड नियमित पाणीपुरवठा, १०,००० रुपयांहून अधिक घरकरांवर हप्त्यांची सवलत योजना, तसेच २०१७ मध्ये वाढवलेला कर पूर्ववत करून त्यावर फक्त १० टक्के वाढ लागू करावी, अशा मागण्या करण्यात आल्या आहेत.

या आंदोलनात जिल्हाध्यक्ष कैलास प्राणजाले, प्रदेश महासचिव अरविंद कांबळे, प्रा. प्रदीपकुमार गवई, आकिब खान, अशोक शेगोकार, रफिक, माणिकराव मोरे आदी सहभागी आहेत. प्रशासनाने याकडे गांभीर्याने लक्ष दिले नाही, तर दिल्ली-पंजाबप्रमाणे मोफत आरोग्य, शिक्षण व कर सवलतीसाठी मंगळवार पासून आमरण उपोषण करण्याचा इशाराही देण्यात आला आहे. आता प्रशासन यावर काय पाऊल उचलते, याकडे सगळ्यांचे लक्ष लागले आहे.

## ऑपरेशन प्रहार अंतर्गत गोवंश तस्करी उधळली ; दोन बैलांची सुटका, साडेपाच लाखांचा मुद्देमाल जप्त

दै. अजिंक्य भारत । प्रतिनिधी



**अकोला, दि. १३ :** जिल्ह्यात अवैध गोवंश वाहतुकीवर आळा घालण्यासाठी पोलीस अधीक्षक अर्चित चांडक यांच्या संकल्पनेतून राबवण्यात येत असलेल्या ''ऑपरेशन प्रहार'' अंतर्गत बार्शीटाकळी पोलिसांनी मोठी कारवाई करत दोन गोवंश जातीच्या बैलांना जीवदान दिले आहे.

पोलीस स्टेशन बार्शीटाकळीला गोपनीय माहिती मिळाली होती की, पांढऱ्या रंगाची महिंद्रा सुप्रो (-३०--७७६९) या वाहनातून गोवंश जातीचे दोन बैल कुरत्याच्या सहाय्याने दोरखंडाने बांधून कटाईसाठी वाहतूक केली जात आहे. ही माहिती मिळताच पोलीस कर्मचारी पो.हे.कॉ. अविनाश बोरसे , पो.कॉ. अमोल हाके, पो.कॉ. योगेश यांनी तातडीने घटनास्थळी जाऊन सायंकाळी सुमारे ७ वाजता नाकाबंदी केली. दरम्यान, महान पिंजर कडून येणारी वरील गाडी थांबवून पंचासमक्ष तपासणी केली असता, गाडीच्या मागील भागात २ गोवंश जातीचे बैल निर्दयतेने बांधलेले आढळून आले.

सदर गोवंशाची एकूण किंमत ९० हजार रुपये, तर वाहतूक करणाऱ्या महिंद्रा सुप्रो वाहनाची किंमत ४ लक्ष ५० हजार रुपये इतकी असून, एकूण ५ लक्ष४० हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.बचावलेल्या गोवंशांना पुढील संगोपनासाठी आदर्श गोसेवा संस्थान, म्हैसपूर येथे हलवण्यात आले आहे.ही कार्यवाही पोलीस अधीक्षक अर्चित चांडक, अप्पर पोलीस अधीक्षक अभय डोंगरे, आणि उपविभागीय पोलीस अधिकारी सतीश कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनाखाली व पोलीस निरीक्षक प्रवीण धुमाळ यांच्या नेतृत्वाखाली पार पडली. पुढील तपास पो.हे.कॉ. राजेश जौधरकर हे करत आहेत.

## बालकांनी उचलला हरिततेचा ध्यास!




दै. अजिंक्य भारत । प्रतिनिधी

**अकोला, दि. १३ :** पर्यावरण संवर्धनासाठी चिल्ड्रन इस्लामिक ऑर्गनायझेशन (सीआयओ) च्या बालकांनी ''हात मातीत, मन देशासोबत'' या संकल्पनेवर आधारित वृक्षारोपण मोहिमेला देशभरात सुरुवात केली असून, अकोल्यातही या मोहिमेला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे. या उपक्रमाची शनिवारी शासकीय विश्रामगृह येथे आयोजित बालक पत्रकार परिषदेत देण्यात आली. जमाते इस्लामी हिंदची बालक शाखा असणाऱ्या सीआयओच्या या मोहिमेअंतर्गत देशभरातील एक लाख झाडांचे वृक्षारोपण करून त्यांचे संवर्धन करण्याचा निर्धार करण्यात आला आहे. अकोला शहरातील सुमारे २५,००० बालक व बालिकांनी विविध शाळा, मदरसे, मशीदी, सोसायट्या व वस्त्यांमध्ये वृक्षारोपणाला सुरुवात केली आहे. या मोहिमेत हरित प्रतिज्ञा, निसर्ग संवर्धन विषयक प्रवचने, नेचर बॉक्स, चित्रकला, कविता, कथाकथन स्पर्धा, अभ्यासदौरे आणि शैक्षणिक व्हिडिओद्वारे मुलांमध्ये पर्यावरण जागृती घडविण्यात येणार आहे. ग्लोबल वॉर्मिंगच्या पार्श्वभूमीवर बालकांमध्ये निसर्गप्रेम, जबाबदारी व सेवाभाव रुजावा, हा या उपक्रमामागील उद्देश असल्याचे बालकांनी हिंदी, मराठी, इंग्रजी व उर्दू भाषेतून पत्रकार परिषदेत सांगितले.

## सविंधान कॉलनी येथे बौद्ध धम्मातील वर्षावास आरंभ

**अकोट :** दरवर्षीप्रमाणे याही वर्षी सुद्धा गुरु पौर्णिमेपासून बौद्ध धम्मातील वर्षावास आरंभ होत आहेत. प्रत्येक ठिकाणी बौद्ध आणि त्याचा धम्म या ग्रंथाचे पठण केल्या जाते. बौद्ध धम्मातील उपासिका महिलांना तीन महिन्याचे उपवास ठेवून बौद्ध विहारांमध्ये धम्मग्रंथाचे पठण केल्या जाते.

मोठ्या हर्षवल्लासामध्ये नियमितपणे दररोज ठरलेल्या वेळेनुसार महिला एकत्रित होऊन बौद्ध धम्माची शिकवण धम्मग्रंथाच्या माध्यमातून घेतल्या जाते. आज सविंधान कॉलनी येथे भंत्ते संघरक्षीत (थेरो) अमरावती यांच्या हस्ते बोधीवृक्षाचे रोपन व बुध्द आणि त्यांचा धम्म महान ग्रथांचे पटन करण्यात आले या वेळी मा सरपंच प्रदिप सपकाळ यांच्या सकल्पनेतुन भिमाई बाल उद्यानाच्या परिसरात शोशिभीकरन करण्यात येनार आहे तसेच महाकारूनीक तथागत भगवान गौतम बुद्धांची मूर्ती देण्यात आली या वेळी सविंधान कॉलनी मधील सर्व उपासक ऊपसिका उपस्थित होते तसेच या ग्रथ समारोपीय कार्यक्रमात जिल्ह्यातील सर्व महिला संघ उपस्थित राहतील तसेच सर्व महिला संघाना सविंधान कॉलनी तर्फे सविंधान भेट देण्यात येनार आहे

# झाडे लावणे हेच खरे राष्ट्रसेवेचे काम : वासुदेवराव कडू यांचा प्रेरणादायी उपक्रम

## स्वखर्चाने तयार केली गच्चीवर नर्सरी, हजारो रोपांचे मोफत वाटप

दै. अजिंक्य भारत । प्रतिनिधी



**अकोला, दि. १३ :** गायत्री नगर, कौलखेड (अकोला) येथील वासुदेवराव कडू यांनी आपल्या घराच्या गच्चीवर नर्सरी उभारून हजारो रोपटींचे मोफत वाटप केले आहे. स्व. प्राची बिहाडे स्मृती प्रतिष्ठान आणि ट्री अडॉप्ट कॅम्पेनच्या माध्यमातून वृक्ष संगोपनही करतात. ते योगवर्ग, वधू-वर मेळावे व वरिष्ठ नागरिक उपक्रमांतही सक्रीय असून पर्यावरण व समाजकार्याचा उत्कृष्ट समन्वय साधतात

''झाडे लावा, झाडे जगवा'' ही संकल्पना केवळ घोषवाक्य न राहता प्रत्यक्ष कृतीतून सिद्ध करणारे व्यक्तिमत्त्व म्हणजे गायत्री नगर, कौलखेड (ता. अकोला) येथील वासुदेव रामरावजी कडू. गेल्या १० ते १५ वर्षांपासून आपल्या गच्चीवर स्वखर्चाने तयार केलेल्या नर्सरीच्या माध्यमातून त्यांनी हजारो वृक्षरोपट्यांचे उत्पादन करून नागरिकांना मोफत वाटप केले आहे.

अकोला जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेत ३६ वर्षे सेवा बजावलेल्या कडू सरांनी कृषी पदवीधर या नात्याने वृक्षप्रेमाची बीजे तरुण वयातच पेरली. सन २०११ मध्ये सेवानिवृत्त झाल्यानंतर 'स्व. प्राची बिहाडे स्मृती प्रतिष्ठान'च्या माध्यमातून त्यांनी गच्चीवरच नर्सरी सुरू केली. इथे विविध फळझाडे, औषधी वनस्पती व छायादायक वृक्षांची रोपे तयार केली जातात. आजवर त्यांनी हजारो रोपे नागरिकांना मोफत दिली असून अनेक संस्थांसोबत मिळून वृक्षारोपण मोहीमा देखील राबविल्या आहेत. 'शुभम करोति फाउंडेशन'च्या माध्यमातून 'ट्री अडॉप्ट कॅम्पेन' राबवून त्यांनी लावलेल्या झाडांना पाणी घालण्याचे, त्यांचे संगोपन करण्याचे कार्यही स्वतःहून सुरू ठेवले आहे.

इतकेच नव्हे तर वृक्षबियांचेही मोफत वाटप करून कडू सरांनी समाजात पर्यावरणपूरक विचारांची पेरणी केली आहे. त्यांच्या या कार्याची दखल अनेक सामाजिक संस्थांनी घेत त्यांचा गौरव करण्यात आला आहे.कडू सर केवळ वृक्षप्रेमीच नाहीत तर सामाजिक क्षेत्रातही सक्रीय आहेत. शिवशक्ती प्रतिष्ठानच्या माध्यमातून योग वर्गांचे आयोजन, माँ गायत्री ज्येष्ठ नागरिक संघाच्या मार्फत वरिष्ठ नागरिकांसाठी उपक्रम, तर पाटील समाज मंडळाच्या माध्यमातून वधू-वर परिचय मेळाव्याचे आयोजन अशी विविध सामाजिक कामे ते आजही करीत आहेत.

सध्याच्या ७५ वर्षांच्या अमृतमहोत्सवी वयात देखील ते तितक्याच उत्साहाने कार्यरत आहेत. प्रत्येकाने आपल्या जीवनात झाडे लावण्याचा छंद जोपासला, तर पर्यावरणाचा समतोल राखून निरोगी समाजनिर्मिती शक्य आहे, असा सल्ला ते नेहमी देतात.

## थोडक्यात

### 'डब्ल्यूएचओ'कडून शेख हसीना यांना मोठा धक्का, मुलगी सायमा वाजिद यांच्यावर भ्रष्टाचाराचे आरोप

**नवी दिल्ली :** बांगलादेशच्या माजी पंतप्रधान शेख हसीना यांना मोठा धक्का बसला आहे. त्यांच्या मुलीवर म्हणजे, डॉ. सायमा वाजिद 'डब्ल्यूएचओ यांच्यावर भ्रष्टाचार आणि पदाच्या गैरवापराचे गंभीर आरोप झाले असून, जागतिक आरोग्य संघटनेने त्यांच्यावर कारवाई करत डॉ. सायमा यांना अनिश्चित काळासाठी रजेवर पाठवले आहे. 'डब्ल्यूएचओच्या सहाय्यक महासंचालक डॉ. टेड्रोस अधानोम घेब्रेयसस यांनी एका अधिकृत ईमेलच्या माध्यमातून ही माहिती दिली. सायमा यांच्या जागी आता डॉ. कथरीना बोहेम यांची च्या आग्नेय आशिया प्रादेशिक कार्यालयाच्या SEARO संचालकपदी नियुक्ती करण्यात आली आहे. बांगलादेशातील अंतरिम सरकारने कडे तक्रार दाखल केल्यानंतर ही कारवाई झाली आहे. सायमा वाजिद यांच्यावर खालील आरोप करण्यात आले आहेत: पदाचा गैरवापर, भ्रष्टाचार, फसवणूक, आपल्या आई शेख हसीना यांच्या राजकीय प्रभावाचा वापर करून पद मिळवणे. या आरोपांमुळे बांगलादेशच्या भ्रष्टाचारविरोधी आयोगानेयांच्या विरोधात चौकशी आणि गुन्हा नोंदवलेला आहे. सायमा व्यवसायाने मानसशास्त्रज्ञ आहेत. त्यांनी नोव्हेंबर २०२३ मध्ये मध्ये प्रवेश केला होता आणि १ फेब्रुवारी २०२४ पासून विभागाच्या संचालकपदी कार्यरत होत्या.

### शिक्षकाकडून लैंगिक छळ, विद्यार्थिनीने स्वतःला घेतलं पेटवून

**बालासोर :** ओडिशाच्या बालासोर जिल्ह्यात एक धक्कादायक प्रकार घडला आहे. बालासोर जिल्ह्यातील एका प्रतिष्ठित कॉलेजमध्ये शिकणाऱ्या एका विद्यार्थिनीने कॉलेजमधील एका शिक्षकाविरोधात लैंगिक छळाची तक्रार केली. मात्र, तिच्या तक्रारीकडे कोणीही लक्ष न दिल्यामुळे तिने टोकाचं पाऊल उचललं आहे. त्या विद्यार्थिनीने कॉलेजच्या आवारातच स्वतः ला पेटवून घेतल्याची माहिती समोर आली आहे. या हृदयद्रावक घटनेत ती विद्यार्थिनी जवळपास ९० टक्के भाजली असून तिची प्रकृती चिंताजनक आहे. या विद्यार्थिनीने एका वरिष्ठ प्राध्यापकावर लैंगिक छळाचे आरोप केले होते. या आरोपानंतर कॉलेज प्रशासनाने निष्क्रियता दाखवली. संबंधित प्राध्यापकावर कोणतीही कारवाई केली नाही. त्यामुळे तिने हे टोकाचं पाऊल उचललं आहे. आता तिच्यावर एम्स भुवनेश्वर या ठिकाणी उपचार सुरू आहेत. ती तिच्या जीवाशी झुंज देत आहे. रुग्णालयातील सूत्रांनी सांगितलं की, तिची प्रकृती अत्यंत गंभीर आहे. कारण ती जवळपास ९० टक्के भाजली आहे. या संदर्भातील वृत्त इंडियन एक्स्प्रेसने दिलं आहे. दरम्यान, तिच्यावर उपचारांसाठी डॉक्टरांची एक विशेष टीम तयार करण्यात आली आहे. तसेच राज्य सरकारने संबंधित कॉलेजमधील प्राचार्य आणि आरोपी प्राध्यापकांना निलंबित केलं आहे. तसेच आरोपी प्राध्यापकाला पोलिसांनी अटकही केलं आहे. काही विद्यार्थ्यांच्या म्हणण्यानुसार, ती धरणे आंदोलन करत होती. तिच्या विभागप्रमुखाने तिचा लैंगिक छळ केल्याचा आरोप ती करत होती. तिने तक्रार समितीकडे तक्रारही केली होती. पण तरीही कोणतीही कारवाई झाली नाही.

### मुंबईतील मतदार वाढले; आठ वर्षांत दहा लाखांहून अधिक वाढ

**मुंबई :** स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका लवकरच जाहीर होण्याची शक्यता असून त्यासाठी मतदारयाद्या अद्ययावत करण्याचे कामही वेगात सुरू आहे. मुंबई महापालिकेची मुदत संपून जवळपास साडेतीन वर्षे पूर्ण झाली असून महापालिकेची निवडणूक होऊन आता आठ वर्षे झाली आहेत. या आठ वर्षांत मुंबईत मतदारांची संख्या १० लाखांनी वाढली आहे. राज्यातील रखडलेल्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका लवकरच अपेक्षित आहेत. सर्व महानगरपालिका व नगरपालिकांमध्ये प्रभागांची रचना करून ती निवडणूक आयोगाकडे मान्यतेसाठी सादर करण्याचे आदेश नगर विकास विभागाने सर्व पालिकांना दिल्यानंतर प्रभाग रचनेच्या आराखड्याचे काम वेगात सुरू झाले आहे. गेल्या सात आठ वर्षांत मुंबईत झालेल्या विकासकामांची नोंद त्यात करण्यात येत आहे. दुसरीकडे मतदारयाद्या अद्ययावत करण्याचे कामही अखंड सुरू आहे.मुंबई महापालिकेची मागील निवडणूक फेब्रुवारी २०१७ मध्ये झाली होती. निवडणुकीत निवडून आलेल्या नगरसेवकांच्या कार्यकाळाची मुदत मार्च २०२२ मध्ये संपली. नगरसेवकांच्या कार्यकाळाची मुदत संपून साडेतीन वर्षे झाली. मुंबई महापालिकेची निवडणूक पार पडली त्याला आता साडेआठ वर्षे होऊन गेली आहेत. या साडेआठ वर्षांत मुंबईतील लोकसंख्येत मोठी वाढ झाली आहे. त्यामुळे मतदारांच्या संख्येतही वाढ झाली आहे.मुंबई महानगरपालिकेच्या २०१७ मधील निवडणुकीच्या वेळी मतदारांची संख्या सुमारे ९१ लाख होती.

# सत्तेत आल्यानंतर लोक अहंकारी होतात

## नाव न घेता नितीन गडकरींनी आता कोणावर साधला निशाणा?

**नवी दिल्ली, दि.१३ वृत्तसंस्था**

केंद्रीय वाहतूक आणि महामार्ग मंत्री नितीन गडकरी, जे निर्भीडपणे आपले विचार मांडण्यासाठी ओळखले जातात, ते पुन्हा एकदा त्यांच्या विधानामुळे चर्चेत आहेत. नागपूर याठिकाणी शिक्षकांच्या मेळाव्यात बोलताना, ''सत्ता, संपत्ती, ज्ञान किंवा सौंदर्य मिळवणारे लोक अनेकदा अहंकारी होतात'' असे म्हटले आहे.

नितीन गडकरी यांनी यावेळी बोलताना, ''जेव्हा लोक स्वतःला सर्वात बुद्धिमान मानू लागतात तेव्हा त्यांचा कट्टरपणा इतरांवर परिणाम करतो. त्यांनी यावर भर दिला की कोणीही स्वतःला लादून महान होत नाही. इतिहास पहा, ज्यांना त्यांच्या लोकांनी स्वीकारले, त्यांना कधीही त्यांचे विचार कोणावरही लादावे लागले नाहीत'' असे म्हटले आहे.



पुढे बोलताना त्यांनी,''लोक मानतात की मी सर्वात हुशार आहे. मी 'साहब' झालो आहे. मी इतरांना मोजतही नाही. असा अहंकार खऱ्या नेतृत्वाला कमकुवत करतो'' असे म्हटले. टीमवर्कवर भर देताना ते म्हणाले की, ''कोणत्याही संघटनेची ताकद, मग ती राजकारण असो, सामाजिक कार्य असो किंवा कॉर्पोरेट जीवन असो, मानवी संबंधांमध्ये असते. तुम्ही तुमच्या अधीनस्थांशी कसे वागता हे महत्त्वाचे आहे. आदर मागू नये, तो मिळवावा. जर तुम्ही पात्र असाल तर तुम्हाला तो मिळेल.''असेही त्यांनी म्हटले.

गडकरींच्या या विधानावर महाराष्ट्राचे माजी मंत्री नितीन राऊत म्हणाले की, ''त्यांचे विधान स्पष्टपणे भाजपच्या सर्वोच्च नेतृत्वाकडे निर्देशित होते, जे अलिकडे खूप अहंकारी आणि स्वार्थी बनले आहे.''

सरकारी क्षेत्रातील भ्रष्टाचाराबद्दल बोलताना गडकरी म्हणाले की, शिक्षकही त्यात सामील आहेत. काही जण नियमित नियुक्त्यांसाठी लाच मागतात. ते म्हणाले की, शिक्षण विभागात काय चालले आहे हे मला चांगले माहिती आहे.

अधिकाऱ्यांच्या जबाबदारीवर गडकरी म्हणाले की, जेव्हा तुम्हाला नोकरी मिळते तेव्हा तुमची परीक्षा घेतली जाते. मी विचारतो की तुम्ही गाढवाला घोडा बनवू शकता का? असे म्हणू नका की त्यात सुधारणा होऊ शकत नाही कारण तुम्हाला फक्त सुधारणेसाठी बोलावले आहे.

## रशियाने दिली अमेरिका, जपान, दक्षिण कोरियाला धमकी

**प्योंगयांग , दि.१३ वृत्तसंस्था**

रशियाचे परराष्ट्रमंत्री सर्गेई लावरोव यांनी अमेरिका, दक्षिण कोरिया आणि जपान या देशांना कडक इशारा दिला आहे की त्यांनी उत्तर कोरियाच्या विरोधात कोणतेही सुरक्षा गठबंधन किंवा लष्करी आघाडी निर्माण करू नये. सध्या लावरोव उत्तर कोरियाच्या वॉनसान शहराच्या दौऱ्यावर असून त्यांनी उत्तर कोरियाचे सर्वोच्च नेते किम जोंग उन यांची भेट घेतली.

लावरोव यांनी उत्तर कोरियाच्या परराष्ट्रमंत्री चोई सोन हुई यांच्याशी देखील सविस्तर चर्चा केली. त्यानंतर पत्रकारांशी बोलताना लावरोव म्हणाले की, अमेरिका, दक्षिण कोरिया आणि जपान उत्तर कोरियाच्या भोवती लष्करी तैनाती वाढवत आहेत. हे धोरण धोकादायक असून कोणत्याही देशाच्या विरोधात गठबंधन करण्यासाठी या संबंधांचा वापर होऊ नये, असा इशाराही त्यांनी दिला.

लावरोव यांनी दोन्ही देशांदरम्यान लष्करी सहकार्य अधिक मजबूत करण्याचा आणि आंतरराष्ट्रीय मुद्द्यांवर संयुक्त कृती करण्याचा निर्धार व्यक्त केला. गेल्या काही वर्षांत रशिया आणि उत्तर कोरियाचे संबंध अधिक घट्ट झाले असून दोन्ही देश जागतिक पातळीवर आपले हितसंबंध जुळवून घेण्याचा प्रयत्न करत आहेत.



लावरोव तीन दिवसांच्या उत्तर कोरिया दौऱ्यावर आहेत. त्यांनी स्पष्ट शब्दांत सांगितले की, रशियाला उत्तर कोरियाचे आण्विक शस्त्रास्त्र विकासाचे कारण समजते. त्यांनी म्हटले आहे की, ''उत्तर कोरियाचे अणु तंत्रज्ञान ही त्यांच्या वैज्ञानिकांची मेहनत आहे आणि आम्ही त्यांच्या आकांक्षांचा आदर करतो.''

रशियन वृत्तसंस्था च्या माहितीनुसार, लावरोव आणि उत्तर कोरियन नेत्यांमध्ये युक्रेन युद्धावरही चर्चा झाली. उत्तर कोरिया यापूर्वीच रशियाला सैनिक आणि शस्त्रे पुरवून मदत करत आहे. याच्या बदल्यात उत्तर कोरियाला रशियाकडून लष्करी आणि आर्थिक मदत मिळते. युक्रेनच्या गुप्तचर संस्थेनुसार, उत्तर कोरिया आणखी २५ ते ३० हजार सैनिक रशियाला पाठवण्याच्या तयारीत आहे. मागील वर्षी त्याने सुमारे ११ हजार सैनिक पाठवले होते.

मागील वर्षी रशियाचे राष्ट्राध्यक्ष व्लादिमीर पुतिन उत्तर कोरियाच्या दौऱ्यावर आले होते. यावेळी दोन्ही देशांमध्ये एक नवा संरक्षण करार केला. या करारानुसार, जर कुठल्याही देशाने रशिया किंवा उत्तर कोरियावर हल्ला केला तर दोन्ही देशांनी एकत्रितपणे त्या विरोधात लढायचे आहे.

दक्षिण कोरिया, अमेरिका आणि इतर देशांना भीती आहे की रशिया उत्तर कोरियाला अणु आणि क्षेपणास्त्र कार्यक्रमासाठी अत्यंत संवेदनशील तंत्रज्ञान पुरवू शकतो, ज्यामुळे आंतरराष्ट्रीय सुरक्षेवर मोठा धोका निर्माण होऊ शकतो. ही वाढती जवळीक आणि सहकार्य जागतिक स्तरावर नव्या संघर्षांची शक्यता निर्माण करत आहे.

## इस्त्रालयने इराणमध्ये राबवले होते हिजबुल्लाह प्रमुखाच्या हत्येसारखेच ऑपरेशन!

**तेल अवीव, दि.१३ वृत्तसंस्था**

इस्रायलसोबत १२ दिवस चाललेल्या युद्धादरम्यान इराणचे राष्ट्रपती मसूद पेझेश्कियान हे इस्रायली हल्ल्यात जखमी झाले होते, अशी माहिती इराणच्या रिव्होल्युशनरी गार्ड कोअरशी संलग्न असलेल्या फार्स न्यूज एजन्सीने दिली.

१६ जून रोजी इराणची राजधानी तेहरानवर झालेल्या इस्रायली हल्ल्यात राष्ट्रपती पेझेश्कियान जखमी झाले होते. राष्ट्रपती पेझेश्कियान तेहरानमध्ये वरिष्ठ इराणी अधिकाऱ्यांसोबत बैठक घेत असताना हा हल्ला झाला. या हल्ल्यात बैठकीत सहभागी झालेले अनेक जण जखमी झाले होते.फार्स न्यूज एजन्सीच्या वृत्तानुसार, या हल्ल्यामुळे पेझेश्कियान यांच्या पायाला दुखापत झाली. युद्ध सुरू झाल्यानंतर चार दिवसांनी, १६ जून रोजी, तेहरानच्या पश्चिम भागातील एका इमारतीत ही बैठक आयोजित करण्यात आली होती.



इमारतीच्या तळमजल्यावर झालेल्या या बैठकीत इराणचे राष्ट्रपती, संसदेचे अध्यक्ष आणि न्यायपालिकेचे प्रमुख सहभागी झाले होते.इस्रायलने राबवलेले ऑपरेशन हिजबुल्लाहचा प्रमुख हसन नसरल्लाह याच्या हत्येसारखेच होते, असे या वृत्तात म्हटले आहे.

इस्रायलने लेबनॉनमधील इराण-समर्थित दहशतवादी गट हिजबुल्लाहचा तत्कालीन प्रमुख हसन नसरल्लाह याची बेरूत येथील मुख्यालयात हत्या केली होती. हसन नसरल्लाह हे गटाच्या वरिष्ठ कमांडरसोबत भूमिगत मुख्यालयात बैठक घेत असताना त्यांना लक्ष्य करण्यात आले होते. इस्रायलने १२ जून रोजी इराणवर हल्ला केला होता.

## स्वित्झर्लंडचे भारतासोबतच्या व्यापार करारावर शिक्कामोर्तब

**नवी दिल्ली , दि.१३ वृत्तसंस्था**

भारत सरकारने युरोपियन समुदायातील देशांबरोबर युरोपियन मुक्त व्यापार सहकार्य करार केलेला आहे. या कराराला स्वित्झर्लंडने औपचारिक मान्यता दिली आहे. यामुळे स्वित्झर्लंड आणि भारतात दरम्यान व्यापार आणि आर्थिक भागीदारी सहकार्य सुरू होणार आहे. या कराराची अंमलबजावणी ऑक्टोबरपासून होणार असल्याचे स्वित्झर्लंडच्या भारतातील राजदूत माया तिसाफी यांनी सांगितले.

यामुळे भारत आणि स्वित्झर्लंड दरम्यान आयात शुल्क कमी होणार आहे. स्वित्झरलँड मधून भारतामध्ये १०० अब्ज डॉलरची गुंतवणूक काही वर्षात होऊन भारतामध्ये जवळजवळ दहा लाख रोजगार निर्मिती होणार असल्याचे सांगण्यात आले.भारत युरोपियन समुदायादरम्यान जवळजवळ १६ वर्षे चर्चा झाल्यानंतर संबंधित करार झाला होता. या कराराला युरोपियन समुदायातील विविध देशांनी मान्यता दिल्यानंतर संबंधित देशाबरोबर या कराराची अंमलबजावणी होणार आहे.स्वित्झर्लंड संबंधातील कराराची अंमलबजावणी आता ऑक्टोबरपासून सुरू होईल. त्याचबरोबर स्वित्झर्लंडमधील बरीच गुंतवणूक भारतामध्ये उपलब्ध होणार आहे. ज्या देशांनी या करारावर शिक्कामोर्तब केले आहे, त्यामध्ये स्वित्झर्लंड शिवाय आइसलँड. नॉर्वे आणि इतर दोन देशाचा समावेश आहे.स्विझरलँडमधील जवळजवळ ३३० कंपन्या भारतामध्ये इंजीनियरिंग, सेवा, रसायन, औषधी क्षेत्रात कार्यरत आहेत. ज्या कंपन्यांना भारतात गुंतवणूक करण्याची इच्छा आहे त्या कंपन्यांना भारतामध्ये आता पूर्वीपेक्षा अधिक सहज गुंतवणूक करता येऊ शकेल. स्विझरलँडच्या भारतातील वकीलातेमध्ये यासदर्भात एक विशेष विभाग सुरू केला जाणार आहे.यामुळे युरोपातील चार देशाबरोबर भारताचा मुक्त व्यापार करार होणार आहे. या चार देशातील उद्योग भारतामध्ये गुंतवणूक करू शकण आहेत. यामुळे भारताबरोबरच या चार देशांचा फायदा होणार आहे. त्याच दृष्टिकोनातून हा करार करण्यात आला आहे.



## राधिका यादवच्या जिवलग मैत्रिणीने मारेकरी वडिलांचा केला पर्दाफाश

**नवी दिल्ली, दि.१३ वृत्तसंस्था**

टेनिसपटू राधिका यादवची गुरुग्राममधील तिच्या घरात हत्या करण्यात आली. गोळीबार करणारा दुसरा तिसरा कोणी नसून तिचे वडील दीपक यादव होते. दीपक सध्या न्यायालयीन कोठडीत आहे आणि त्याने हे भयानक पाऊल उचलण्यामागील अनेक कारणे पोलिसांना सांगितली आहेत. तथापि, आता राधिका यादवची जिवलग मैत्रीण हिमांशिका सिंगचा एक व्हिडिओ व्हायरल होत आहे, ज्यामध्ये ती दावा करत आहे की तिला राधिकाच्या हत्येचे सत्य माहित आहे.

तिच्या इंस्टाग्राम अकाउंटवर एक व्हिडिओ जारी करताना हिमांशिका म्हणाली, ''मी तुम्हाला राधिका यादवबद्दलचे सत्य सांगेन. राधिका माझी जिवलग मैत्रीण होती. आम्ही गेल्या ८-१० वर्षांपासून खूप जवळ होतो आणि आज मी तिला गमावले. राधिका यादव ही आंतरराष्ट्रीय स्तरावरील टेनिसपटू होती. ती माझी खूप चांगली मैत्रीण होती. ती खूप दयाळू, निरागस आणि चांगली मुलगी होती.'' राधिकाच्या वडिलांनी तिला म्युझिक व्हिडिओसाठी सोडले होते. हिमांशिका म्हणते, ''राधिका गेल्या १८ वर्षांपासून टेनिस खेळत होती. तिला तिचे फोटो काढणे आणि व्हिडिओ बनवणे खूप आवडायचे. हिमांशिका म्हणते की राधिका यादवचे पालक नेहमीच समाजाच्या दबावाखाली होते. '



लव्ह जिहादचा संदर्भ देत हिमांशिका म्हणाली, ''लव्ह जिहादबद्दल चर्चा आहे, पण त्याचा पुरावा कोणाकडेही नाही. राधिका कोणाशीही बोलत नव्हती. राधिकाची अकादमी तिच्या घरापासून १५ मिनिटांच्या अंतरावर होती, पण तरीही तिच्या कुटुंबाने राधिकाला घरी पोहोचण्यासाठी एक वेळ ठरवली होती. तुम्ही तिच्या घरून तिची अकादमी पाहू शकत होता. ती प्रशिक्षक म्हणून खूप चांगली होती. तिच्या सर्व विद्यार्थ्यांना ती आवडायची.

''पुढे व्हिडीओमध्ये तिने, तिच्या वडिलांनी लोकांनी मारलेले टोमणे सहन व्हायचे नाहीत. आजूबाजूचे लोक त्यांना तुमची मुलगी आता मेकअप करायला लागलीय,छोटे कपडे घालायला लागली आहे. मुलीच्या कमाईवर तू जगतोयअसे आणि बरेच काही बोलायचे असे म्हटले आहे. तसेच याच टोमण्यांच्या दबावाखाली राधिकाच्या वडिलांनी तिची हत्या केली असल्याचे सांगत अजून किती दिवस मुलींना समाजाकडून अशी वागणूक मिळणार असल्याचा सवाल देखील हिमांशीकाने केला आहे.

## पाटण्यात भाजप नेत्याचा भरदिवसा गोळ्या झाडून खून

**पाटणा , दि.१३ वृत्तसंस्था**

बिहारची राजधानी पाटणा येथे भाजप नेत्याचा खूनाची घटना घडली आहे. भाजप नेते सुरेंद्र केवट यांना भरदिवसा गोळ्या झाडून ठार करण्यात आले. नामांकित उद्योजक गोपाल खेमका यांची त्यांच्याच घराबाहेर गोळ्या घालून हत्या झाली होती. त्याला आठवडा झालेला नसतानाच या हत्येमुळे राज्यातील कायदा-सुव्यवस्थेच्या स्थितीवर मोठे प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.५२ वर्षीय सुरेंद्र केवट शेखपूरा जिल्ह्यातील शेतामध्ये काम करत असताना, दुचाकीवर आलेल्या दोन अज्ञात हल्लेखोरांनी त्यांच्यावर चार गोळ्या झाडल्या. गंभीर जखमी स्थितीत त्यांना तत्काळ पाटणा येथील एम्स रुग्णालयात हलवण्यात आले, परंतु उपचारादरम्यान त्यांचा मृत्यू झाला. घटनेनंतर भाजप आमदार गोपाल रवीदास आणि माजी मंत्री श्याम रजक यांनी रुग्णालयात भेट देऊन केवट कुटुंबियांचे सांत्वन केले. त्यांनी रुग्णालय प्रशासनास तातडीने शवविच्छेदनाची प्रक्रिया पूर्ण करण्यास सांगितले.

## संसदेच्या पावसाळी अधिवेशनासाठी काँग्रेसची रणनिती

### सोनिया गांधींनी बोलवली बैठक

**नवी दिल्ली, दि.१३ वृत्तसंस्था**

पुढील काही दिवसांतच संसदेचे पावसाळी अधिवेशन सुरू होणार आहे. या पार्श्वभूमीवर काँग्रेसच्या गोटातील हालचाली सुरू झाल्या आहेत. महत्त्वाची बाब म्हणजे, काँग्रेसच्या संसदीय पक्षाच्या सोनिया गांधी यांनी पावसाळी अधिवेशनासाठी पक्षाची रणनीती ठरवण्यासाठी १५ जुलै रोजी एक महत्त्वाची बैठक बोलावली आहे. ही बैठक त्यांच्या १० जनपथ येथील निवासस्थानी होईल. काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे आणि लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांच्यासह पक्षाचे वरिष्ठ नेते या बैठकीला उपस्थित राहतील. संसदेच्या पावसाळी अधिवेशनात विरोधी पक्ष अनेक मुद्द्यांवर सरकारला घेरण्याचा प्रयत्न करणार आहे.



संसदेच्या पावसाळी अधिवेशनासाठी पक्षाची रणनीती अंतिम करण्यासाठी काँग्रेस संसदीय पक्षाच्या नेत्या सोनिया गांधी मंगळवारी एक महत्त्वपूर्ण बैठक घेतील. संसदेचे पावसाळी अधिवेशन वादळी होण्याची अपेक्षा आहे कारण काँग्रेस पक्ष अनेक मुद्द्यांवर सरकारला घेरण्याची योजना आखत आहे.

मागील काही दिवसांपासून खासदार राहुल गांधी बिहारच्या मतदार यादीत फेरफार सुरू असल्याचा आरोप करत आहेत. त्यावरून संसदेत मोदी सरकारला घेरण्याची शक्यता आहे. बिहारमध्ये मतदार यादीची विशेष सघन पुनरावृत्ती करण्याच्या निवडणूक आयोगाच्या निर्णयावर विरोधी पक्षाकडून तीव्र आक्षेप घेतला जाऊ शकतो. विरोधी पक्षांनी याबाबत सर्वोच्च न्यायालयातही धाव घेतली आहे. याशिवाय, पहलगाम हल्ला, ऑपरेशन सिंदूर आणि त्यानंतरच्या राजनैतिक कारवायांवर चर्चा करण्याची मागणी काँग्रेस करत आहे. काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे आणि लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांच्यासह इतर नेते बैठकीला उपस्थित राहणार आहेत.

## कर्नाटकातील घनदाट जंगलात आढळली रशियन महिला

### दोन मुलींसह गुहेत अनेक वर्षे वास्तव्य

**नवी दिल्ली, दि.१३ वृत्तसंस्था**

कर्नाटकमधून एक धक्कादायक माहिती समोर आली आहे. जीथे माणसाचा कधी पायही लागला नाही अशा ठिकाणी एक रशियन महिला कित्येक वर्षांपासून आपल्या दोन मुलींसह राहात होती. उत्तर कन्नड जिल्ह्यातील कुमटा तालुक्यात रामतीर्थ डोंगरांच्या कड्यातील एका गुहेत ही महिला आढळून आली आहे. त्यामुळे कर्नाटकमध्ये खळबळ माजली आहे.

पोलिस गस्त घालत असताना त्यांना काही लहान पावलांचे ठसे जमिनीवर दिसले. त्या पावलांच्या माग काढत पोलीस निरीक्षक श्रीधर आणि त्यांचं पथक गुहेपर्यंत पोहोचलं.तिथे ४० वर्षीय नीना कुटीना नावाची रशियन नागरिक आपल्या मुलींसोबत राहात असल्याचं आढळून आलं.नीना कुटीना हिने भारतात येताच आपलं नाव 'मोहिनी' असं ठेवलेलं होतं. तिच्या दोन मुली ६ वर्षांची प्रेमा आणि ४ वर्षांची आमा तिच्यासोबतच जंगलात राहत होत्या. २०१७ साली गोव्यातून भारतात आलेली नीना, नंतर गोकर्णला पोहोचली आणि तिथून तिने अध्यात्मिक जीवनाकडे वळण्याचा निर्णय घेतला. त्यानंतर तिने जंगलातील नैसर्गिक गुहेतच आपलं निवासस्थान बनवलं. या गुहेमध्येच तिने एक रुद्र मूर्ती स्थापन केली असून, पूजा, ध्यान आणि साधनेत आपला वेळ घालवत असल्याचं ती सांगते. पोलिसांनी ओळख विचारल्यावर सुरुवातीला नीनाने बोलण्यास टाळाटाळ केली. मात्र महिला व बालकल्याण विभागातील कर्मचाऱ्यांच्या आणि स्थानिक साध्वी योगरत्ना सरस्वती यांच्या मध्यस्थीमुळे तिने माहिती देण्यास सुरुवात केली. नीनाने सांगितलं की तिचा पासपोर्ट आणि व्हिसा हरवला आहे. मात्र पोलिसांनी शोध घेतल्यावर तिचे कागदपत्र गुहेच्या आसपासच सापडले. त्यानुसार २०१७ मध्येच तिचा व्हिसा संपलेला असून, ती मागील आठ वर्षांपासून भारतात बेकायदेशीररीत्या राहत असल्याचं निष्पन्न झालं.



हे पत्र मालक,मुद्रक,प्रकाशक आणि **मुख्य संपादक तिक्ष्णगत सुगत वाघमारे** यांनी भास्कर प्रिंटिंग प्रेस एन.एच.६ बोरगाव मंजू येथे मुद्रित करून दै.अजिंक्य भारत, सुगत भवन,बारा ज्योतिर्लिंग मंदिराजवळ, रणपिसेनगर, अकोला येथे प्रकाशित केले.※ **कार्यकारी संपादक-रूबेन डी.वाळके (※पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची)** आरएनआय-MAHMAR/2009/35271

आपले पत्र या मेलवर पाठवावे. आम्ही त्याला प्रसिद्धी देऊ
ajinkyabharat23@gmail.com

# संपादकीय...

## संशयाचे वातावरण

बिहारमधील निवडणुकीच्या आधीच तेथील निवडणूक प्रक्रिया सध्या वादाच्या भोवऱ्यात सापडली आहे. निवडणूक आयोगाने घेतलेला एक निर्णय त्यासाठी कारणीभूत ठरला आहे. त्यावर विरोधी पक्षांनी अनेक प्रकारचे आक्षेप नोंदवले आहेत. निवडणूक आयोगाने बिहारमधील मतदान प्रक्रियेपूर्वी तेथील मतदार यादीचे इंटेन्सिव्ह रिव्हिजन करण्याचे योजले आहे. गेल्या जून महिन्यातच त्याविषयीचा आदेश त्यांनी काढला आणि एका महिन्यात ही प्रक्रिया पूर्ण करण्याचा इरादाही व्यक्त केला आहे. कोट्यवधी मतदारांच्या यादीचे हे पुनरावलोकन केवळ महिनाभरात पूर्ण होणे अशक्य आहे. त्यामुळेच यामागे काहीतरी काळेबेरे आहे, असा विरोधी पक्षांचा आरोप आहे.निवडणूक आयोगाच्या या निर्णयाला काँग्रेस आणि राष्ट्रीय जनता दल या दोन्ही पक्षांनी पहिल्या दिवसापासून विरोध दर्शवला आहे. या मतदार यादीचे पुनरावलोकन करताना मतदारांकडून त्यांच्या जन्माचे प्रमाणपत्र आणि त्यांच्या आई-वडिलांचे जन्म दाखले मागितले गेले आहेत, त्याला जोरदार आक्षेप घेतला गेल्यानंतर यात काही प्रमाणात शिथिलता दिली गेली असली तरी मूळ संभ्रमाचे वातावरण कायम आहे. बिहारमधील विशिष्ट वर्गाला आणि स्थलांतरित मतदारांना मतदान प्रक्रियेपासूनच दूर ठेवण्याचा सत्ताधारी भाजपचा इरादा असून त्यासाठी त्यांनी निवडणूक आयोगाची साथ घेतली आहे, असा जाहीर आरोप सुरू आहे.निवडणूक आयोगाने हे आक्षेप फेटाळून लावले आहेत, त्यांचे म्हणणे असे की दर निवडणुकीतच याद्यांचे असे पुनरावलोकन केले जाते. पण या वेळेला जे पुनरावलोकन केले जाणार आहे त्यासाठी सन २००३ या वर्षाची यादी आधारभूत मानली जाणार आहे. त्यालाही अनेकांचा आक्षेप आहे. मुळात सन २०२४ मध्ये ज्या मतदार यादीच्या आधारे लोकसभेची मतदान प्रक्रिया पार पडली त्याच यादीच्या आधारे विधानसभेची निवडणूक घेणे अवघड नसताना हा प्रश्न निवडणूक आयोग का अवघड करून ठेवत आहे असा मुख्य आक्षेपाचा भाग असून त्यावर निवडणूक आयोगाकडून समाधानकारक उत्तर अद्याप मिळालेले नाही, असे विरोधी पक्षांचे म्हणणे आहे.त्यामुळे बिहारची निवडणूक प्रक्रिया आधीपासूनच वादाच्या भोवऱ्यात सापडली आहे. याआधी महाराष्ट्र आणि हरियाणा या दोन राज्यातील निवडणुकांबाबत काँग्रेस पक्षाने अनेक आक्षेप निवडणूक आयोगाकडे नोंदवले आहेत. त्याची उत्तरेही निवडणूक आयोग समाधानकारकपणे देऊ शकलेला नाही. महाराष्ट्रात इतक्या मोठ्या प्रमाणात मतदारांची संख्या कशी वाढली हा काँग्रेसचा मुख्य आक्षेप आहे. यामुळे प्रत्यक्ष मतदान प्रक्रियेचे सीसीटीव्ही फुटेज आणि मशीन रीडेबल मतदार यादी सादर करावी, अशी मागणी काँग्रेसने निवडणूक आयोगाकडे केल्यानंतर निवडणूक आयोगाने असे पुरावे देण्याचा नियमच बदलला.त्यातून निवडणूक आयोगाच्या भूमिकेवर असलेले आक्षेप अधिकच गंभीर बनले आहेत. निवडणूक झाल्यानंतर निवडणुकीच्या संबंधातील सगळे रेकॉर्ड ४५ दिवसांच्या आत डिलीट करण्याचा निवडणूक आयोगाचा आदेशही वादग्रस्त ठरत आहे. त्यामुळे निवडणूक आयोग सध्या चारही बाजूने टीकेच्या भोवऱ्यात सापडला आहे. निवडणूक आयोगाने काँग्रेस नेत्यांना चर्चेला बोलवण्याचे औदार्य दाखवले, पण काँग्रेसने ज्या माहितीची मागणी निवडणूक आयोगाकडे केली ती माहिती न मिळाल्याने, आम्हाला त्यांच्याशी चर्चा करण्यात काहीही स्वारस्य नाही, असे काँग्रेसने म्हटले आहे. आम्ही घेतलेल्या आक्षेपाला कोणतेही उत्तर किंवा कोणताही डाटा आम्हाला मिळालेला नसताना आम्ही निवडणूक आयोगापुढे जाऊन नेमकी काय चर्चा करणार, आम्ही काय तेथे केवळ चहा प्यायला किंवा निवडणूक आयुक्तांची शेरोशायरी ऐकायला जाणे अपेक्षित आहे काय, असा काँग्रेसचा सवाल आहे.त्यांचे म्हणणे एका अर्थाने खरे आहे. काँग्रेसने मागवलेली माहिती देण्यास तुम्ही टाळाटाळ करीत असाल तर तुमच्याबरोबर चर्चा करण्यात काय अर्थ आहे किंवा तुमच्याबरोबर नेमक्या कोणत्या मुद्द्याबरोबर चर्चा करणे अपेक्षित आहे हे कळत नसल्याने काँग्रेसने या चर्चेच्या प्रस्तावावर नकारघंटा वाजवली आहे. वरील सगळे संदर्भ लक्षात घेतले तर एकूणच हा सगळा वादाचा आणि संशयाचा मामला आहे. निवडणूक आयोग अशा वादाच्या किंवा संशयाच्या भोवऱ्यात सापडणे हे लोकशाहीसाठी चांगले संकेत नाहीत. लोकशाही प्रक्रिया निष्पक्षपणे पार पाडली गेली असा दावा जर निवडणूक आयोग करू इच्छित असेल तर निवडणूक आयोगाने प्रत्यक्ष मतदान प्रक्रिया सुरू होण्याच्या आधी विरोधी पक्षांच्या सर्व आक्षेपांना समाधानकारक उत्तर देणे हे अत्यंत आवश्यक ठरते.हे पाऊल निवडणूक आयोग उचलणार आहे का, हा मुद्दा महत्त्वाचा आहे. निवडणूक आयोग निष्पक्षच असला पाहिजे त्यामुळे आपल्या भोवती निर्माण झालेले संशयाचे ढग दूर करणे ही सर्वस्वी त्यांचीच जबाबदारी आहे. बिहारमधील निवडणुकीच्या आधी काँग्रेस आणि राष्ट्रीय जनता दलाच्या सर्व आक्षेपांना उत्तरे दिली गेली पाहिजेत. त्यावर आमचे समाधान झाले अशी प्रतिक्रिया या दोन पक्षांकडून आली पाहिजे, तरच बिहारमधील निवडणूक निष्पक्ष झाली असा अर्थ निघेल. निवडणूक आयोग हा भारतीय जनता पक्षाच्या हातातील बाहुले नाही, तेथे सर्व राजकीय पक्षांना समान न्याय मिळतो हे आपल्या कृतीने दाखवून देण्याचे काम निवडणूक आयोगाने केले पाहिजे.



विचारमंथन

डॉ. विनय व. दांदळे
९८२२२ ३१७६९

# विद्यादीप की विझलेला दिवा...?



बालक म्हणजे परमेश्वराची प्रतिमा असते. निरागस, निष्पाप, ममत्वाची भूक असलेली... त्याच्या डोळ्यांतून उमटणारी चमक हेच या समाजाचं भविष्य घडवत असतं. पण छावणी येथील विद्यादीप या बालगृहातील प्रकार वाचल्यावर, माणुसकी नावाच्या मूल्यालाही काळाकुट्ट धब्बा लागताना दिसतोय.एतिकडे आपल्या या देशात 'बेटी बचाओ, बेटी पढ़ाओ' अशा घोषणा दिल्या जातात आणि दुसरीकडे त्याच बेटींना वाचवायला कुणीही पुढे येत नाही हे मोठं दुर्दैव आहे. हे बालगृह म्हणजे विद्यादीप की अंधकाराची गुहा असा प्रश्न पडतो ? विद्यादीप हे नाव ऐकल्यावर आपण समजतो की इथे शिक्षण, सुरक्षा, आणि संस्कारांचं पवित्र वातावरण असेल. पण सत्य हे की, या नावातला 'दीप' कधीच पेटला नव्हता, आणि 'विद्या'ची शालीन छाया तिथे कधी उमटलीच नव्हती.या बालगृहात राहणाऱ्या बालिकांना पिण्याचं पाणी मिळत नव्हतं, बाथरूममध्ये घाण आणि दुर्गंधी, रोजचा आहार अत्यल्प आणि पोषणशून्य, आजारी असतानाही औषध न देता दुर्लक्ष हे सगळं वर्तमानपत्रातील बातमी वाचून काही काळ डोळ्यातून पाणी तर येतं, पण त्याहीपेक्षा जास्त मनात चीड निर्माण होते.त्यामध्ये एका मुलीने सांगितले की , '' आम्हाला पाणी प्यायला सुद्धा विचारावं लागतं...कधी नाही मिळत. टॉयलेटमध्ये पाणी नसतं... आणि स्वच्छतेची शिक्षा आम्हालाच. या वाक्यांमध्ये केवळ तक्रार नव्हे, तर उपेक्षेचा शाप दडलेला आहे.
वास्तवाचं हे चित्र म्हणजे उपेक्षेचा काळा इतिहास आहे .विद्यादीप बालगृह स्थापन झाल्यानंतर राज्य शासनाच्या नोंदणीकृत यादीत हे बालगृह होते. दरवर्षी हजारो रुपये या संस्थेसाठी दिले गेले. पण त्या पैशाचं काय झालं...? मुलांच्या अन्नात, शिक्षणात, किंवा वैद्यकीय तपासणीत त्याचा काहीही अंश दिसत नाही. नुकताच त्याचा परवान्याची मुदतही संपली म्हणे आणि पुनर्प्रक्षेपीत केलेली नाही .
विशेष म्हणजे मुलींना विशिष्ट धर्म स्वीकारण्याची चिथावणी देणं, उपोषणासारख्या छुप्या शिक्षा देणं, स्वतःचे कपडे धुण्यास भाग पाडणं, किंवा स्वयंपाकात कामाला लावणं हे सगळं केवळ कायदाविरोधीच नव्हे, तर माणुसकीविरोधी आहे.एका पोलिस अधिकाऱ्याने पत्रकारांना सांगितलं की, '' त्या बालिका एवढ्या शांत होत्या की त्यांचा आवाज ऐकताना फारच अपराधी वाटलं. जणू त्यांनी ओरडायचंच सोडून दिलंय.''कायद्याने संरक्षित पण प्रशासनाकडून वंचित असाच हा प्रकार आहे .भारतीय 'जुव्हेनाइल जस्टिस ॲक्ट' अंतर्गत प्रत्येक अनाथ, वंचित, किंवा अपघाताने वडीलधाऱ्यांपासून दूर गेलेल्या मुलांसाठी काही मूलभूत हक्क दिले गेले आहेत . जसे की , सुरक्षित निवास , सकस आहार , शैक्षणिक संधी , आरोग्य तपासणी आणि वैद्यकीय सेवा , मानसिक आरोग्य व सल्ला , दैनंदिन स्वच्छता सुविधा आणि या सगळ्याच गोष्टी इथे पायदळी तुडवल्या गेल्या. जर हा कायदाच गुन्हेगारांसाठी 'शिफारस पत्र' ठरत असेल, तर समाजाचं काय...?
ज्यांच्यावर जबाबदारी होती, त्यांनीच केली सौदेबाजी केली. या प्रकरणात ज्या महिला प्रमुख आहेत, त्या महिलांनी स्वतःच्या लाभासाठी या निष्पाप मुलींचं शोषण केलं. आश्रयच मागणाऱ्या मुलींना श्रमिक बनवलं गेलं. त्या मुलींच्या नशिबात जेव्हा कोणी आई-बाप नसतो, तेव्हा त्यांच्यासाठी हे बालगृह आईचं घर व्हायला हवं होतं... पण इथे त्यांना मिळालं ते फक्त भिती, उपेक्षा आणि अधांतरी आयुष्य.
आणि ह्यामध्ये प्रशासनाची झोपेची साखळी आहे की कुठल्या प्रकारचा दबाव आहे हेही तपासायला हवे .हे प्रकरण अचानक उघड झालेलं नाही. अनेक वेळा निरीक्षण समितीच्या भेटी झाल्या असतील , ह्यामध्ये जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली त्रैमासिक भेट असते , त्याचा अहवालही असतो पण त्या अहवालांना महत्त्व देण्याऐवजी फाईलच्या ढिगाऱ्यात गाडून टाकण्यात आलं का ? असाही प्रश्न निर्माण होतो.
जिल्हा महिला व बालकल्याण विभाग, जिल्हाधिकारी कार्यालय सगळीकडे केवळ दाखवण्यापुरती कारवाई झाली का ?अश्या प्रकारचे अनेक प्रश्न निर्माण होतात .या प्रकरणात केवळ महिला पोलीस निरीक्षकांच्या सर्जक पद्धतीने झालेली चौकशी आणि तातडीने केलेली अटक हीच एक सकारात्मक गोष्ट म्हणता येईल.आता त्याच नव्हे तर सर्व अनाथ , वंचित बालकांच्या मनात हाच प्रश्न घोंगावत असेल की , कोण वाचवणार त्यांचं बालपण...? ही लहान मुलं आपल्या संरक्षणासाठी राज्याकडे बघतात. समाजाच्या सहवेदनेवर त्यांचा विश्वास असतो. जर समाजानेच त्यांच्याकडे पाठ फिरवली, तर कोण वाचवणार त्यांचं बालपण...?आपण आपापल्या घरी मुलांना स्वच्छ कपडे, पोषणयुक्त अन्न, आणि सुरक्षिततेचं कवच देतो... पण ज्या बालकांना आपण म्हणतो 'आपले देशाचे भविष्य' त्यांना हे सगळं मिळवण्यासाठीही 'आकांत' करावा लागतो हे आपल्या समाजाच्या संस्कृतीसाठी कलंक आहे.
आणि समाजाची भूमिका फक्त संताप करणे एव्हढ्यापुरती पुरेसी नाही .
आपण सगळे या बातमीवर संतापतो, सोशल मीडियावर स्टेटस ठेवतो, बातम्या शेअर करतो आणि मग...? एक आठवड्यानंतर विसरून जातो. अशा संस्था कोण चालवतंय, कुठे काय स्थिती आहे, याचा ठावठिकाणा आपण घेतो का...?''ही घटना ही केवळ विद्यादीपची नाही, ती आपल्या सगळ्यांच्या जबाबदारीचा पराभव आहे.''मुलं रडली, त्यांनी सांगितलं, त्यांच्या डोळ्यांतून एक मौन आक्रोश उमटला आणि शेवटी कुणीतरी ऐकलं. पण ही एक घटना नव्हे. अशी अनेक विद्यादीप बालगृहं या देशात असतील, ज्यांचा 'दिवा' केव्हाच विझला आहे.आपण आता केवळ या प्रकरणात दोषींना शिक्षा झाली पाहिजे असं म्हणत थांबू नये. आपल्याला बालकांच्या संरक्षणासाठी एक सक्रिय, सजग, आणि संवेदनशील यंत्रणा उभी करावी लागेल.
एक प्रश्न आपल्या सगळ्यांसाठी
जर तुमच्या स्वतःच्या घरातल्या मुलीला असं वागवलं असतं, तर तुम्ही काय केलं असतं...? आजच्या घटनेवर आपण प्रतिक्रिया देऊ, राग व्यक्त करू. दोषींना शिक्षा होईलही. पण उद्या दुसरं बालगृह, दुसरी मुलगी आणि नव्या अत्याचाराच्या बातम्या पुन्हा येणार नाहीत याची हमी कोण देणार?बालकांवर अत्याचार ही केवळ गुन्हेगारी नाही, ती एक सामाजिक आत्महत्या आहे.समाजातला विवेक जागा राहावा यासाठी 'विद्यादीप'सारख्या घटनेनंतर प्रत्येक सुजाण नागरिकाने स्वतः ला विचारलं पाहिजे
''मी एका पोरक्या मूलाच्या अश्रूंविषयी खरेच संवेदनशील आहे का, की केवळ बातमी वाचून पुढे सरकणारा एक औपचारिक वाचक....?''



चर्चा

शैला मिर्झापूरे
7218205344

# बोलतो मराठी, पण जपतो का मराठी ?

**सध्या महाराष्ट्रात भाषा आणि शिक्षणाच्या माध्यमावरून पुन्हा एकदा चर्चा सुरू झाली आहे. याच पार्श्वभूमीवर, भारताचे सरन्यायाधीश भूषण गवई यांनी मातृभाषेतून मिळणाऱ्या शिक्षणाचे महत्त्व अधोरेखित केले आहे. महाराष्ट्राच्या विधिमंडळात भाषण करताना ते म्हणाले की, 'मातृभाषेतून शिक्षण घेतल्याने विषयांची समज अधिक पक्की होते आणि शिक्षणासोबतच जे संस्कार रुजतात, ते आयुष्यभर साथ देतात.' हे त्यांचे विधान म्हणजे मराठीच्या भवितव्यावर चिंतन करण्यास लावणारा एक महत्त्वाचा इशारा आहे. केंद्र सरकारने नुकताच मराठीला 'अभिजात भाषे'चा दर्जा दिला आहे. एकीकडे हा गौरव आणि दुसरीकडे आपल्याच घरात मराठीची होणारी गळचेपी, या विरोधाभासावर विचार करण्याची हीच योग्य वेळआहे. मुलांना कोणती भाषा शिकवली जावी, हा मुद्दा तसाही गौण ठरतो. भाषा हे संवादाचे माध्यम आहे. ते व्यापाराचेही प्रभावी माध्यम आहे, हे विसरून चालणार नाही. म्हणूनच राजकारणासाठी केवळ आयुध म्हणून भाषांचा वापर करता येणार नाही.**

कविवर्य सुरेश भट यांच्या शब्दांप्रमाणे, 'लाभले आम्हास भाग्य बोलतो मराठी, जाहलो खरेच धन्य ऐकतो मराठी,' हे केवळ काव्य नाही, तर प्रत्येक मराठी माणसाच्या मनात जपलेला अभिमान आहे. आपण खरोखरच भाग्यवान आहोत, कारण आपली मातृभाषा 'मराठी'आहे. ही मायबोली रांगडी आहे, जशी वळवावी तशी वळते; पराक्रमाच्या कथा सांगताना ती तळपत्या तलवारीसारखी तेजस्वी बनते, विनोदी लेखनात पोट धरून हसवते, तर प्रेमकवितेत फुलासारखी नाजूक होते. अशी सर्व गुणसंपन्न असलेली आपली मराठी, संत ज्ञानेश्वरांच्या 'ज्ञानेश्वरी'पासून ते तुकारामांच्या 'गाथे'पर्यंत, बहिणाबाईंच्या ओव्यांपासून ते कुसुमाग्रजांच्या कवितांपर्यंत आणि आचार्य अत्रेंच्या साहित्यापर्यंत समृद्ध होत गेली आहे. म्हणूनच, जेव्हा संत ज्ञानेश्वर म्हणतात,'माझ्या मराठीचे बोलू कौतुके, परि अमृतातेही पैजा जिंके, ऐसी अक्षरे रसिके मेळवीन'तेव्हा त्यातील आत्मविश्वास आणि गौरव प्रत्येक मराठी माणसाच्या काळजाला भिडतो. भारतातील २२ अधिकृत भाषांपैकी मराठी ही एक भाषा आहे. मराठीला अभिजात भाषेचा दर्जा अलीकडेच मिळालेला आहे. परंतु, २२ पैकी एकाही भाषेला राष्ट्रभाषेचा अधिकृत दर्जा मिळालेला नाही. कार्यालयीन भाषा म्हणून हिंदी आणि इंग्रजीचा वापर केला जातो. मराठी ही भाषा मूळ आर्यांची आहे. अनेक वर्षांचा इतिहास जपणारी मराठी आपली मातृभाषा भारतात सर्वांत जास्त बोलणारी चौथी भाषा आहे. माऊली तर म्हणतात 'ब्रह्म विद्येचे' स्थान मराठीला दिले गेले आहे. १२७८मध्ये माहीम भट्टानी लीळाचरित्र लिहिले. महानुभाव पंथांनी मराठीची मौलिक भर टाकली. एकनाथांनी भारुडे लिहिली.१२९० मध्ये ज्ञानेश्वरांनी 'ज्ञानेश्वरी'लिहिली. १९४७ रोजी राज्यभाषेचा दर्जा मराठीला मिळाला. महानुभाव पंथाने तिच्यात मौलिक भर घातली, छत्रपती शिवाजी महाराजांनी तिला राजभाषेची मुहूर्तमेढ रोवली आणि १९४७ साली तिला अधिकृत राज्यभाषेचा दर्जा मिळाला. आज तीच मराठी अभिजात भाषा बनली आहे. नुकताच केंद्र सरकारने मराठीला अभिजात भाषेचा दर्जा प्रदान केला आहे. पण या गौरवशाली इतिहासाला आज वर्तमानाचा एक वेगळाच आरसा सामोर येत आहे. ही एक मोठी शोकांतिका आहे की, ज्या महाराष्ट्राच्या मातीत मराठी रुजली, वाढली, त्याच मातीतील माणसे आज आपल्या मायबोलीला दूर लोटून इतर भाषांना अधिक महत्त्व देऊ लागली आहेत. विशेषतः इंग्रजी भाषेचे प्रभुत्व हे सुशिक्षितपणाचे आणि उच्चभ्रू असण्याचे प्रतीक मानले जाऊ लागले आहे. मुलांना लहानपणापासूनच इंग्रजीचे बाळकडू पाजले जाते आणि 'माझ्या मुलाला मराठी समजत नाही, त्याला इंग्रजी येते,' हे पालक अभिमानाने सांगतात. यापेक्षा मोठे दुर्दैव ते कोणते? हा केवळ भाषेचा बदल नाही, तर हा संस्कृतीचा आणि भावनांचा ऱ्हास आहे. जिथे मायेचा उगम होतो, ती 'आई' आज 'मम्मी' किंवा 'मॉम'झाली आहे आणि ऊर्जेचा स्रोत असलेले 'बाबा' हे 'डॅड' किंवा 'पप्पा' झाले आहेत. आपण याला आधुनिकतेचे प्रतीक समजतो, पण, या शब्दबदलासोबत आपण आपल्या भावनांमधील ओलावा आणि नात्यांमधील अस्सलपणा तर गमावत नाही ना? ज्या मायबोलीने आपल्याला घडविले, जिने प्रेम, जिव्हाळा, त्याग आणि कर्तव्याचे संस्कार दिले, त्याच मायबोलीला दुय्यम स्थान देणे, म्हणजे आपल्याच मुळांवर घाव घालण्यासारखे आहे.

**हरवत चाललेले शब्द,**
**हरवत चाललेले नाते**

जेव्हा 'आई'या शब्दातला मायेचा ओलावा 'मम्मी' या शब्दात हरवून जातो किंवा 'बाबा' या शब्दातील आधार 'डॅड'मध्ये सापडत नाही, तेव्हा केवळ शब्द बदलत नाहीत, तर त्यामागील संपूर्ण भावविश्व बदलते. मराठी भाषेतील प्रत्येक नात्याला एक विशिष्ट सुगंध आणि वजन आहे. हे शब्द केवळ संबोधने नाहीत, तर ते संस्कारांचे आणि भावनांचे वाहक आहेत. मायबोलीपासून दुरावलेली पिढी केवळ भाषेलाच नाही, तर त्या भाषेतून मिळणाऱ्या प्रेम, आपुलकी, कुटुंब आणि समर्पण या मूल्यांनाही पारखी होते. हा केवळ भाषिक बदल नसून, ही एक मोठी सांस्कृतिक झीज आहे, जिचे परिणाम भविष्यात अधिक गंभीर दिसतील. अर्थात, याचा अर्थ असा नाही की, आपण इतर भाषा शिकू नयेत. माणूस बहुभाषिक नक्कीच असावा, कारण भाषा हे संवाद, प्रगती आणि यशाचे साधन आहे. छत्रपती संभाजी महाराज स्वतः अनेक भाषांचे जाणकार होते, पण त्यांना आपल्या मायबोलीचा प्रचंड अभिमान होता. प्रत्येक भाषेचे स्वतःचे महत्त्व आहे, पण मातृभाषेची जागा दुसरी कोणतीही भाषा घेऊ शकत नाही. कारण जो मायेचा पाझर, जो जिव्हाळा आणि जे संस्कार आईच्या दुधातून आणि मायबोलीच्या शब्दांतून मिळतात, ते इतर कुठल्याही भाषेतून मिळू शकत नाही. आपल्या पाल्याला इतर भाषांमध्ये पारंगत करताना, त्याला त्याच्या मायबोलीपासून तोडू नका. कारण जर त्याला आपल्या मातीचा आणि मायबोलीचा अभिमान नसेल, तर भविष्यात त्याला त्याच्या आई-वडिलांचाही अभिमान वाटेलच, याची खात्री देता येत नाही.

**माय मराठी साद मराठी**
**भाषेचा भाव मराठी**
**बात मराठी साथ मराठी**
**जगण्याचा अर्थ मराठी**

मराठीची महिमा, गंध, संस्कार आणि संस्कृती उत्तरेकडे सातपुडा पर्वतरांगांपासून कावेरीच्या पश्चिम प्रांतापर्यंत तर उत्तरेच्या दमनपासून तो दक्षिणेच्या गोव्यापर्यंत मराठीचा प्रचंड कानाकोपऱ्यातून विस्तार झाला आहे. तरीसुद्धा फार मोठे दुर्दैव या महाराष्ट्राचे असे की मराठीचे गोडवे संपूर्ण जगभरात गायिले जात असले तरी आपण महाराष्ट्रातील मातीतील माणसेच मराठी मायबोली दूर लोटून इतर प्रांतीय भाषांना महत्त्व देऊ लागले आहे. आजवर अनेक प्रतिभावंत झालेत, ज्यांना वेगवेगळ्या भाषांचे ज्ञान होते. छत्रपती संभाजी महाराज बहुभाषिक होते. परंतु मायबोलीचा अभिमान, मायबोलीशी अतूट नाते मायबोलीतून प्रेम, संस्कार, संस्कृती, समर्पण व त्याग त्या शब्दातून जे हृदयाला भिडतं ना ते कुठल्याही पाश्चात्य भाषेतून, संस्कृतीतून मिळू शकत नाही. प्रत्येकच प्रांताची मायबोली वेगवेगळी असते. ती त्यांची जननी आहे. तिचा पाझर इतर कुठल्याही मायबोलीला येऊ शकत नाही. त्याचप्रमाणे माझ्या माऊलीचा पाझर, माझ्या मायबोलीचा गंध, माझ्या माऊलीचा स्पर्श, माझ्या मातीतील संस्कार, माझ्या मातीतील संस्कृती मला महाराष्ट्र सोडला तर कुठेच मिळणार नाही. माझी मायबोली म्हणजे .

**जिजाऊची हिंमत आहे,**
**अत्रेंची गंमत आहे,**
**शब्दातील ओघळणाऱ्या**
**कवितेची किंमत आहे**



प्रासंगिक

नितीन श्रीवास्तव
मो. ९४२१४९४०४०

# 'माँ न होती तो मै न होता...'

जागतिक आरोग्य संघटनेकडून १० जुलै हा दिवस सुरक्षित मातृत्व दिवस म्हणून साजरा केला जातो. स्त्रीच्या गर्भधारणेच्या काळापासून, गरोदरपण व प्रसूतीच्यावेळी आणि प्रसुतीनंतर अर्थात निरोगी व सुदृढ अभ्रकाला जन्म दिल्यानंतर त्याला आवश्यक असणाऱ्या सर्व आरोग्याविषयक सुविधांची मिळणारी हमी व त्यामुळे तिचे मानसिक आरोग्याबरोबरच भावनिक आरोग्याची जोपासना व त्याबरोबरच तिला स्वतःला वाटणारी भावनिक आणि मानसिक दुराक्शितता म्हणजे खऱ्या अर्थाने त्या मातेचे ''सुरक्षित मातृत्व'' होय.''

खर तर मातृत्व हि स्त्रीला निसर्गाने दिलेली अनमोल देणगी आहे. प्रत्येक स्त्रीच्या जीवनात माता, आई होणे फार आनंदाची गोष्ट असते. खर तर या जगात निसर्गाने स्त्रीची उत्पत्ती करून तिला माता होण्याचे जे सौभाग्य दिले त्यामुळेच आज आपणही आहोत. कदाचित आई नसती तर आपणही नसतो असे म्हणायला हरकत नाही. सर्व धर्मात, सर्व जातीत, सर्व पंथात, सर्व जगात आईचे स्थान महत्वाचे आणि श्रध्देचे मानले गेले आहे. आजच्या आधुनिक आणि विज्ञान तंत्रज्ञानाच्या जोरावर आज आपल्या देशाने प्रगतीचे शिखर गाठले आहे, तरी देखील भारतात बालमृत्यू आणि मातामृत्युचे प्रमाण वाढतच चालले आहे. बालमृत्यू आणि मातामृत्यू प्रमाण कमी व्हावे यादृष्टीने शासनही अनेक उपाययोजना करत आहे. खर तर भारतात गर्भधारणेपासून ते बाळाच्या जन्मापर्यंत मातेचे संगोपन हवे त्या प्रमाणात केले जात नाही. आपल्या देशात आजही मुलींचे विवाह १४ ते १६ या वयात मोठ्या प्रमाणात ग्रामीण भागात तसेच आदिवासी भागात लावले जातात. लग्नाच्या एक दोन वर्षातच या अल्पवयीन मुलींना मातृत्व प्राप्त होते. वयाच्या २० वर्षाच्या आत मातृत्व प्राप्त झाल्यास गरोदरपणात किंवा बाळंतपणात धोके स्त्रीच्या जीवाला वाढतात. या दरम्यान मृत्यू होण्याची शक्यता जास्त असते. तसेच अल्पवयीन मातांच्या बालमृत्यूचे प्रमाण देखील जास्त असते. काही वेळी जन्मणारी बालके कमी वजनाची, अपुऱ्या दिवसाची जन्माला येतात. अशा जन्मणाऱ्या बालकांच्या जीवाला देखील जास्त धोका असतो. खर तर मुलींचा विवाह हा वयाच्या १८ वर्षानंतर झाला व मातृत्व २० व्या वर्षी असतांना आले तर हे उदभवणारे धोके आपल्याला टाळता येऊ शकतात. धावपळीच्या व स्पर्धेच्या आजच्या युगात काही वेळा तरुण मंडळींचे विवाह अनेक कारणांमुळे उशीरा होतात. उशिराच्या



वयात अर्थात वयाच्या ३५ वर्षानंतर मातृत्व प्राप्त होणाऱ्या स्त्रीच्या जीवनाला गरोदरपणात तसेच बाळंतपणात अनेक दोष व उणिव निर्माण होऊ शकतात. त्यामुळे उशिराच्या वयात मातृत्व शक्यतो टाळावे.

आपल्या महाराष्ट्रात गरोदरपणी व बाळंतपणाच्या नंतर डिंकाचे लाडू दिले जातात. यात सुकामेवा टाकलेला असतो. यातील तुपातून स्निग्ध पदार्थ व सुक्या मेव्यातून जीवनसत्वे व प्रथिने मिळतात. यातील साखर कार्बोदके देते. हे लाडू जास्तीत जास्त प्रमाणात तयार करून ठेवता येतात. त्यामुळे भूक लागली की त्वरित गर्भवती स्त्रीला उपलब्ध होऊ शकते. गरोदर स्त्रीने रोज कमीत कमी ८ पेले पाणी पिणे, आहार इतकेच महत्वाचे आहे. गरोदर स्त्रियांनी चहा, कॉफी टाळायला हवी, तंबाखू खाऊ नये, सिगारेट किंवा बिडीच्या धुरानेही अपायकारक पदार्थ आईच्या रक्तात जाऊ शकतात व तेथून गर्भापर्यंत पोहचून गर्भातील बाळावर वाईट परिणाम होऊ शकतात.

गरोदर स्त्रियांना नेहमी प्रसन्न राहायला हवे, चांगल्या चांगल्या गोष्टी वाचायला हवे, आध्यात्मिक वाचनाकडे जास्त भर द्यावा. याचा येणाऱ्या बळावर चांगला परिणाम होतो. तसेच आवश्यकतेनुसार विश्राम घेणे पण गरजेचे आहे.

खर तर बलशाली भारत निर्माण करण्यासाठी सशक्त माता आणि सशक्त बालकांची अर्थात भावी पिढी घडविण्यासाठी सुद्रुड बालकांची आवश्यकता आपल्या राष्ट्राला आवश्यकता आहे.

१० जुलै हा दिवस 'मातृ सुरक्षा दिन' म्हणून आपण दरवर्षी साजरा करतो. या अनुषंगाने या दिवशी समाजातील सर्व घटकांनी,संस्थांनी, सामाजिक संस्थांनी तसेच सामाजिक कार्यकर्त्यांनी आपल्या देशातील माता मृत्यू प्रमाणात घट होण्याच्या दृष्टीने सर्व स्तरातून प्रयत्न करावे व शासनाने ज्या योजना यासाठी सुरु केल्या आहेत त्यांची माहिती सर्व स्तरातील लोकांपर्यंत पोहचविणे अत्यंत गरजेचे आहे. समाजात, ग्रामीण भागात तसेच आदिवासी दुर्गम भागात जनजागृती करून मातृसुरक्षेबाबत संदेश देणे गरजेचे आहे. जागतिक मातृसुरक्षा दिनी करणार आहे.

**''वृक्षांचे फायदे अनेक**
**जळतनासाठीच घेतो काय?**
**झाडामुळेच मिळतो प्राणवायू**
**श्वास घेतांनाच मानवा विसरतो**
**काय?''**

खरतर आज वेळ आली आहे आई, माता, जननीच्या सुरक्षे सोबतच आज आपली धरती मातेची सुरक्षा करण्याची वेळ आली आज. आज तर आपण धरती मातेच्या सुरक्षेबाबत पाऊले उचलली नाही तर भविष्यात खूप मोठी हानी आपल्याला सहन करावी लागणार आहे. खरतर आज वेळ आली आहे आई, माता, जननीच्या सुरक्षे सोबतच आज आपल्या धरती मातेची सुरक्षा करण्याची वेळ आली आहे. आज जर आपण धरती मातेच्या सुरक्षेबाबत पाऊले उचलली नाही तर भविष्यात खूप मोठी हानी आपल्याला सहन करावी लागणार आहे.

**''वसुंधरेच्या छत्रछायेत**
**फुलेल डोंगर, दऱ्यांची बाग**
**झाड तोडणाऱ्या मानवाला**
**कधी येईल वृक्ष संवर्धनाची जाग''**

जननी माते सोबतच धरती मातेच्या सुरक्षेबाबत सर्वांनी जागृत राहणे गरजेचे आहे. जननी मातेच्या आणि धरती मातेच्या सुरक्षेसाठी सर्वांनी एकजुटीने प्रयत्न करावे एवढीच या जागतिक मातृ सुरक्षा दिनी अपेक्षा! महान तत्त्वज्ञानी शेक्सपियर यांनी म्हटले आहे की, ''यौवन चला जाता है, प्रेम घट जाता है, मित्रता टूट जाती है लेकीन माता का प्रेम सदा बढता ही रहता है।''



लक्ष्यभेद

जयदीप सोनखासकर
9890508017

## वारसा



**शिवरायांनी दिला आम्हाला**
**शौर्याचा कर्तुत्वाचा वारसा**
**आठवावे लागेल तुम्हाला**
**मावळ्यांच्या दुर्दम्य साहसा**

**युनोस्को जागतिक यादीत**
**किल्ल्यांना मिळाले स्थान**
**हुरळून आपण जाऊ नयेत**
**इतर वाढवावी लागेल शान**

**राज्य शिवरायांच्या विचारांचे**
**राज्यकर्त्यांनो करावे लागेल**
**शेतकरी कष्टकरी जनतेचे**
**ते हित सदैव जपावे लागेल**

## ॥ अभंगवाणी ॥

- प्रवीण हटकर
८०५५२१३२८१

**तुला जसे वाटे**
जगा का ? वाटेल ।
ही गोष्ट कळेल
केव्हा तुला ॥

बा तुझी किंमत
किती ठरविते ।
काम ठरविते
कर्मातुन ॥

जगाला नकोच
वेठीस तू धरू ।
हे नको विसरू
तू न सर्व ॥

तू केलेले कर्म
तुझे शिल्पकार ।
बनती आधार
पुढे तुला ॥

# मुंबई लोकलमध्ये एकमेकांना पाहणाऱ्या दोघांची रंगतदार गोष्ट



आयुष्यात प्रत्येक गोष्ट गमावत असलेली ती, आयुष्यातली प्रत्येक लढाई हरत असलेला तो यांच्या प्रेमकहाणीला आता हिरवा सिग्नल मिळाला आहे. मुंबई लोकल या चित्रपटातून ही प्रेमकहाणी उलगडणार आहे. या चित्रपटाचा टीजर लाँच करण्यात आला आहे. ''मुंबई लोकल'' या चित्रपटाचं दिग्दर्शन अभिजीत यांनी केलं आहे. बिग ब्रेन प्रॉडक्शन्स, आनंदी एंटरटेनमेंट आणि स्प्लेंडिड प्रॉडक्शन्सने या चित्रपटाची निर्मिती केली असून निलेश राठी, प्राची राऊत, सचिन अग्रवाल आणि तन्वी माहेश्वरी यांनी 'मुंबई लोकल' या चित्रपटाची निर्मिती केली आहे. तर त्र्यंबक डागा हे सहनिर्माते आहेत. चित्रपटात अभिनेता प्रथमेश परब आणि अभिनेत्री ज्ञानदा रामतीर्थकर ही जोडी पहिल्यांदाच एकत्र आली असून, मनमीत पेम, पृथ्वीक प्रताप, वनिता खरात, अभिजीत चव्हाण, अनिकेत केळकर, संजय खापरे, संजय कुलकर्णी, स्मिता डोंगरे अशा उत्तम कलाकारांच्या प्रमुख भूमिका आहेत.

# वजन कमी करण्यापासून ते त्वचेपर्यंत वरदान ठरतो पपईचा रस



प्रत्येक दिवसाची चांगली सुरुवात तुमच्या संपूर्ण आरोग्यावर परिणाम करू शकते आणि जेव्हा सकाळच्या आरोग्यदायी सवयींचा विषय येतो, तेव्हा नैसर्गिक रसांचे नाव सर्वात आधी येते. पण तुम्ही कधी पपईच्या रसाला तुमच्या सकाळच्या दिनचर्येचा (मॉर्निंग रूटीन) भाग बनवला आहे का? जर नसेल, तर आता करण्याची वेळ आली आहे. पोषणतज्ञ डॉ. रॉबिन शर्मा यांच्या मते, सकाळी पपईचा रस प्यायल्याने केवळ तुमच्या आरोग्याला अनेक स्तरांवर फायदा होत नाही, तर तुमची त्वचा आतून चमकदार आणि तजेलदार बनते. चला जाणून घेऊया, हे फळ तुमच्या शरीरात कसे चमत्कारी बदल घडवून आणते.पपईमध्ये असलेले पपेन नावाचे एन्झाइम आणि फायबर पचनसंस्था मजबूत करतात. सकाळी रिकाम्या पोटी याचा रस प्यायल्याने बद्धकोष्ठतेसारख्या समस्यांपासून आराम मिळतो.पपई अँटिऑक्सिडंट्स, व्हिटॅमिन सी आणि व्हिटॅमिन ए ने भरपूर असते, जे त्वचेला खोलवर स्वच्छ करते आणि तिला नैसर्गिक चमक देते. रोजच्या सेवनाने काळे डाग (डार्क स्पॉट्स) आणि मुरुमे (पिंपल्स) देखील कमी होऊ शकतात.

पपईमध्ये व्हिटॅमिन सी चे प्रमाण चांगले असते, जे शरीराची रोगप्रतिकारशक्ती वाढवते. बदलत्या हवामानात आजारी पडण्याचा धोकाही कमी होतो.पपईच्या रसात कॅलरी कमी आणि पोषक तत्वे जास्त असतात, ज्यामुळे पोट बराच काळ भरलेले राहते आणि जास्त खाणे (ओव्हरइटिंग) टाळले जाते.सकाळी पपईचा रस प्यायल्याने शरीरातील विषारी घटक (टॉक्सिन्स) बाहेर पडतात, ज्यामुळे किडनी आणि यकृत (लिव्हर) देखील निरोगी राहतात.

**पपईचा रस कसा बनवायचा?**

१ कप पिकलेल्या पपईचे कापलेले तुकडे
अर्धा ग्लास थंड पाणी किंवा नारळाचे पाणी
१ चमचा लिंबाचा रस
चिमूटभर काळी मिरी पूड किंवा आल्याचा छोटा तुकडा. सर्व साहित्य मिक्सरमध्ये टाकून चांगले ब्लेंड करा. फायबरचा पूर्ण लाभ मिळवण्यासाठी रस न गाळता थेट प्या.

# रोगप्रतिकारक शक्ती वाढवण्याच्या क्षमतेसाठी गुणकारी फुलकोबी



फुलकोबी अर्थात फ्लॉवर कोणत्याही ऋतूत उपलब्ध होतो आणि असंख्य प्रकारच्या खाद्यपदार्थात सढळ हाताने वापरला जातो. अर्थात फक्त चविष्ट पदार्थ बनवता येतात म्हणून नाही; तर मानवी शरीराला उपयुक्त अशा अनेक गुणधर्मांमुळे फ्लॉवर अर्थात फुलकोबीचं आहारात महत्त्वाचं स्थान आहे.

फायबर, व्हिटॅमिन सी, व्हिटॅमिन के, व्हिटॅमिन बी ६ आणि फोलेट असे अनेक पोषक घटक फ्लॉवरमध्ये असतात. कॅल्शियम, फॉस्फरस, प्रोटिन, कार्बो हाईड्रेटस्, व्हिटॅमिन्स, आयोडिन, पोटॅशियम यांनी फ्लॉवर समृद्ध असतो. दाह-विरोधी गुणधर्मासाठी आणि रोगप्रतिकारक शक्ती वाढवण्याच्या क्षमतेसाठी फ्लॉवर ओळखला जातो. फ्लॉवरमध्ये व्हिटॅमिन के असतं. त्यामुळे फ्लॉवर हा चयापचय, रक्तातील कॅल्शियम पातळीच्या नियंत्रणासाठी तसंच रक्त गोठण्यासाठी उपयुक्त ठरतो. फ्लॉवरमुळे कोलेस्ट्रॉल नियंत्रित राहण्यास मदत होते. फ्लॉवरमधलं फायबर आणि ओमेगा ३ अॅसिडमुळे 'बॅड कोलेस्ट्रॉल' कमी होण्यास हातभार लागतो.फुलकोबी खाल्ल्याने हृदयरोग, मधुमेहाचा धोका कमी होतो. फ्लॉवरमध्ये भरपूर फायबर असतं. त्यामुळे नियमित खाल्ल्यास पचनास फायदा होतो. वजन कमी करायचं असेल आणि सहजपणे शरीर हायड्रेटेड ठेवायचं असेल तर फ्लॉवर खाणं फायद्याचं.

# आपणचं तयार करा हे महाशब्दकोडे 100

| | | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | | | | |
| ज | | | | | | | | | | | अ | रा | ज | क |
| ल | | | | | | | | | | | | | | |
| पा | | | | | | | | | | | | | | |
| न | | | | | | | | | | | | | गो | |
| | | | | | | | | | | | | | र | |
| | | | | | | | | | | | | | ज | |
| | | | | | | | | | | | | | मु | |
| | | | | | स | दा | व | र्त | | | | | हू | |
| | | | | | | | | | | | | | र्त | |
| | | | | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | | | | |

## हे कोडे कसे सोडवाल

संकेतामध्ये काही शब्द दिलेले आहेत. हे शब्दच योग्यप्रकारे या चौकटीत लिहून हे महाशब्दकोडे आपणचं तयार करा. मदतीकरिता काही शब्द चौकटीत दिलेले आहे.

**संकेत शब्दः—**

**दोन अक्षरी**
- अजा
- काव
- गण
- गात
- गोम
- घण
- जन
- जमा
- टर
- डग्गा
- डव
- डाग
- तम
- ताप
- दगा
- धग
- नदी
- पाप
- पार
- पार
- पावा
- प्रजा
- भार
- मण
- मद
- माह
- मौनी
- लता
- वर्धा
- वर
- वल्ली
- वसा
- सभा
- हळ
- हूप
- हेवा

**तीन अक्षरी**
- आनन
- कमान
- कर्तन
- कोलीत
- कौमुदी
- गजरा
- गारवा
- जनन
- टणक
- तिरपा
- धमनी
- पकड
- पगार
- प्रतीक
- मावशी
- वरण
- वसंत
- सापत्न
- सुगावा

**चार अक्षरी**
- अराजक
- आगबोट
- आवर्तन
- कानशील
- कोल्हापूर
- गालबोट
- घरंदाज
- जलपान
- टरबूज
- तपोवन
- नटराज
- पूर्णाहूती
- बोळवण
- मळवट
- मौनव्रत
- रणगाडा
- वर्धापन
- वनपाल
- सदावर्त
- संगोपन

**पाच अक्षरी**
- अभ्यंगस्नान
- रगडमल्ली
- वसतिगृह

**सहा अक्षरी**
- गोरज मुहूर्त
- नमक हराम

(उत्तर पुढील अंकी)

## मागील महाशब्दकोडेचे उत्तर

| | | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| प | थ | क | र | | शा | क | | ल | ष्क | र | | पं | ग | त |
| ट | र | | | ता | प | | भू | त | | क्त | | च | | |
| | का | ल | व | ड | | आ | ई | | वै | वा | हि | क | ह | क्क |
| को | प | | र्ण | | र | वे | स | | र | हि | त | | र्ष | |
| ल्हे | | अं | | म | | ग | पा | पा | | नी | | प | वा | डा |
| कु | व | त | | जू | न | | ट | व | का | | ज | टा | यु | |
| ई | | र | ख | र | ख | | | न | क | ली | | ई | | सा |
| | क | पा | त | | रा | क्ष | स | | दृ | | भू | त | पू | र्व |
| के | व | ट | | नि | | णि | | पौ | ष्टि | क | | | र | ज |
| | ड | | प | रा | ग | क | ण | | | | ग | स्त | | नि |
| डो | सा | | द | म | ट | | | पा | रा | य | ण | | अं | क |
| | | प्र | | य | | सु | क्ष्म | | णी | | गो | र | ज | |
| यो | गा | यो | ग | | | शि | | न | व | नी | त | | नी | र |
| ज | | ज | | आ | र | क्षि | त | | सा | र | | धा | | म |
| न | य | न | | ट | | त | ल | म | | व | शी | क | र | ण |

Uday Munde - 8446302691

# महाशब्दकोडे 481

| | | | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | | 2 | 3 | | 4 | 5 | | 6 | 7 | | | 8 | | 9 | |
| | | 10 | | | | | | 11 | | | 12 | | | 13 | 14 |
| 15 | 16 | | | | 17 | | 18 | | 19 | 20 | | | | | |
| 21 | | | | 22 | | | 23 | | | | | 24 | 25 | 26 | |
| | | | 27 | | | | | | 28 | | 29 | | | | |
| | | 30 | | | | | | 31 | | 32 | | | | | 33 |
| 34 | | | | | | 35 | 36 | | | | | 37 | | 38 | |
| | | 39 | | 40 | | | | | 41 | | 42 | | | | |
| | 43 | | | | | 44 | | 45 | | | 46 | | | 47 | |
| 48 | | | | | | | | | | 49 | | | 50 | | |
| 51 | 52 | | 53 | | 54 | | 55 | | 56 | | 57 | | | | 58 |
| 59 | | | 60 | | | | | | 61 | 62 | | | | | |
| 63 | | | | | 64 | | | 65 | | | 66 | 67 | | 68 | |
| | | 69 | | 70 | | | 71 | | | | 72 | | | 73 | 74 |
| 75 | 76 | | | | | 77 | | 78 | | | | 79 | 80 | | |
| 81 | | | | 82 | | | | | | 83 | | | | | |

**आडवे संकेत :—**

1) इंद्राचा हत्ती
4) गति, रन
6) पाचांचा समुदाय
8) सभेसाठी आवश्यक असणारी सदस्यसंख्या (इं.)
10) घोड्यावरून फिरायला जाणे
11) जरचा सोबती
12) आंग्लभाषेत मुलगा 13) मुख्य, श्रेष्ठ, वरचढ
15) अतिशय मृदू असे एक प्रकारचे वस्त्र
17) विळा
19) स्वादिष्ट स्वयंपाक करणारा आचारी
21) एखादा विनोद वगैरे घडल्यावर स्मित करणे
22) कासोटा, ओटी, कंबर
23) प्रतिबिंब, शिक्का
24) दुर्दशा, वाईट स्थिती
27) अतिशय जोरात पडणारा पाऊस
29) वैश्वदेवाच्या शेवटी कावळ्यासाठी टाकलेला भाताचा घास
30) पहाटे पहाटे कोंबड्याचे ओरडणे
31) शासन, सत्ता
34) वेल
35) लग्न झालेल्या मुलीला सासरी सासुचा होणारा त्रास
38) दाताच्या कवळीतील शेवटच्या मोठ्या दातांपैकी प्रत्येक
39) प्राथमिक तयारीच्या वस्तू
41) एक खनिज द्रव्य
43) समाजात सुधारणा करु पाहणारा
44) मेजवानीचे निमंत्रण (हिं.)
46) तंबू, रांजण
47) लहान मुलांची मुळाक्षरे लिहिण्याची फळी
49) पृथ्वी
50) मनास वाटणारी स्वस्थता, आनंद
51) कॉम्प्युटर
54) भिन्न वर्णाच्या मिश्रणाने तयार होणारी जात
57) आई—वडिलांशिवाय इतर वडील माणसांना पत्रात लिहावयाचा मायना
59) हिंदीत दुःख
60) गोडी,, आवड, मधुरता
61) गुर्मी, ताठा
63) एक विषम संख्या
64) वाणी,, जिव्हा
65) बायकोची मोठी बहीण
69) वाईट लक्षणे असलेला
71) मनोनिग्रह, दाब
72) निशा, रजनी
73) पृथ्वी, धरणी
75) विरोध करणारा गट
78) गर्व, अहंपणा
79) तीक्ष्ण धार असलेले
81) प्रेम, प्रीती
82) सिनेसृष्टीवर आपल्या सौंदर्याची भुरळ पाडणारी एक जुनी अभिनेत्री
83) भ्रमराचा गुणगुण नाद

**उभे संकेत :—**

2) ओशाळणे, लाजणे
3) एक प्रकारचे भांडे, लहान तपेले
5) वर्तुळ, कडे
6) पेशव्यांच्या अष्ट प्रधानातील प्रत्येक
7) सुत कातण्याचे लाकडी यंत्र
8) कोनाचा अंश मोजणारे उपकरण
9) शरीरावर उगविणारा काळा डाग
12) एक चपळ पण भित्रा प्राणी
14) खूप, पुष्कळ
15) पदवी अथवा पद्व्यूत्तर अभ्यासक्रम शिकविणारे ठिकाण
16) वाळ्याचे अत्तर
17) उंचावरुन खाली पडणे
18) ताणलेला, न वांकणारा, टणक
20) बोटाच्या अग्रभागावरचे हाड
22) एका बालकथेनुसार चपळ सश्याला ६ ाावण्याच्या शर्यतीत हरविणारा प्राणी
25) दूध आटवून केलेला एक खाद्य पदार्थ
26) संसाराविषयी आसक्ती नसलेला, संत
27) श्रीकृष्णाचे एक नाव
28) उंट हाकणारा
29) करणारा
31) मोत्यांची माळ, यश
32) कूर्म, कच्छप
33) धनगर, शेळ्या मेंढ्या पाळणारा
35) सामूहिक
36) श्रीरामाच्या वानरसेनेतील एक सेनापती
37) हिवाळ्यात फुलणारे एक सुवासिक फुलझाड
39) सर्वसामान्य
40) बनावटी, कृत्रिम
42) दुर्दैवाचा फेरा
45) धाकटी मुलगी, हिंदी—मराठी सिनेमासृष्टीतील एक जुनी अभिनेत्री
47) लहान पक्षी, लाक्षणिक अर्थाने सुंदर तरुणी
48) विजोडपणा, अमेळ
50) चांगला आवाज 52) जाणे
53) पक्ष्याची किलबिल
54) संताची वचने
55) राख, रक्षण, 56) धनुष्यबाण
58) कड, बाजू, पंधरवडा
62) डोंगरी किल्ला
65) प्रयत्नावाचून मिळालेला
66) शेत जमिनीवरील कर
67) सूत्रसंचालन करणारा
68) विद्येची देवता, सरस्वती
69) क्षय न पावणारे, अविनाशी
70) कामासाठी विकत घेतलेला मनुष्य
74) करंजी, पुरी इ. पक्वान्नात भरावयाचा मसाला
75) ब्राम्हण 76) परंतु, पैज
77) कब्जा, जप्त, अधिकारात घेणे
80) आवाज, स्वर

(उत्तर पुढील अंकी)

## मागील महाशब्दकोड्याचे उत्तर

| | | | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| व | र्ष | प्र | ति | प | दा | | ग | द्धे | पं | च | वि | शी | | वी | ज |
| यो | | | | द | | मौं | ज | | क्च | | | त | क | | न |
| मा | ता | म | ह | | ध | | क | रा | र | ना | मा | | व | च | क |
| न | र | क | | अ | नु | त्ती | र्ण | | | च | ल | बि | च | ल | |
| | | र | | | र्वा | | | पा | | ता | | | | न | |
| | आ | वृ | त्ती | | त | वा | | ये | ग | ये | ग | स | री | | सा |
| रा | | त्त | | पि | | च | म | चा | | ई | | म | त | ल | ब |
| म | म | | खो | त | | क | | स | मा | ना | र्थ | क | | व | र |
| प | ति | त | पा | व | न | | स | र | | अं | | क्ष | | | म |
| हा | | | | र्ण | | स | र्व | दा | | ग | ट्टी | | पा | व | ती |
| रा | ज | सू | य | | अ | | | र | म | ण | | क | ह | र | |
| | ल | | था | ली | पी | ठ | | | | वा | खा | ण | णी | | अं |
| श | ता | यु | | ला | ल | सा | | खु | रा | क | | ख | | पै | ज |
| | ड | | र | वि | | | आ | ळा | | डे | | र | म | जा | न |
| स | न | ई | | ग्र | स्तो | द | य | | का | | क्षे | | क | र | |
| भा | | | अ | ह | म | | ता | जा | क | ल | म | | र | | |

Uday Munde - 8446302691

# राशी-भविष्य

**मेष :** तुम्हाला वाटेल की वेळ अनुकूल आहे. कुटुंबातील सदस्यांच्या मदतीने काही मोठे काम करता येईल. मालमत्तेशी संबंधित प्रकरणे सोडवता येतील.

**वृषभः** दिवसाच्या सुरुवातीला आळसामुळे काहीही न करण्याचे तुम्हाला वाटेल. महत्वाची कामे प्राधान्याने पूर्ण करा.

**मिथून :** कारखान्यात नवीन यंत्रसामग्री बसवल्याने नफा होईल. वेळ तुम्हाला स्वतःची आणि इतरांची ओळख पटवेल. जोडीदाराच्या वागण्यात बदल होईल.

**कर्क :** तुमच्या चंचलतेमुळे नातेसंबंध कमकुवत होतील. कोणतेही काम करण्यापूर्वी ते समजून घ्या आणि त्यासाठी समर्पित राहा, तरच तुम्ही यशस्वी व्हाल.

**सिंह :** कामे वेळेवर पूर्ण करा. तुमच्या स्वतःच्या जमिनीशी संबंधित काम बराच काळ अडकले आहे, तुम्ही त्याकडे दुर्लक्ष करत आहात.

**कन्या :** कोणतेही काम करण्यासाठी आत्मविश्वास असला पाहिजे. धाडसामुळे मोठे यश मिळेल. घरगुती खर्च वाढतील.

**तुळ :** कामात अडथळे येऊ शकतात. वारंवार बिघडणाऱ्या यंत्रसामग्रीसाठी वास्तुनुसार तुमच्या कामाच्या ठिकाणी बदल केल्याने तुम्हाला फायदा होईल.

**वृश्चिक :** शुभ कामांमध्ये खर्च होईल. विरोधक सक्रिय असतील. व्यवसायाचा विस्तार होईल. नवीन मित्र बनतील. धार्मिक कामांमध्ये रस वाढेल.

**धनु :** कौटुंबिक सुसंवाद राहील. नातेवाईकाच्या मदतीने काम पूर्ण होईल. व्यवसायात बदल होण्याची शक्यता आहे.

**मकर :** तुम्ही तुमच्या व्यवसायावर खूश नाही आहात, कालांतराने परिस्थिती तुमच्यासाठी अनुकूल होईल. जोडीदाराच्या वागण्यामुळे तुमचे मनोबल वाढेल.

**कुंभ :** सहकाऱ्यांशी बोलण्यात सौम्यता बाळगा. परदेशात व्यवसाय सुरू करण्याचा विचार यशस्वी होईल. नोकरी बदलण्याची शक्यता आहे. एखाद्याच्या शिफारशीने काम करता येईल.

**मीनः** हा काळ फायदेशीर आहे. उद्देशपूर्ण प्रवास फायदेशीर ठरेल. आज महत्वाचे करार होऊ शकतात.

आचार्य पं. श्रीकांत पटैरिया: मो. ७८७९३७२९१३

## थोडक्यात

### बी.आर. हायस्कूलच्या मित्रांनी जपले स्वर्गीय मित्र प्रेम: निलेशच्या मुलाच्या शिक्षणाची घेतली जबाबदारी

**अकोला:** मैत्री आणि माणुसकीचं एक अनोखं उदाहरण बी.आर. हायस्कूलच्या १९९८ च्या बॅचमधील विद्यार्थ्यांनी घालून दिलं आहे. शालेय जीवनात एकमेकांवर जीवापाड प्रेम करणाऱ्या या मित्रांनी, आपल्या अकाली निधन झालेल्या मित्राच्या मुलाच्या शिक्षणाची संपूर्ण जबाबदारी स्वीकारून एक आदर्श निर्माण केला आहे.शाळेनंतर वेगवेगळ्या क्षेत्रांत विखुरलेले हे मित्र, स्व. निलेश निंबेकर आणि डॉ. विक्रांत इंगळे यांच्या प्रयत्नांमुळे व्हॉट्सअ‍ॅप ग्रुपच्या माध्यमातून पुन्हा एकत्र आले. सर्व काही सुरळीत सुरू असताना, अचानक निलेश निंबेकरचं अल्पशा आजाराने निधन झालं. एकुलता एक मुलगा आणि दोन लहान मुलांचा बाप असलेल्या निलेशच्या निधनाने मित्र परिवारावर दुःखाचा डोंगर कोसळला.त्यावेळी, सर्व मित्रांनी एकमताने निलेशच्या कुटुंबाला आयुष्यभर मदत करण्याचं वचन दिलं. याच वचनपूर्तीचा एक भाग म्हणून, दरवर्षी डॉ. महेश बोबडे, विवेक डोन्डफळे, अजय भटकर, तुकाराम मोरे, शैलेंद्र बसवनाथे, आनंदकुमार चौधरी, डॉ. विक्रांत इंगळे, श्रीकांत पोधाडे, नितीन अवचार आणि विश्वास पाटील हे सर्व मित्र एकत्र येतात. ते पैसे जमा करून, स्व. निलेशचा मुलगा शिवांशच्या वाढदिवसाचं औचित्य साधून त्याच्या शिक्षणासाठी आर्थिक मदत करतात. त्यांच्या या सहभागामुळे निलेशच्या कुटुंबाचा आनंद द्विगुणित होतो.हे केवळ मित्रप्रेम नसून, माणुसकी आणि निस्वार्थ भावाचं एक अनोखं उदाहरण आहे. बी.आर. हायस्कूलच्या या मित्रांनी समाजात एक प्रेरणादायी आदर्श निर्माण केला आहे.

### राधानगर, कॅम्प परिसरात बांधकाम स्थळावरून साहित्याची चोरी

**अमरावती :** कॅम्प परिसरात सुरू असलेल्या बांधकाम स्थळावरून अंदाजे १७ हजार ५०० रूपयांचे प्लंम्बींगचे साहित्य अज्ञात चोरट्याने चोरून नेल्याची घटना ११ जुलै रोजी घडली. याप्रकरणी गौरव खत्री यांच्या तक्रारीवरून गाडगेनगर पोलीस ठाण्यात अज्ञात चोरट्याविरूध्द गुन्हा दाखल करण्यात आला. तर दुसरी घटना राधानगरात उघडकीस आली. नवीन बांधकाम स्थळावरून ४ क्विंटल लोखंडी सळाखी किंमत अंदाजे १९ हजार ६०० रूपयांचा मुद्देमाल अज्ञात चोरट्याने चोरून नेल्याची घटना ११ जुलै रोजी घडली. याप्रकरणी संतोष उत्तमराव ठाकरे रा. अमरावती यांच्या तक्रारीवरून गाडगेनगर पोलीस ठाण्यात अज्ञात चोरट्याविरूध्द गुन्हा दाखल करण्यात आला.

### अकोल्याच्या वसंत बाछूका यांची कॅटच्या विदर्भ चेअरमनपदी निवड

**अकोला:** भारतीय जनता पक्षाचे जिल्हा कोषाध्यक्ष आणि विविध क्षेत्रात सक्रिय असलेले उद्योजक वसंत बाछूकायांची ऑल इंडिया व्यापारी संघटना (कन्फ ेडरेशन ऑफ ऑल इंडिया ट्रेडर्स कॅट) च्या विदर्भ विभागाच्या चेअरमन पदी निवड करण्यात आली आहे. कॅट संघटनेच्या माध्यमातून व्यापाऱ्यांच्या समस्या व मागण्या सातत्याने केंद्र आणि राज्य शासनाकडे प्रभावीपणे मांडल्या जातात. विदर्भातील व्यापाऱ्यांचे प्रतिनिधित्व करणारी ही जबाबदारी आता अकोल्याकडे आली असून व्यापारी वर्गामध्ये समाधान व्यक्त होत आहे.वसंत बाछूकायांना सामाजिक, धार्मिक, शैक्षणिक आणि बँकिंग क्षेत्रातील प्रदीर्घ अनुभव असून, ते एक विश्वासू आणि लोकप्रिय व्यापारी नेते म्हणून परिचित आहेत. त्यांची ही निवड विदर्भ व्यापाऱ्यांच्या समस्यांच्या सोडवणुकीसाठी एक महत्त्वाचा टप्पा ठरणार आहे.त्यांच्या निवडीबद्दल खासदार अनुप धोत्रे, पालकमंत्री ना. आकाश फुंडकर, आमदार रणधीर सावरकर, आमदार प्रकाश भारसाकळे, आमदार वसंत खंडेलवाल यांच्यासह हरी शिंपले, किशोर पाटील, विजय अग्रवाल, निकेश गुप्ता, संतोष शिवरकर, जयंत मसने, गिरीश जोशी, तेजराव थोरात, कृष्णा शर्मा, माधव मानकर यांनी त्यांचे अभिनंदन केले आहे.व्यापाऱ्यांच्या हितासाठी त्यांनी प्रभावी कार्य करावे, अशी अपेक्षा व्यक्त होत असून अकोल्यातून विदर्भाचे प्रभावी नेतृत्व घडेल, असा विश्वास व्यापारी व औद्योगिक क्षेत्रात निर्माण झाला आहे.

### गुरु पौर्णिमेनिमित्त श्री सत्य साई सेवा समिती अकोला येथे सांस्कृतिक कार्यक्रम

**देवरी :**अवघ्या महाराष्ट्रामध्ये गुरुपौर्णिमा ही अध्यात्मिक क्षेत्रातील पवित्र मानले जाते त्यानिमित्तानेश्री सत्यसाई सेवा समिती सेवा स्वरूपामध्ये पूर्ण जगामध्ये काम करते या संस्थेचे मूळ तत्व जनसामान्यांना न्याय व जनकल्याण हा उदात्त हेतू ठेवून आजही समिती कार्यरत आहे. पार पडलेल्या गुरु पौर्णिमेच्या दिवशी श्री सत्यसाई सेवा समिती अकोला यांच्यावतीने साई कुलवंत हॉलमध्ये ह भ प सांप्रदायिकते मधीलकिर्तनकारांचीपरंपरा कायम ठेवून त्याला अधिक वाव मिळावा अनेक नामवंत कीर्तनकार निर्माण व्हावे व सांप्रदायिकतेचा मूहूर्तमेढ वाढावी या उदात्त हेतूने हा कार्यक्रम राबविण्यात आला यामध्ये सांस्कृतिक कार्यक्रमातील गवळणी. गोंधळ .आणि भारुड असे विविध कार्यक्रम बाल विद्यार्थी विद्यार्थिनी यांच्या माध्यमातून सादर करण्यात आले.

तेव्हा सर्व विद्यार्थ्यांचा मानसन्मान सुद्धा श्री सत्यसाई सेवा समितीच्या वतीने पार पाडण्यात आला. श्री सत्यसाई सेवा समिती.महाराष्ट्राचे आध्यात्मिक अध्यक्ष नितीन देशपांडे व जिल्हाध्यक्ष किशोर रत्नपारखी प्रवीण प्रशांत जोशी दिनेश दहिकर मानवी समितीचे जावरकर गुरुजी सत्यसाई सेवा समितीचे प्रसिद्धीप्रमुख सुनील सरोदे..अश्विनीताई मेहरे स्वाती घाडगे, सीमा देशपांडे यांनी हा कार्यक्रम यशस्वी पार पाडण्याकरता मोलाची कामगिरी बजावली.

# आमदारांचा ताफा रस्त्यातच अडवला

## साहेब, आधी रस्ता करा, उमरीच्या महिलांचा आक्रोश

दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी

**आर्णी, दि. १३ :** रस्त्यांवरील खड्ड्यांनी आणि प्रशासनाच्या दहा वर्षांच्या दुर्लक्षाला कंटाळलेल्या उमरी इजारा येथील महिलांनी, आमदार राजू तोडसाम यांचा ताफा थेट रस्त्यातच अडवून आपला रोष व्यक्त केला. 'साहेब, आधी आमचा रस्ता करा, मगच पुढे जा,' अशी आक्रमक भूमिका घेत, सामाजिक कार्यकर्त्या अश्विनी देशमुख यांच्या नेतृत्वात, महिलांनी आमदारांना निवेदन देऊन आपल्या नरकयातनांचा पाढा वाचला. या अनोख्या आंदोलनाने प्रशासनाची झोप उडवली आहे.



शनिवारी (दि. १२), आमदार राजू तोडसाम यांचा ताफा उमरी इजारा येथून जात असताना, अश्विनी देशमुख यांच्या नेतृत्वात शेकडो महिला आणि ग्रामस्थांनी ताफा अडविला. 'गेल्या दहा वर्षांपासून आम्ही या खड्डेमय रस्त्यावरून जीवघेणा प्रवास करीत आहोत.' 'पावसाळ्यात तर या रस्त्यावर चालणे म्हणजे 'काट्यांवरील कसरत' करण्यासारखे आहे,' अशी व्यथा त्यांनी मांडली. दरवर्षी, ग्रामपंचायत मुरूम टाकून थातुरमातूर काम करते, पण पहिल्याच पावसात तो वाहून जातो.

'रात्री-अपरात्री एखादा रुग्ण किंवा गरोदर महिलेला शहरात न्यायचे झाल्यास, जीव मुठीत धरून वाहने चालवावी लागतात,' असे सांगत, महिलांनी या समस्येचे गांभीर्य आमदारांच्या लक्षात आणून दिले. 'आता तुम्हीच तुमच्या आमदार निधीतून हा रस्ता कायमस्वरूपी डांबरीकरण किंवा सिमेंटचा करून, आम्हाला या त्रासातून मुक्त करा,' अशी मागणी त्यांनी केली.

### दहा वर्षांपासून भोगतोय 'नरकयातना'

उमरी इजारा येथील हा मुख्य रस्ता, गेल्या दहा वर्षांपासून अत्यंत खराब अवस्थेत आहे. हिवाळा आणि उन्हाळ्यात खड्ड्यांमुळे त्रास होतो, तर पावसाळ्यात या रस्त्याचे रूपांतर चिखलाच्या डबक्यात होते. शाळकरी विद्यार्थी, वृद्ध आणि महिलांना याचा सर्वाधिक फटका बसत आहे. थोडा जरी पाऊस आला, तरी खड्डे पाण्याने तुडुंब भरतात, ज्यामुळे अपघातांचा धोका मोठ्या प्रमाणात वाढला आहे.

या निवेदनावर माया जाधव, सुनंदा आत्राम आणि वंदना राठोड यांच्यासह अनेक महिलांच्या स्वाक्षऱ्या आहेत. या आंदोलनाचे नेतृत्व सामाजिक कार्यकर्त्या अश्विनी देशमुख यांनी केले. त्यांच्यासोबत माया जाधव, सुनंदा आत्राम, वंदना राठोड, अनिता जाधव, रेखा राठोड, आशा पवार, सुनीता राठोड, शारदा पवार, पूर्णा जाधव, नंदिनी जाधव, गुंफा राठोड, सोनू जाधव, आशा करपते, अश्विनी भगत, विद्या आडे, मैना खेकाळे, रत्ना, सुनीता धोटे, उषा मेश्राम, नंदा कांबळे, कवशा राठोड, शोभा तुवर, विद्या शिलोटे, तसेच किशोर राठोड, विश्वास पवार आणि अशोक राठोड यांच्यासह अनेक ग्रामस्थ उपस्थित होते.

## शिवाजी महाराजांचे किल्ले जागतिक वारसा यादीत समावेशाचा जल्लोष !

दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी

**वाशिम, दि. १३ :**छत्रपती शिवाजी महाराज यांचा ऐतिहासिक आणि सांस्कृतिक वारसा असलेले १२ गड-किल्ले युनेस्कोच्या जागतिक वारसा यादीत समाविष्ट झाल्याची घोषणा होताच, वाशिम शहरात भारतीय जनता पार्टीच्या वतीने जल्लोष करण्यात आला. संपूर्ण शहरात शिवप्रेमी, नागरिक, कार्यकर्ते यांनी एकत्र येऊन अभिमानाने आणि आनंदाने या ऐतिहासिक क्षणाचा उत्सव साजरा केला.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्याचे आणि दृढ इच्छाशक्तीचे हे यश आहे. २०१४-१५ मध्ये मुख्यमंत्रीपदाची सूत्रे स्वीकारल्यानंतर त्यांनी प्रथमच छत्रपतींच्या गडकोटांना जागतिक वारसा दर्जा मिळवून देण्याचा संकल्प व्यक्त केला होता. २०१८ साली केंद्रीय



संस्कृती मंत्रालयाच्या समन्वयाने या प्रक्रियेला गती देण्यात आली आणि डिसेंबर २०२३ मध्ये अंतिम प्रस्ताव युनेस्कोकडे सादर करण्यात आला.

राज्य सरकार, पुरातत्त्व विभाग व इतिहासतज्ज्ञांच्या संयुक्त प्रयत्नांतून युनेस्कोने अखेर ११ जुलै २०२५ रोजी छत्रपती शिवाजी महाराजांचे १२ किल्ले जागतिक वारसा यादीत समाविष्ट केल्याची घोषणा केली.

या १२ किल्ल्यांची यादी पुढीलप्रमाणे: रायगड, राजगड, प्रतापगड, शिवनेरी, विजयदुर्ग, सुवर्णदुर्ग, खांदेरी, जिंजी, पन्हाळा, लोहगड, साल्हेर आणि सिंधुदुर्ग या ऐतिहासिक निर्णयामुळे संपूर्ण महाराष्ट्राचा, विशेषतः शिवप्रेमींचा ऊर अभिमानाने भरून आला आहे.

वाशिम शहरात पार पडलेल्या जल्लोष कार्यक्रमाचे आयोजन आमदार श्याम खोडे यांच्या मार्गदर्शनामध्ये तथा जिल्हाध्यक्ष पुरुषोत्तमची चितलांगे यांच्या उपस्थितीमध्ये भाजपा शहराध्यक्ष मनिष मंत्री यांच्या अध्यक्षतेखाली करण्यात आले. कार्यक्रमात भाजपा पदाधिकारी, युवा मोर्चा, महिला मोर्चा, शिवप्रेमी, हिंदवी स्वराज्य परिवार, गजानन मेसरे सर तसेच शिव प्रतिष्ठानचे गणेश गायकवाड व इतर पदाधिकारी बजरंग दल, विश्व हिंदू परिषद आणि विविध हिंदुत्ववादी संघटनेचे पदाधिकारी व असंख्य नागरिकांनी उत्स्फूर्त सहभाग घेतला.

## कामगार कल्याण मंडळाच्या जलतरण तलाव प्रकल्पात कोट्यवधींचा घोटाळा?

दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी

**अमरावती , दि. १३ :**कामगार कल्याण मंडळाच्या नागपूर व प्रभादेवी (मुंबई) येथील जलतरण तलाव दुरुस्ती व नूतनीकरण प्रकल्पावर १२ कोटींहून अधिक निधी खर्च करूनही हे प्रकल्प सदोष, निकृष्ट व अपूर्ण अवस्थेत बंद आहेत. मात्र, मंडळाचे कल्याण आयुक्त रविराज इळवे यांनी काम पूर्ण झाल्याचे खोटे प्रमाणपत्र देत संबंधित ठेकेदारांना कोट्यवधींची बिले मंजूर केली, असा गंभीर आरोप संवेदना फाऊंडेशनचे अध्यक्ष विनोद चाळके यांनी केला आहे.

त्यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे निवेदनाद्वारे .. मार्फत चौकशीची मागणी केली असून, कल्याण आयुक्त इळवे यांना निलंबित करून त्यांच्या कार्यकाळातील गैरव्यवहाराची व आर्थिक नुकसानीची वसुली करण्याची मागणीही केली आहे.

जलतरण प्रकल्पाच्या देखरेखीची जबाबदारी क्लोरीनेशन इंजिनियर्स (नागपूर) व अलोक एक्का इंजिनियर्स (मुंबई) या ठेकेदार संस्थांकडे असून त्यांनी कराराचे उल्लंघन करत प्रकल्प अक्षरशः उध्वस्त केल्याचा आरोप निवेदनात आहे. प्रकल्प बंद असल्याने मंडळाचे आर्थिक उत्पन्न ठप्प झाले असून हजारो कामगार जलतरणपटूंना सुविधा मिळालेल्या नाहीत.

चाळके यांनी कल्याण आयुक्त इळवे यांची प्रतिनियुक्तीही नियमबाह्य असल्याचा मुद्दा उपस्थित केला असून, त्यांच्या कार्यकाळात मंडळाचा कारभार कोसळल्याचे स्पष्ट केले. त्यांनी दोन्ही ठेकेदार संस्थांना काळ्या यादीत टाकण्याची, दोषींवर गुन्हे दाखल करण्याची आणि कामगार मंत्रालयाने तातडीने हस्तक्षेप करण्याची मागणी केली आहे.

## जन आक्रोश मोर्चात हजारोच्या संख्येने शेतकऱ्यांनी सहभागी व्हावे

### माजी मंत्री डॉ राजेंद्र शिंगणे यांचे आवाहन

दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी

**सिंदखेडराजा, दि. १३ :** येत्या १४ जुलैच्या जन आक्रोश मोर्चात हजारोच्या संख्येने शेतकऱ्यांनी सहभागी व्हावे, असे आवाहन माजी मंत्री डॉ राजेंद्र शिंगणे यांनी केले आहे.

शहरात १४ जुलै रोजी जनआक्रोश मोर्चा संदर्भात आज ११ जुलै रोजी शिवाजी नगर टी पॉईंट येथे आयोजन बैठक पार पडली. त्या वेळी ते बोलत होते. महाविकास आघाडीचा हा जनआक्रोश मोर्चा १४ जुलै रोजी होणार आहे. सुरुवातीला शिवाजी नगर टी पॉईंट येथून निघून उपविभागीय कार्यालयावर जाणार आहे. या मोर्चात शेतकऱ्यांची संपुर्ण कर्जमुक्ती करावी, पीकविमा भरण्यासाठी जाचक अटी शिथील कराव्या, शेतरस्ता, पांधनरस्ता नवीन मंजुर करणे व मंजुर कामे त्वरीत सुरु करावे, शेतीसाठी दररोज १२ तास वीज पुरवठा करण्यात यावा, काळा बाजार थांबवुन शेतकऱ्यांना बियाणे, रासायनिक खते, उपलब्ध करुन द्यावे,



शेतमालाला उत्पादन खर्चावर आधारित रास्त भाव देण्यात यावा, अतिवृष्टीमुळे सुलतानपुर, अंजनी मंडळात नुकसान झालेल्या शेतीसाठी भरीव मदत देण्यात यावी, मंजुर पीककर्ज त्वरीत वाटप करावे, शेती विजबील माफ करावे, वन्यप्राण्यांमुळे होणारी नुकसान भरपाई मिळावी व वन्य प्राण्यापासुन संरक्षणासाठी जाळी कंपाऊंड मिळावे, संरक्षण जाळी १०० टक्के अनुदानावर द्यावी,तुषार आणि ठिबक थकीत अनुदान त्वरीत मिळावे, साखरखेर्डा तालुका निर्मिती करावी, लाडकी बहिण योजनेचे अश्वासित २१०० रुपये महिना द्यावा, मातृतीर्थ सिंदखेड राजाचा प्रलंबीत २३३ कोटीचा विकास आराखडा त्वरीत मंजुर करावा, राष्ट्रमाता जिजाऊ नवनगर (स्मार्टसिटी) प्रकल्पास त्वरीत मंजुरात देण्यात यावी, समृध्दी इंटरचेंजवर माँ जिजाऊ बालशिवबासह पुतळा बसविण्यात यावा, जालना खामगांव रेल्वेमहामार्ग प्रलंबित कामास चालना द्यावी,या मागण्यासाठी जनआक्रोश मोर्चाचे आयोजन केले आहे तरी सर्व शेतकरी बांधवांनी मोर्चात सहभागी व्हावे, असे आवाहन माजी मंत्री डॉ राजेंद्र शिंगणे यांनी केले आहे.

## 'ऑपरेशन प्रहार'अंतर्गत अकोल्यात दारूसाठा जप्त; ८५ हजारांचा मुद्देमाल, एक अटकेत

दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी

**अकोला, दि. १३ :** अवैध धंद्यांना आळा घालण्यासाठी अकोला जिल्ह्यात सुरू असलेल्या ''ऑपरेशन प्रहार'' मोहिमेअंतर्गत स्थानिक गुन्हे शाखेने केलेल्या कारवाईत ८५ हजार ३६० रुपयांचा देशी व विदेशी दारूचा साठा तसेच वाहनासह मुद्देमाल जप्त करण्यात आला. या कारवाईत एकाला अटक करण्यात आली आहे.

पोलीस अधीक्षक अर्चित चांडक यांच्या आदेशानुसार व अपर पोलीस अधीक्षक अभय डोंगरे व पोलीस निरीक्षक शंकर शेळके यांच्या मार्गदर्शनाखाली ही धडक कारवाई पार पडली.

स्थानिक गुन्हे शाखेला मिळालेल्या गुप्त माहितीनंतर दि. १२ जुलै २०२५ रोजी पोलीस निरीक्षक शेळके यांच्या निर्देशावरून पथकाने रामदासपेठ पोलीस ठाणे हद्दीत गुरुद्वाऱ्याजवळ छापा टाकला. या कारवाईत नरेश



श्रीकृष्ण तेलगोटे (वय २४, रा. मच्छी मार्केट, अकोट फाईल) याच्याकडून प्रत्येकी १८० एमएल चे १९२ सीलबंद कॉटर्स (कींमत १५,३६० रुपये), तसेच होंडा ॲक्टिवा (एम एच३० बी जे ०२१५, अंदाजे किंमत ७० हजार असा एकूण ८५ हजार ३६० रुपयांचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला. या प्रकरणी आरोपीविरुद्ध महाराष्ट्र दारूबंदी अधिनियम १९४९ मधील कलम ६५ (ई) अंतर्गत रामदासपेठ पोलीस ठाण्यात गुन्हा नोंदविण्यात आला आहे. सदर कारवाई पोलीस उपनिरीक्षक पठान, पोलीस अंमलदार उमेश पराये, शेख हसन, पोलीस कर्मचारी श्रीकांत पातोंड व अभिषेक पाठक या स्थानिक गुन्हे शाखेच्या अधिकारी व अंमलदारांनी यशस्वीरीत्या पार पाडली.''ऑपरेशन प्रहार'' अंतर्गत पुढील काळातही अशा अवैध धंद्यांवर पोलिसांची कारवाई सुरूच राहणार असल्याचे प्रशासनाने स्पष्ट केले आहे.

# लुटीचा हिशोब मागायला या! शेतकरी कर्जमाफीच्या लढ्यात आंबोड्याची सभा ठरणार ऐतिहासिक

दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी

### संतप्त शेतकऱ्यांचा लाठी-रूमण्यासह एल्गार

**अंबोडा, दि. १३ :** बच्चू कडू यांच्या 'सातबारा कोरा कोरा' पदयात्रेचा आज सातवा दिवस. राज्य सरकारच्या खोट्या घोषणा आणि फसव्या योजनांचा हिशोब मागण्यासाठी हजारो शेतकरी अंबोड्यावर लाठी, काठ्या आणि रूमणे घेऊन एकत्र होत आहेत.

शेतकरी कर्जमाफीच्या लढ्याचं हे निर्णायक युद्ध ठरणार असून, आंबोड्याची सभा ऐतिहासिक जनसागराचं रूप धारण करणार आहे.

शासनाच्या दुर्लक्षानं फुललेल्या या चळवळीला आता उद्धव बाळासाहेब ठाकरे गटाचे आमदार भास्कर जाधव, राष्ट्रवादी काँग्रेसचे आमदार रोहित पाटील आणि महाराष्ट्र भूषण संत सत्यपाल महाराज यांचा जाहीर पाठिंबा व उपस्थिती मिळणार आहे. लढ्याला आता राजकीय आणि सामाजिक बळ मिळालं आहे.



**'सरकारने डोळ्यावर पट्टी बांधली आहे आम्ही ती फाडायला निघालोय!''**

कर्जमाफीसाठी, शेतकऱ्यांच्या हक्कासाठी आणि दिव्यांगांच्या न्यायासाठी बच्चू कडूंसह शेकडो शेतकरी आणि दिव्यांग बांधव डोळ्याला काळ्या पट्ट्या बांधून, हातात विळा आणि रूमण घेऊन अंबोड्याच्या दिशेने पायदळ निघाले आहेत.

### आम्हाला पगार नाही, हमीभाव नाही पण आता आवाज आहे!

शासनाची लेखणी जर खोटी असेल, तर रूमण सरसावले जाईल. शासनाचे धोरणं जर अंधळी असतील, तर पट्ट्या बांधूनच सरकारला आरसा दाखवला जाईल. हे फक्त आंदोलन नाही हा आत्मसन्मानाचा लढा आहे!

**बच्चू कडू म्हणतात..**

''सरकारनं डोळ्यावर पट्टी बांधली आहे. त्यांना ना शेतकऱ्यांचं दुःख दिसतं, ना दिव्यांगांची वेदना! आम्ही त्यांचे डोळे उघडण्यासाठी प्रतीकात्मक आंदोलन करत आहोत. हे सगळे प्रश्न घेऊन राज्यभरातून शेतकरी अंबोड्यावर धडकणार आहेत. ही सभा म्हणजे जनतेच्या क्रांतीचा प्रारंभ आहे.

### शासनदडपशाहीचे डाव गावागावात पोलीस पाटलांचे दडपण

यवतमाळ जिल्ह्यातील काही गावांत पोलीस पाटील आणि स्थानिक लोकप्रतिनिधींच्या माध्यमातून आंदोलन दडपण्याचा प्रयत्न सुरू आहे. शेतकऱ्यांनी सभेत सहभागी होऊ नये म्हणून धमक्या, दबाव आणि भीती निर्माण केली जात आहे. पण आता शेतकरी घाबरत नाही. फसवणुकीनं त्रस्त झालेल्या जनतेचा संयम सुटलेला आहे.

### ही सभा घोषणा नव्हे, एल्गार आहे!

- सातबारा कोरा कधी होणार?
- हमीभाव फक्त भाषणांत का?
- दिव्यांगांना वचन दिला पगार सहा हजार, तो कुठे आहे?
- मेंढपाळ, मच्छीमार, शेतमजुरांना न्याय कधी मिळणार?

# ऋषभ पंत इंग्लंडविरुद्ध कसोटीत सर्वाधिक षटकार ठोकणारा फलंदाज



**लंडन : दि. १३** प्रतिनिधी

भारत आणि इंग्लंड यांच्यात लंडनच्या लॉर्ड्स क्रिकेट मैदानावर सुरू असलेला तिसरा कसोटी सामना रोमांचक स्थितीत पोहचला आहे. इंग्लंडला पहिल्या डावात ३८७ धावांवर रोखल्यानंतर, भारताचा संघही तितक्याच धावांवर सर्वबाद झाला. या डावात भारताच्या प्रमुख फलंदाजांपैकी एक असलेल्या ऋषभ पंतने आपला शानदार फॉर्म कायम ठेवत आणखी एक अर्धशतक झळकावले. आपल्या ७४ धावांच्या खेळीद्वारे, पंतने इतिहासातील दोन महान क्रिकेटपटू, सर व्हिव्हियन रिचर्ड्स (वेस्ट इंडिज) आणि एमएस धोनी (भारत), यांचे दोन मोठे विश्वविक्रम मोडीत काढले. ऋषभ पंतने आपल्या ११२ चेंडूंत ७४ धावांच्या खेळीत दोन षटकार मारले. यासह, त्याने इंग्लंडविरुद्ध कसोटी क्रिकेटमध्ये आतापर्यंत ३६ षटकार पूर्ण केले आहेत. तो आता इंग्लंडविरुद्ध कसोटीत सर्वाधिक षटकार ठोकणारा फलंदाज बनला आहे. त्याने वेस्ट इंडिजचे दिग्गज फलंदाज सर व्हिव्ह रिचर्ड्स यांचा विक्रम मोडला. त्यांनी आपल्या संपूर्ण कारकिर्दीत इंग्लंडविरुद्ध ३४ कसोटी षटकार मारले होते.ऋषभ पंतच्या नावावर आता इंग्लंडविरुद्ध कसोटी क्रिकेटमध्ये ११९७ धावा जमा झाल्या आहेत. यासह, तो कसोटी प्रकारात इंग्लंडविरुद्ध सर्वाधिक धावा करणारा आशियाई यष्टिरक्षक-फलंदाज ठरला आहे. त्याने एमएस धोनीला मागे टाकले, ज्याने इंग्लंडविरुद्ध कसोटीत ११५७ धावा केल्या होत्या.ऋषभ पंत लॉर्ड्सवरील तिस-या कसोटीत ज्या सहजतेने फलंदाजी करत होता, ते पाहता तो मालिकेतील आपले तिसरे शतक सहज पूर्ण करू शकला असता. परंतु, धाव घेताना झालेल्या एका मोठ्या चुकीमुळे तो केवळ ७४ धावाच करू शकला.

# भारतीय महिला संघाने इंग्लंडला घरच्या मैदानावर हरवले

**लंडन : दि. १३** प्रतिनिधी



भारतीय महिला संघाची काल टी ट्वेंटी मालिका पार पडली यामध्ये भारताच्या संघाला शेवटच्या सामन्यांमध्ये पराभवाचा सामना करावा लागला. भारताच्या संघाने पाच सामन्यांच्या २० मालिकेमध्ये तीन सामने जिंकून ही मालिका नावावर केली. या सह भारताच्या महिला संघाने ऐतिहासिक कामगिरी करून नवा विक्रम नावावर केला आहे. शेवटच्या सामन्यामध्ये शेफाली वर्मा ही हिची कामगिरी प्रभावशाली राहिली तिने संघासाठी ४१ जनरल मध्ये ७५ धावा केल्या.ज्या पद्धतीने एक षटकार आणि १३ चौकार मारले या व्यतिरिक्त इतर फलंदाज हे फार काही चांगली कामगिरी करू शकले नाही रिचा घोष हिने कालच्या सामन्यांमध्ये सर्वाधिक धावा करण्याच्या आधी मध्ये दुसऱ्या क्रमांकावर राहिली तिने फक्त २४ धावा केल्या. महिला क्रिकेट इतिहासात इंग्लंडविरुद्ध भारताचा हा पहिलाच टी-२० मालिकेमध्ये विजय आहे संघाने या मालिकेत कमालीची कामगिरी केली. यापूर्वी, भारताने इंग्लंडविरुद्ध ६ द्विपक्षीय टी-२० मालिका गमावल्या होत्या.२००६ मध्ये डर्बी येथे इंग्लंडविरुद्ध झालेल्या एकमेव टी-२० सामन्यात भारताने विजय मिळवला होता, जो दोन्ही संघांमधील या स्वरूपाचा पहिला सामना होता. या सामन्यात, नाणेफेक गमावून प्रथम फलंदाजी केल्यानंतर, भारतीय महिला संघाने निर्धारित २० षटकांत ७ गडी गमावून १६७ धावा केल्या. भारताकडून सलामीवीर शेफाली वर्माने शानदार अर्धशतकी खेळी केली. शेफालीने २३ चेंडूत तिचे ११ वे टी अर्धशतक पूर्ण केले.

गेल्या वर्षी वेस्ट इंडिजविरुद्ध रिचा घोषने १८ चेंडूत झळकावलेले अर्धशतकानंतर कोणत्याही भारतीय खेळाडूने या फॉरमॅटमध्ये केलेले हे दुसरे सर्वात जलद अर्धशतक आहे. शेफाली (७५) बाद झाल्याने भारतीय डाव डबघाईला आला.रिचा घोष (१४ चेंडूत २० धावा), राधा यादव (१४ चेंडूत नाबाद १४ धावा) आणि अरुंधती रेड्डी (५ चेंडूत नाबाद ९ धावा) यांच्या छोट्या खेळींमुळे भारताला सन्मानजनक धावसंख्या गाठता आली. इंग्लंडकडून चार्ली डीनने सर्वाधिक तीन बळी घेतले. इंग्लंडकडून सोफिया डंकली आणि डॅनिएल वायट-हॉज या सलामी जोडीने चांगली सुरुवात केली. सोफिया डंकलीने ४६ धावा केल्या, तर डॅनिएल ५६ धावा करून बाद झाली. याशिवाय इंग्लंडची कर्णधार टॅमी ब्यूमोंटने संघासाठी ३० धावा केल्या. भारताकडून दीप्ती आणि अरुंधतीने प्रत्येकी दोन बळी घेतले.या सामन्यात भारतीय टी-२० कर्णधार हरमनप्रीत कौरने तिचा ३३४ वा आंतरराष्ट्रीय सामना खेळला. कौरने माजी कर्णधार मिताली राजला मागे टाकले. ती भारतीय महिला क्रिकेटमध्ये सर्वाधिक सामने खेळणारी पहिली खेळाडू बनली आहे.

# लॉर्ड्सवर केएल राहुलचे शतक

**लंडन : दि. १३** प्रतिनिधी

लॉर्ड्स येथे भारत आणि इंग्लंड यांच्यात तिसरा कसोटी सामना खेळला जात आहे. या सामन्यात इंग्लंडने पहिल्या डावात १० गडी गमावून ३८७ धावा केल्या. प्रत्युत्तरात भारतीय फलंदाजांनीही दमदार खेळी केली. विशेषतः केएल राहुलने लॉर्ड्सवर पुन्हा एकदा अप्रतिम फलंदाजी केली. सामन्याच्या तिसऱ्या दिवशी राहुलने शानदार शतक झळकावत एका खास यादीत स्थान पटकावलं आहे. केएल राहुलने लॉर्ड्सवर दुसऱ्यांदा शतक ठोकले आहे. यापूर्वी २०२१ मध्ये इंग्लंडविरुद्ध त्याने शतक केले होते. हे त्याच्या कारकिर्दीतील १० वे शतक आहे. त्याने १७६ चेंडूत हे शतक पूर्ण केले. या शतकी खेळीत त्याने एकूण १३ चौकार मारले. या मालिकेतील त्याचे दुसरे शतरक आहे. यापूर्वी लीड्स येथे खेळल्या गेलेल्या कसोटी सामन्यात राहुलने शानदार शतक ठोकले होते. तिथे त्याने दुसऱ्या डावात २४७ चेंडूंमध्ये १३७ धावांची खेळी केली होती.तसेच लॉर्ड्स येथे शतक झळकावताच तो पहिला आशियाई सलामी फलंदाज ठरला, ज्याच्या नावावर या मैदानावर दोन कसोटी शतके आहेत. यापूर्वी २०२१ मध्ये त्याने लॉर्ड्सवर १२९ धावांची शतकी खेळी केली होती. इंग्लंडमध्ये हे राहुलचे चौथे शतक आहे. २००० नंतर इंग्लंडमध्ये सलामी फलंदाजाने झळकावलेल्या शतकांमध्ये ही दुसरी सर्वाधिक शतके आहेत.

यापूर्वी ग्रॅम स्मिथने पाच शतके झळकावली होती.केएल राहुलने २९ व्या वर्षी लॉर्ड्सच्या ऑनर्स बोर्डवर दोनदा आपले नाव कोरणारा पहिला भारतीय फलंदाज होण्याचा मान मिळवला आहे. मात्र, दुर्दैवाने तो शतक ठोकल्यानंतर लगेचच शोएब बशीरच्या गोलंदाजीवर झेलबाद माघारी परतला.



# पोलंडची इगा स्वायटेक विम्बल्डनची नवी सम्राज्ञी!



**लंडन : दि. १३** प्रतिनिधी

पोलंडच्या इगा स्वायटेकने शनिवारी अमांडा ॲनिसिमोव्हाचा केवळ ५७ मिनिटांत ६-०, ६-० असा धुव्वा उडवत आपले पहिलेवहिले विम्बल्डन विजेतेपद पटकावले. गेल्या ११४ वर्षांच्या विम्बल्डनच्या इतिहासात महिला एकेरीच्या अंतिम सामन्यात एखाद्या खेळाडूला एकही गेम जिंकता न आल्याची ही पहिलीच वेळ ठरली.

शनिवारी अमांडा ॲनिसिमोव्हावर ६-०, ६-० असा एकतर्फी विजय मिळवत स्वायटेकने आपले पहिले विम्बल्डन आणि एकूण सहावे ग्रँड स्लॅम विजेतेपद जिंकले. या विजयासह, ग्रास कोर्टवर खेळण्याची आपली क्षमता तिने निर्विवादपणे सिद्ध केली आहे. पोलंडच्या या आठव्या मानांकित खेळाडूने आतापर्यंत खेळलेले सर्व सहा प्रमुख अंतिम सामने जिंकण्याचा विक्रम केला आहे. तिने पहिल्या गुणापासूनच सामन्यावर आपले वर्चस्व प्रस्थापित केले आणि अवघ्या ५७ मिनिटांत विजय साकारला. २०१६ मध्ये सेरेना विल्यम्सने ऑल इंग्लंड क्लबमध्ये आपले सातवे आणि अखेरचे विजेतेपद जिंकल्यानंतर, २४ वर्षीय स्वायटेक ही विम्बल्डनची सलग आठवी नवीन महिला विजेती ठरली आहे.दोन आठवड्यांपूर्वी बॅड हॉम्बर्ग येथील ग्रास-कोर्ट स्पर्धेची अंतिम फेरी गाठणाऱ्या स्वायटेकचा खेळ या स्पर्धेत उत्तरोत्तर बहरत गेला, तर दुसरीकडे ऑल इंग्लंड क्लबमध्ये अव्वल मानांकित खेळाडू एकामागोमाग एक पराभूत होत होते. अंतिम फेरीपर्यंतच्या प्रवासात तिने केवळ एकच सेट गमावला होता.

# जिगरबाज रहाणेने रणशिंग फुंकले ; कसोटी पुनरागमनासाठी ठोकला शड्डू!

**नवी दिल्ली: दि. १३** प्रतिनिधी



२०२०-२१ च्या बॉर्डर-गावस्कर ट्रॉफीमध्ये ऑस्ट्रेलियात टीम इंडियाला ऐतिहासिक मालिका विजय मिळवून देणारा अजिंक्य रहाणे सध्या कसोटी संघात निवड समितीच्या योजनेबाहेर आहे. तथापि, या उजव्या हाताच्या फलंदाजाने पुनरागमनाची आशा सोडलेली नाही आणि संघात स्थान मिळवण्यासाठी तो कठोर मेहनत घेत आहे. नुकतेच भारत आणि इंग्लंड यांच्यातील लॉर्ड्स कसोटीच्या तिसऱ्या दिवशी रहाणे उपस्थित होता, आणि तेथेच त्याने राष्ट्रीय संघात परतण्याच्या आपल्या महत्त्वाकांक्षेबद्दल भाष्य केले.इंडियन प्रीमियर लीगमध्ये (आयपीएल) कोलकाता नाईट रायडर्सचे नेतृत्व केलेल्या रहाणेने इंग्लंडचे माजी कर्णधार मायकेल अथर्टन आणि नासिर हुसैन यांच्याशी संवाद साधला. आपण स्वतःला भविष्यात कुठे पाहता, असे विचारले असता, त्याने पुनरागमनाची महत्त्वाकांक्षा अजूनही कायम असल्याचे तात्काळ उत्तर दिले.भारतासाठी ८५ कसोटी सामने खेळलेल्या या फलंदाजाने असा खुलासा केला की, सध्याच्या परिस्थितीत आपले स्थान काय आहे, हे जाणून घेण्यासाठी त्याने निवड समितीशी संवाद साधण्याचा प्रयत्न केला. पण माजी भारतीय वेगवान गोलंदाज अजित आगरकर यांच्या अध्यक्षतेखालील समितीकडून त्याला कोणताही प्रतिसाद मिळाला नाही. मात्र, या गोष्टीमुळे तो विचलित झालेला नाही आणि देशांतर्गत क्रिकेटमध्ये मुंबईसाठी चांगली कामगिरी करण्यावर त्याचे लक्ष केंद्रित आहे.

स्काय स्पोर्ट्सशी बोलताना रहाणे म्हणाला, 'मला अजूनही कसोटी क्रिकेट खेळायचे आहे. माझ्या मनात कसोटी क्रिकेटविषयी प्रचंड आवड आहे. सध्या मी माझ्या खेळाचा आनंद घेत आहे. मी येथे काही दिवसांसाठी आलो असून, स्वतःला तंदुरुस्त ठेवण्यासाठी सरावाचे कपडे सोबत आणले आहेत. आमचा देशांतर्गत हंगाम लवकरच सुरू होणार असून त्याच्या तयारीलाही सुरुवात झाली आहे.'

## राज्य सरकारकडून आणखी ३२८ नवीन मद्यविक्री परवाने

**मुंबई** : राज्याचा महसूल वाढवण्याच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आला आहे. सरकारकडून आणखी ३२८ नवीन मद्यविक्री परवाने देण्यात येणार आहे. मात्र हे नवीन परवाने दुकानांना नव्हे तर कंपन्यांना दिले जाणार आहेत. प्रत्येकी एका कंपनीला मद्यविक्रीचे ८ परवाने दिले जातील. राज्याचा महसूल वाढवण्यासाठी सरकारने हे पाऊल उचलले आहे. तसेच राज्यात जुना मद्यविक्री परवाना विकत घेण्यासाठी १० कोटी रुपये मोजावे लागणार आहेत. तर नवीन परवाना घेण्यासाठी कंपन्यांना राज्य सरकारला फक्त एक कोटी रुपये द्यावे लागणार आहेत. या निर्णयामुळे राज्याचा महसूल वाढणार असला तरी राज्यातील तळीराम देखील वाढणार आहेत. यामुळे शरद पवार गटाचे आमदार जितेंद्र आव्हाड यांनी रोष व्यक्त केला आहे. राष्ट्रवादी शरद पवार गटाचे आमदार जितेंद्र आव्हाड यांनी राज्य सरकारवर निशाणा साधला आहे. ते म्हणाले की, 'लाडक्या बहिनींच्या नावाखाली त्यांचा संसार उद्धवस्त करण्यचा काम सुरू आहे. या सरकारला सत्तेची मस्ती आली आहे. अर्थव्यस्थेचा खेळखंडोबा सुरू आहे. बहिणींना पैसे देण्यासाठी त्यांच्या पती, भाऊ यांना बेवडे करण्याचं काम सुरू आहे. वाजले की बारा, वाजले की बारा असं म्हणायची वेळ आली आहे.' असा टोला जितेंद्र आव्हाड यांनी लगावला आहे.पुढे ते म्हणाले की, या सर्व ४७ कंपन्या कुणाच्या आशिर्वादाने सुरू आहे. तुम्हाला मद्याची नाही तर सत्तेची झिंग आली आहे. महाराष्ट्र हा येड्यांचा बाजार नाहीये. माझ्या बहिणींना पैसे देण्यासाठी दारू परवाना देत आहे. हा महाराष्ट्र वारकऱ्यांचा, साधू संतांचा आहे की बेवड्यांचा आहे? असा सवाल जितेंद्र आव्हाड यांनी उपस्थित केला आहे. दारूड्याचं सरकार आहे का, बेवड्याचं सरकार आहे? आता चपट्या खिशात घेऊन फिरण्याची मुभा द्या. मी विधानसभेत घेऊन जाणार आहे. पाणी नाही मिळाले तर चालेले मात्र दारू घरात मिळणार. हे सरकार मॅकडॉलन्सची सरकार आहे. दत्ता भरणेंना सांगा लाडक्या बहिनींना घेऊन जा आणि चंद्रभागेत जाऊन ढकलून द्या. पैसे कमवायचे आहेत तर गेट ऑफ इंडिया विका, किल्ला विका, असा आक्रमक पवित्रा जितेंद्र आव्हाड यांनी घेतला आहे.

# ब्राझीलचा भारताला धक्का ; 'आकाश'च्या खरेदीस दिला नकार

**नवी दिल्ली: दि. १३** प्रतिनिधी




भारताच्या स्वदेशी संरक्षण क्षेत्राला मोठा धक्का बसला आहे. खरं तर, ब्राझीलने भारताच्या 'आकाश' जमिनीवरून हवेत मारा करणाऱ्या क्षेपणास्त्र प्रणालीच्या खरेदीसाठीच्या चर्चा थांबवल्या आहेत. वृत्तानुसार, ब्राझीलने काही प्रमुख ऑपरेशनल पॅरामीटर्समध्ये 'आकाश' क्षेपणास्त्राची कमकुवत कामगिरी हे या हालचालीमागील कारण असल्याचे सांगितले आहे.

ब्राझील आता युरोपियन संरक्षण क्षेत्रातील दिग्गज कंपनी एमबीडीएकडे वळला आहे, जी एन्हान्स्ड मॉड्यूलर एअर डिफ ेन्स सोल्युशन्स (ईएमएडीएस) प्रदान करते. ही प्रणाली आधीच नाटो देशांमध्ये वापरली जात आहे आणि ती विश्वासार्ह मानली जाते. ब्राझीलच्या एका वृत्तपत्रांनी म्हटले आहे की ब्राझिलियन सैन्य आणि एमबीडीए यांच्यातील चर्चा सुमारे १ अब्ज अमेरिकन डॉलर्स (सुमारे ४.७ अब्ज रिंगिट) किमतीच्या कराराभोवती फिरत आहे. लॅटिन अमेरिकेतील अलिकडच्या काळात हा सर्वात मोठा हवाई संरक्षण करार मानला जातो.ब्राझिलच्या माध्यमातील अहवालानुसार, ब्राझीलने 'आकाश' हा वेगवान आणि कमी उंचीच्या लक्ष्यांसाठी कमी योग्य मानला. आजच्या युद्धांमध्ये, जेव्हा हायब्रिड युद्ध, ड्रोन हल्ले आणि स्मार्ट बॉम्बचा वापर वाढत्या प्रमाणात होत आहे, तेव्हा ब्राझीलला असे वाटते की या धोक्यांना तोंड देण्यासाठी आकाश पुरेसे नाही.हा निर्णय भारताच्या 'आत्मनिर्भर भारत' मोहिमेला एक गंभीर आव्हान आहे. भारताने आकाशला त्यांच्या सर्वात यशस्वी स्वदेशी प्रणालींपैकी एक म्हणून वर्णन केले आहे आणि आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत त्याचा प्रचार करत आहे, परंतु ब्राझीलची नाराजी दर्शवते की परदेशी सैन्य नाटो-मानक तंत्रज्ञान अधिक विश्वासार्ह मानतात, तर भारताच्या प्रणालींना त्या पातळीपर्यंत पोहोचण्यासाठी अजूनही अधिक मेहनत घ्यावी लागते.

## टॅरिफ पे टॅरिफ ; मेक्सिको आणि युरोपियन युनियनवर ट्रम्प यांनी लागू केला ३०% कर

**वॉशिंग्टन : दि. १३** प्रतिनिधी

अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी आपल्या टॅरिफच्या निर्णयाने संपूर्ण जगाला हादरवून टाकले आहे. त्यांच्या या निर्णयामुळे जागतिक स्तरावर मोठा गोंधळ निर्माण झाला आहे. दरम्यान आता ट्रम्प यांनी पुन्हा एकदा युरोपियन यूनियन आणि मेक्सिकोवर ३० टक्के कराची घोषणा केली आहे. १ ऑगस्टपासून हा कर लागू करण्यात येणार आहे.ट्रम्प यांनी युरोपियन यूनियन आणि मेक्सिको या दोन मोठ्या व्यापारी भागीदारांवर कर लादला आहे. त्यांनी मेक्सिको राष्ट्राध्यक्षांना लिहिले आहे की, मेक्सिकोने अमेरिकेत बेकायदेशीर स्थलांतरितांच्या आणि फेंटानिलच्या तस्करीचा रोखण्यास मदत केली आहे. परंतु यासाठी पुरेसे प्रयत्न करण्यात आलेले नाही, या कारणामुळे अमेरिका मेक्सिकोवर ३० टक्के कर लागू करत आहे.मेक्सिकन राष्ट्राध्यक्षांना ट्रम्प यांनी पाठवलेल्या पत्रात म्हटले आहे की, "हे पत्र तुम्हाला पाठवणे एक मोठा सन्मानाची बाब आहे. हे अमेरिका आणि मेक्सिकोच्या व्यापारी संबंधाची ताकद आणि वचनबद्धता दर्शवते. अमेरिका मेक्सिकोसोबत व्यापर सुरु ठेवण्यास सहमत आहे.परंतु संबंध मजबूत असूनही, अमेरिकेने मेक्सिकोवर कर लागू केला आहे. ट्रम्प यांनी म्हटले आहे की, अमंली पदार्थांच्या तस्करी रोखण्यात मेक्सिकोला अपयश आहे आहे.

मेक्सिकोची प्रशंसा करुन त्यांच्यावर टीका केली आहे. त्यांनी म्हटले आहे की, उत्तर अमेरिकेत नार्को तस्करीचे प्रमाण थांबलेले नाबी. मेक्सिकोचे राष्ट्राध्यक्ष कार्टेलना यामध्ये अपयशी ठरले आहेत. यामुळे १ ऑगस्ट २०२५ पासून अमेरिकेत येणाऱ्या मेक्सिको उत्पादनांवर ३० टक्के कर लागू करत आहोत. याशिवाय अमेरिकेने मेक्सिकोहून अमेरिकेत येणाऱ्या वस्तूंवर प्रादेशिक कर देखील लागू करणार असल्याचे म्हटले आहे.

# जगातील सर्वात जास्त रेंज देणारी कार

**नवी दिल्ली: दि. १३** प्रतिनिधी



आजच्या घडीला जगातील सर्वात जास्त रेंज देणारी ईलेक्ट्रीक कार कोणत्या कंपनीची? टेस्ला, बीवायडी, टाटा, महिंद्रा... अशी काही नावे तुमच्या डोक्यात रेंगाळतील. पण नाही. ल्युसिड एअर कंपनीच्या कारने एका चार्जमध्ये १२०७ किमी अंतर कापत वर्ल्ड रेकॉर्ड केले आहे.

या कारने जवळपास युरोपमधील तीन देशांतून प्रवास केला. ल्युसिड एअरच्या ग्रँड टुरिंग मॉडेलने स्वित्झर्लंडच्या सेंट मॉरिजहून प्रवास सुरु केला तो जर्मनीच्या म्युनिखपर्यंत. एका चार्जमध्ये या कारने ७५० मैलांचे अंतर कापले. या प्रवासात कार एकदाही चार्ज केली गेली नाही. अर्थात हे सर्वांनाच शक्य नाही. कारण ही कार जर तुम्हाला, आम्हाला आणून दिली तरी आपण ती साधारण ७००-८०० किमीच्या आसपास नेऊ शकू. ही किमया केली आहे, लंडनमधील उद्योगपती उमित सबांसी यांनी. त्यांना हायपर-मिलिंग तज्ञ म्हणून या जगात ओळखले जाते. ल्युसिड कंपनीला आता गिनीज वर्ल्ड रेकॉर्ड्सचा ट्रॉफी मिळणार आहे. ३ देशांच्या नॉन-स्टॉप प्रवासात विविध प्रकारचे रस्ते समाविष्ट होते, यात डोंगरांगा देखील होत्या, उतार, वळणेवळणे देखील होती. हा खड्डे मात्र नव्हते. पण अरुंद रस्ते होते.

या प्रवासात रिजनरेटिव्ह ब्रेकिंग सिस्टम खूप महत्वाची ठरली, यामुळे जास्त रेंज मिळाली. ल्युसिड एअर ग्रँड टूरिंग मॉडेलची किंमत दोन कोटींच्या आसपास आहे. ही कार ८३१ हॉर्सपॉवर एवढी ताकद निर्माण करते आणि १.८९ सेकंदात ०-१०० किमी प्रतितास वेग घेऊ शकते. या कारचा टॉप स्पीडच २७० किमी प्रतितास पेक्षा जास्त आहे.

# नागपूर जिल्ह्यात रस्तेच रस्ते, प्रस्तावांना मंजुरी

## कामठीत साकारणार भव्य व्यापारी संकुल, केंद्रीय मंत्री नितीन गडकरींच्या अध्यक्षतेत बैठक

**दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी**

**नागपूर, दि. १३ : नागपूर जिल्ह्याच्या विविध भागातील रस्ते निर्मितीच्या प्रस्तावांना मंजुरी देण्यात आली असून, कामठीतील वाहतूक कोंडी सोडविण्यासाठी शहरातून जाणारा नागपूर-जबलपूर राष्ट्रीय महामार्ग १८ मीटर करण्यात येणार आहे याशिवाय भव्य व्यापारी संकुलाची उभारणी होणार आहे केंद्रीय रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांच्या अध्यक्षतेखालील बैठकीत उपरोक्त निर्णय घेण्यात आले.**



बैठकीत जिल्ह्यातील प्रलंबित असलेल्या ग्रामीण भागातील विविध मार्गांबाबत चर्चा करण्यात आली. पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी निधीबाबत केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्याकडे मागणी करून ग्रामीण भागातील रस्त्यांसाठी लक्ष वेधले. यात खरांगणा-कोंढाळी-काटोल-सावरगाव-वडचिचोली या रस्त्याला राष्ट्रीय महामार्गाचा दर्जा देणे, मौदा-माथनी चापेगडी कुही या राज्य महामार्गास निधी उपलब्ध करणे, कारंजा-लोहारीसावंगा-भारसिंगी-खरसोली-नरखेड-मध्यप्रदेश सीमापर्यंत या राष्ट्रीय महामार्गाच्या डीपीआरला मंजुरी देणे, नागपूर-छिंदवाडा राष्ट्रीय महामार्गावर निर्माणधीन उड्डाणपुलावरून कोराडी नाक्यापासून ऑर्चिड शाळेकडे जाण्याकरीता रस्त्याचे बांधकाम करणे, श्री कोराडी महालक्ष्मी मंदिर अंतर्गत श्री महादेव टेकडी ते हनुमान मंदिर (१५१ फूट) या ठिकाणी रोप-वे च्या कामाकरीता निधीची उपलब्धता, देहेगाव-कामठी-अजनी बडोदा-कुही या राष्ट्रीय महामार्गास निधी उपलब्ध करणे, गोंडखैरी भंडारा बाह्यवळण मार्गावरील सर्व्हिस रोड आणि पांजरा येथील मुख्य चौकातील रस्त्याचे बांधकाम करणे आदी मार्गांबाबत प्रस्तावांना मंजुरी देण्यात आली.

### व्यवसायिक गाळे

**कामठी शहरात बसस्थानक, नगर परिषद आणि तहसील कार्यालय परिसरात साकारणाऱ्या मेट्रो स्टेशनला अधोरखित करून नझुलच्या जागेवर भव्य व्यापारी संकुलाला मान्यता देण्यात आली. अनेक व्यावसायिकांना दुकाने उपलब्ध होतील. सोबत वाहतुकीच्या कोंडीचाही प्रश्न मार्गी लागणार आहे. ड्रॅगन पॅलेस कामठी येथे मेट्रो स्टेशनबाबत बैठकीत चर्चा करण्यात आली. नीलम लॉन व शुक्रवारी बाजाराचा विकास करताना लोकांसाठी ३० टक्के जागेवर पुनर्वसन व उर्वरित जागेवर फूड कोर्ट, मॉल व इतर अत्याधुनिक सोयीसुविधा विकसित करण्याचा निर्णय घेण्यात आला.**

**मोठे अतिक्रमण**

नागपूर जबलपूर राष्ट्रीय महामार्गाचा भाग असलेल्या कामठीतील रस्ता हा अतिक्रमणामुळे सात मीटर एवढाच शिल्लक आहे त्यामुळे याठिकाणी वारंवार वाहतूक कोंडी निर्माण होत आहे आता कामठी विकासाला आता चालना देण्यात आल्याने जिल्हा प्रशासन, नगरपरिषद, मेट्रो प्रशासन संयुक्तरित्या या मार्गावरील अतिक्रमण काढतील, असे बैठकीत निर्देश देण्यात आले. १९१२-१३ मधील सर्वेक्षणानुसार संबंधित रस्त्याची १८ मीटर मोजणी करण्यात येणार आहे. बैठकीस आमदार सर्वश्री कृष्णाजी खोपडे, प्रवीण दटके, चरणसिंह ठाकूर, मनपा आयुक्त डॉ. अभिजीत चौधरी, नागपूर सुधार प्रन्यासचे सभापती संजय मीणा, जिल्हाधिकारी डॉ. विपीन इटनकर, सार्वजनिक बांधकाम विभागाचे मुख्य अभियंता नंदनवार, वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

---

## थोडक्यात

### वनिता विकास विद्यालयात गुरुपौर्णिमा

**नागपूर :** वनिता विकास विद्यालयात गुरुपौर्णिमा कार्यक्रम साजरा करण्यात आला. प्रारंभी दीपप्रज्वलन आणि सरस्वती मातेच्या प्रतिमेस हार अर्पण करण्यात आला. विद्यार्थ्यांनी सरस्वती स्तवन सादर केले. मुलांनी स्व: हस्ते तयार केलेले ग्रिटींग शिक्षकांना देत त्यांचा सन्मान केला. विद्यार्थ्यांनी भाषणे, कविता, गीते सादर केली. मुख्याध्यपिका माधुरी सुर्यवंशी, ज्येष्ठ शिक्षिका दीपाली भालेकर यांच्यासह शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते. तसेच, मातापालक छाया महाकाळकर यांची उपस्थिती होती संगीता जाधव यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचलन केले. वंदे मातरम् या गीताने कार्यक्रमाचा समारोप करण्यात आला.

### गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार

**नागपूर :** स्वराज फाऊंडेशनच्या वतीने खसाळा येथील गुणवंत युतिका राजेशजी वैरागडे, प्रांजली लक्ष्मण वैरागडे, परी गणेश गभणे, यशस्वी संजय पिसे, कृष्णा संजय पिसे यांचा सत्कार करण्यात आला. कार्यक्रमात स्वराज फाउंडेशनच्या संस्थापक अध्यक्ष माधुरी बावनकुळे, खसाळा येथील पोलिस पाटील संचाली कानतोडे, समाजिक कार्यकर्त्या ज्योती गभणे, मार्गदर्शक राधेश्याम हटवार, ज्येष्ठ कामगार नेते रमेश वाटकर, समर्थन एक फाऊंडेशनचे अध्यक्ष विपिन लेंडे, प्रा.चंद्रकांत बावनकुळे, खसाळा जिल्हा परिषद शाळेतील शिक्षक संदेश गणवीर, राजेश वैरागडे, भैयालाल गभणे, लक्ष्मणजी वैरागडे, गंगाधरजी वैरागडे, प्रभाकर डाखोळे, पंढरी सिलुटकर, प्रमोद वैरागडे, जितू रोकडे, राजेश बावनकुळे प्रामुख्याने उपस्थित होते.

### श्री श्री रविशंकर यांची सप्टेंबरमध्ये नागपूर भेट

**नागपूर :** श्री श्री रविशंकर आगामी सप्टेंबरमध्ये 'विज्ञान भैरव' कार्यक्रमानिमित्त नागपूरला भेट देणार आहे माहितीनुसार, श्री श्री रविशंकर १० ते १२ सप्टेंबर २०२५ दरम्यान भेटीत 'विज्ञान भैरव' या सात वर्षांपूर्वीच्या संस्कृत ग्रंथावर सखोल प्रवचन देतील. हा कार्यक्रम ११ व १२ सप्टेंबरला मानकापूर इनडोअर स्टेडियम येथे होणार आहे. याप्रसंगी नागपूरकरांना १० सप्टेंबरला राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या मैदानात मूळ सोमनाथ ज्योतिर्लिंग अवशेषाचे विशेष दर्शन होणार आहे.

## निधन

### उमेश मोटघरे

**नागपूर :** हनुमान नगर रहिवासी



उमेश विठ्ठलराव मोटघरे यांचे वृद्धापकाळाने शनिवारी (१२ जुलै) निधन झाले. ते ७० वर्षांचे होते. त्यांच्या पार्थिवावर मोक्षधाम येथे अंतिम संस्कार पार पडले. उमेश मोटघरे यांच्या पश्चात पत्नी, तीन भाऊ, मुलगा, मुलगी आणि मोठा आप्तपरिवार आहे.

---

# स्वयंसहाय्यता बचत गटांसाठी मिनी ट्रॅक्टर योजना

## अनुसूचित जाती व नवबौद्ध घटक लाभार्थी

**दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी**

**नागपूर, दि. १३ :** अनुसूचित जाती आणि नवबौद्ध घटकांच्या स्वयंसहाय्यता बचत गटांना ९० टक्के अनुदानावर ९ ते १८ अश्वशक्तीचा मिनी ट्रॅक्टर व त्याची उपसाधने यांचा पुरवठा करण्याची योजना सामाजिक न्याय विभागामार्फत राबविण्यात येत आहे.

चालू वर्षाकरीता पात्र ठरलेल्या बचत गटांना मिनी ट्रॅक्टर वाटप करण्यात येणार आहे .या योजनेचा लाभ घेण्यासाठी इच्छुक गटांनी अर्ज करावेत, असे आवाहन करण्यात आले आहे. या योजनेअंतर्गत, गटातील किमान ८० टक्के सदस्य अनुसूचित जाती किंवा नवबौद्ध घटकातील असावेत. मिनी ट्रॅक्टर आणि उपसाधनांच्या खरेदीसाठी साडेतीन लाख रुपयांच्या मर्यादित ९० टक्के शासकीय अनुदान मिळेल, तर १० टक्के रक्कम गटाला स्वतः भरावी लागेल. या ट्रॅक्टरचा वापर इतर शेतकऱ्यांना भाडेतत्त्वावर देऊन गटाला आपले आर्थिक उत्पन्न वाढवता येईल. मात्र, हा ट्रॅक्टर विकता किंवा गहाण ठेवता येणार नाही. ज्या गटांना यापूर्वी मिनी ट्रॅक्टर किंवा पॉवर टिलरचा लाभ मिळाला आहे, त्यांना पुन्हा अर्ज करता येणार नाही. इच्छुक गटांनी आपले अर्ज ३१ जुलैपर्यंत समाजकल्याण कार्यालयात सादर करावेत.

---

# विदर्भात एआय कॅमेरे, सायरन करणार वाघांची निगराणी

## मानव व वन्यजीव संघर्ष टाळणार - पालकमंत्री, चंद्रशेखर बावनकुळे

**दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी**

**नागपूर, दि. १३ :** विदर्भातील मानव-वन्यजीव संघर्ष टाळण्यासाठी आता कृत्रिम बुद्धिमत्तेची (एआय) मदत घेतली जाणार आहे. व्याघ्र प्रकल्पांच्या सीमांवर 'एआय' आधारित कॅमेरे आणि सायरन बसवण्यासाठी 'मार्वल' कंपनीसोबत सामंजस्य करार करण्यात आला आहे, अशी माहिती पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी दिली.

याअंतर्गत, पेंच, ताडोबा, नवेगाव-नागझिरा व्याघ्र प्रकल्प आणि नागपूर वन विभागाच्या हद्दीत एकूण ३,१५० 'एआय कॅमेरे'




लावले जातील. हे कॅमेरे वाघ, बिबट यांसारख्या प्राण्यांना ओळखून, त्यांची हालचाल टिपतील. वन्यप्राणी कॅमेऱ्यात कैद होताच, गावातील सायरन वाजेल आणि गावकरी सावध होतील. यामुळे हल्ल्याच्या घटना टाळता येतील. पालकमंत्री बावनकुळे आणि वित्त राज्यमंत्री आशिष जयस्वाल यांच्या उपस्थितीत 'मार्वल'चे सीईओ तथा पोलीस अधीक्षक डॉक्टर हर्ष पोद्दार आणि वन विभागाच्या अधिकाऱ्यांनी या करारावर स्वाक्षऱ्या केल्या. या उपक्रमामुळे निष्पाप नागरिकांचे प्राण वाचण्यास मदत होणार आहे.

---

# सातत्य, एकाग्रता आणि समर्पण ही यशाची त्रिसूत्री

## राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन यांचे प्रतिपादन




**दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी**

**नागपूर, दि. १३ :** भारत आज जागतिक स्तरावर सर्वच क्षेत्रात अग्रेसर असणारा देश म्हणून पुढे येत आहे. विशेषत: संरक्षण क्षेत्रात देशाची वाटचाल स्वावलंबनाकडे सुरू आहे. स्वावलंबन व सामरिक सज्जतेकडे वाटचाल करत असलेल्या देशाच्या प्रवासात 'एनएडीपी'तून उत्तीर्ण विद्यार्थ्यांनी योगदान देत सातत्य, एकाग्रता आणि समर्पण ही यशाची त्रिसूत्री अंगीकारावी, असे आवाहन राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन यांनी केले.

राष्ट्रीय संरक्षण उत्पादन अकादमीत पदव्युत्तर व्यवस्थापन पदविकाच्या (एनएडीपी) पहिल्या दीक्षान्त समारंभात ते बोलत होते. राज्यपालांचे सचिव प्रशांत नारनवरे, अध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक म्युनिशन्स इंडिया लिमिटेड संजय हजारी, मुख्य संचालक राष्ट्रीय संरक्षण उत्पादन अकादमी डॉ. जे. पी. दास, संचालक (मानव संसाधन) म्युनिशन्स इंडिया लिमिटेड जे. पी. नाईक यांच्यासह संरक्षण क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते. केवळ पदवीप्राप्त विद्यार्थ्यांसाठीच नव्हे, तर आपल्या संपूर्ण राष्ट्रासाठी ही एक मैलाचा दगड ठरणारी घटना आहे. देशाच्या संरक्षण क्षेत्रातील परिवर्तनाच्या प्रवासात या अकादमीतून उत्तीर्ण विद्यार्थ्यांचे योगदान महत्त्वाचे ठरणार आहे. ही अकादमी भविष्यात भारतातील संरक्षण उत्पादन व्यवस्थापन क्षेत्रातील एक उत्कृष्ट विद्यार्थी केंद्र बनणार असून, त्याचा पाया आज घातला गेला, असे राज्यपाल म्हणाले.संरक्षण साधने विदेशातून आयात करावी लागायची. आता मात्र संरक्षण क्षेत्रात स्वावलंबनासह संशोधन व आधुनिकीकरण दिसून येते सध्याचे युद्ध हे मनुष्यापुरते मर्यादित राहणार नसून तंत्रज्ञानावर आधारित राहणार आहे. तंत्रज्ञानाचे महत्त्व लक्षात घेता आपल्याला उच्च दर्जाचे संरक्षण तंत्रज्ञान गरजेचे आहे. या अकादमीच्या माध्यमातून हे तंत्रज्ञान अवगत होणार आहे. संरक्षण क्षेत्र हे आता सर्वांसाठी खुले झाले आहे. त्यामुळे पुढे जाण्याच्या अनेक संधी विद्यार्थ्यांना उपलब्ध असल्याचे असल्याचे त्यांनी नमूद केले

**पदवी प्रदान**

एनएडीपीतून पदविका प्राप्त विद्यार्थ्यांना राज्यपाल सी.पी. राधाकृष्णन यांच्या हस्ते पदविका प्रदान करण्यात आली. या सर्वच विद्यार्थ्यांना नोकरीची संधी संरक्षण क्षेत्रातील विविध कंपन्या, संस्थांमध्ये उपलब्ध झाली आहे. विशेषत: संरक्षण क्षेत्राला केंद्रस्थानी ठेवून पदव्युत्तर पदविका अभ्यासक्रम एनएडीपी मार्फत राबविण्यात येतो.

---

# एमडी तस्कराच्या फ्लॅटची पाहणी

## घर भाड्याने देताना काळजी घ्या, अन्यथा मालक अडचणीत येईल

**दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी**

**नागपूर, दि. १३ :** नागपूर येथील छत्रपती नगरातील पूजा अपार्टमेंटमध्ये एमडी तस्करीच्या रॅकेटचा पर्दाफाश केल्यानंतर, पोलीस आयुक्त डॉक्टर रवींद्र कुमार सिंगल यांनी स्वतः घटनास्थळाची पाहणी केली. "आपल्या परिसरात काय चालले आहे, याकडे नागरिकांनी लक्ष ठेवावे," असा सल्ला त्यांनी दिला.



शुक्रवारी मध्यरात्री 'ऑपरेशन थंडर'अंतर्गत गुन्हे शाखेने धाड टाकून सहा आरोपींना अटक केली होती. मुख्य सूत्रधार राहुल लेपसे आणि सचिन घोडे यांनी हा फ्लॅट भाड्याने घेऊन येथून एमडीचा व्यवहार सुरू केला होता. पोलीस आयुक्तांनी या फ्लॅटची बारकाईने पाहणी केली. "घर भाड्याने देताना भाडेकरूची पूर्ण चौकशी करा, अन्यथा अवैध कामांसाठी त्याचा वापर झाल्यास घरमालकही कायदेशीर अडचणीत येऊ शकतो," असा इशारा त्यांनी दिला. नागरिकांनी संशयास्पद हालचाली दिसल्यास ११२ क्रमांकावर किंवा जवळच्या पोलीस ठाण्यात माहिती द्यावी, असे आवाहनही त्यांनी केले. यावेळी त्यांच्यासोबत उपायुक्त लोहित मतानी, सहाय्यक आयुक्त अभिजीत पाटील उपस्थित होते.

---

# भेंडीची भाजी आवडली नाही, म्हणून गाठली थेट दिल्ली!

## वाहतूक प्रतिबंधक पथकाने घेतला शोध

**दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी**

**नागपूर, दि. १३ :** आईने तयार केलेल्या जेवणातील भेंडीची भाजी न आवडल्याने अल्पवयीन मुलाने दिल्ली गाठली इकडे नागपुरात तक्रार दाखल होताच अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंधक पथकाने शोध घेत त्याला कुटुंबात सोपविले.

माहितीनुसार, सोहम (बदलले नाव) हा कोतवाली पोलिस ठाण्याच्या हद्दीत राहत असून, जेवणातील भेंडीची भाजी आवडत नसल्याने आईशी वाद घालून तो गुरुवारी रात्री अकरा वाजताच्या सुमारास घरातून निघून गेला. त्याने रेल्वेस्टेशन गाठून थेट दिल्ली गाठली. यानंतर तो घरी दिसत नसल्याने कोतवाली पोलिसांत बेपत्ता होण्याची तक्रार दाखल केली अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंधक पथकाच्या ललिता तोडासे यांच्या पथकाने सीसीटीव्हीसह तांत्रिक तपास सुरू केला यात सोहम दिल्लीत असल्याची माहिती हाती आली यानंतर त्याच्या दिल्लीच्या मित्रांसोबत संपर्क करण्यात आला त्याची समजूत काढून त्याला विमानाने नागपुरात पाठविले. शनिवारी सकाळी तो नागपुरात पोहोचताच त्याचे समुपदेशन करत कुटुंबाच्या स्वाधीन करण्यात आले.

---

# कळमना अग्निशमन प्रशिक्षण केंद्रात घडतात 'फायर मॅन'

## महानगरपालिका संचालित विदर्भातील एकमेव संस्था, ट्रेन्ड् मनुष्यबळ तयार करण्यात पहिले स्थान

**दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी**

**नागपूर, दि. १३ :** महानगरपालिका संचालित कळमना येथील प्रादेशिक अग्निशमन प्रशिक्षण केंद्रात मागील नऊ वर्षांच्या कालावधीत शेकडो उमेदवारांना 'फायर मॅन' चे प्रशिक्षण मिळाले आहे आता हे केंद्र एका महत्त्वाच्या संस्थेच्या रुपात उदयास आले आहे. अधिक दर्जेदार प्रशिक्षणाच्या अनुषंगाने नवीन जलतरण तलाव बांधला असून, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या हस्ते लोकार्पण करण्यात आले. उल्लेखनिय असे, की विदर्भातील महानगरपालिकाच्या वतीने संचालित होणारे एकमेव अग्निशमन प्रशिक्षण केंद्र आहे.



मनपा आयुक्त तथा प्रशासक डॉ. अभिजीत चौधरी, अतिरिक्त आयुक्त वसुमना पंत, वैष्णवी बी., मुख्य अग्निशमन अधिकारी तुषार बाराहाते यांच्या नेतृत्वात अग्निशमन विभागात अत्याधुनिक सेवा देण्याचा प्रयत्न होत आहे. नागपूर महानगरपालिकेने शहरातील आगीच्या घटनांवर तसेच आपत्कालिन स्थितीवर अधिक प्रभावीपणे नियंत्रण मिळवण्यासाठी महत्वपूर्ण पाऊल उचलले आहे. शहराच्या वर्दळीच्या ठिकाणी, बाजारातील अरुंद रस्ते असलेल्या वस्त्यातील आगीच्या घटनांवर त्वरित नियंत्रण आणण्यासाठी प्रशिक्षित मनुष्यबळ आवश्यक आहे. ही गरज लक्षात घेत ७ नोव्हेंबर २०१६ रोजी प्रादेशिक अग्निशमन प्रशिक्षण केंद्राची सुरुवात करण्यात आली. राज्यभरातील अग्निशमन दलाच्या जवानांना प्रशिक्षण देण्याचे काम प्रादेशिक अग्निशमन प्रशिक्षण केंद्र करत आहे. मागील नऊ वर्षांत शेकडो उमेदवारांना दर्जेदार प्रशिक्षण मिळाले आहे. नागपूरसह विदर्भातील उमेदवारांना मुंबई, पुणे, ठाणे येथे प्रशिक्षणासाठी जावे लागत असे. या नवीन प्रशिक्षण केंद्रामुळे आता इतरत्र ठिकाणी जाण्याची गरज भासत नाही. प्रादेशिक अग्निशमन प्रशिक्षण केंद्रात येण्यापूर्वी महाराष्ट्र शासनाच्या महाराष्ट्र अग्निशमन सेवा अकादमी मुंबई यांच्याकडून उमेदवारांची शारीरिक क्षमता चाचणी घेण्यात येते. यात उत्तीर्णांची १०० गुणांची परीक्षा घेतली जाते. यातील उत्तीर्ण उमेदवारांना नागपुरातील प्रादेशिक अग्निशमन प्रशिक्षण केंद्रासह राज्यातील अन्य ठिकाणी पाठविण्यात येते. सदर केंद्रात एकाच वर्षी जानेवारी ते जुलै आणि जुलै ते डिसेंबरदरम्यान दोन बॅच चालतात. सहा महिन्यांच्या प्रशिक्षणात उमेदवारांना अग्निशमन विभागाशी संबंधित सर्वच प्रशिक्षण दिले जाते. या सहा महिन्यात प्रशिक्षण घेतलेल्या उमेदवारांची महाराष्ट्र अग्निशमन सेवा अकादमीकडून परीक्षा घेतली जाते. यशस्वी उमेदवारांना महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळाचे प्रमाणपत्र दिले जाते. विशेष असे, की देशात कुठेही अग्निशमन विभागात नोकरीची संधी उपलब्ध असल्यास येथील उमेदवारांना प्राधान्य मिळते, अशी माहिती प्रशिक्षण केंद्राचे प्रमुख मो. अकलिम करीम शेख यांनी दिली.

### रचना अशी ...

**एकूण १०८८३.७२ चौ.मी क्षेत्रफळापैकी २४२.८२० चौ.मी जागेवर प्रादेशिक अग्निशमन प्रशिक्षण केंद्र उभारण्यात आले आहे. ही इमारत दोन मजली असून, यात उपमुख्य अग्निशमन अधिकारी, मुख्य पर्यवेक्षक यांचे कार्यालय, विश्राम कक्ष, कॅन्टीन, स्टोअर रूम, प्रशिक्षणार्थी उमेदवारांकरीता दोन डॉरमेट्री, मेस व क्लासरूम आहेत.**

---

# नागपुरात मंगळवारी रोजगार मेळावा

**नागपूर, दि. १३ :** नागपुरातील बेरोजगार तरुणांसाठी मंगळवारी (दि. १५) धरमपेठ महाविद्यालयात रोजगार मेळावा होत आहे. यात विविध कंपन्यांमार्फत ३०० हून अधिक जागांसाठी थेट मुलाखती घेऊन निवड केली जाणार आहे.जिल्हा कौशल्य विकास केंद्र आणि धरमपेठ महाविद्यालयातर्फे हा मेळावा सकाळी १० ते दुपारी ३ या वेळेत होईल. दहावी, बारावी, पदवीधर, आयटीआय, डिप्लोमाधारक उमेदवार पात्र आहेत. यात फ्लिपकार्ट, स्विगी, पॅन्टलून यांसारख्या कंपन्या सहभागी होतील. तसेच, कर्णबधीर, अल्पदृष्टी, अस्थिव्यंग दिव्यांगांसाठी ७० पेक्षा जास्त जागा उपलब्ध आहेत. जास्तीत जास्त उमेदवारांनी लाभ घ्यावा, असे आवाहन सहायक आयुक्त सुनंदा बजाज यांनी केले आहे. या मेळाव्यातून अनेकांना रोजगाराची संधी मिळणार असून, तरुणांनी उपस्थित राहावे, असे आयोजकांनी म्हटले आहे.




अजिंक्य भारत
# आपलं अकोला
अकोला, सोमवार, दि. १४ जुलै २०२५




# सार्वजनिक विभागाला आली जाग; रेल्वे पुलावरील खड्डे बुजविण्यास प्रारंभ

दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी



**अजिंक्य भारत इम्पॅक्ट**

**अकोला, दि. १३ :** अकोट रोडवरील ९४ वर्षे जुन्या ब्रिटिशकालीन मोठ्या रेल्वे पुलावर अपघाताला आमंत्रण देणारे जीवघेणे खड्डे पडल्याचे सचित्र वृत्त दैनिक अजिंक्य भारतने प्रकाशित केले असता, या वृत्ताची दखल सार्वजनिक बांधकाम विभागाने घेतली असून पुलावरील खड्डे बुजविण्यास प्रारंभ केला आहे. शतकाच्या उंबरठ्यावर असणाऱ्या पुलाचे नव्याने बांधकाम करण्याचा प्रस्ताव सार्वजनिक बांधकाम विभागाला रेल्वेने सादर केल्याची माहिती आहे.

सन १९३१ मध्ये ब्रिटिशांनी या रेल्वे पुलाचे बांधकाम केले असून २०२५ मध्ये या पुलाला ९४ वर्षे पूर्ण झाली आहेत. दरम्यान २०१७ मध्ये जिल्ह्यातील ब्रिटिशकालीन पुलांचे स्ट्रक्चरल ऑडिट करण्यात आले होते. संबंधित एजन्सीने पुलांचा अहवाल सार्वजनिक बांधकाम विभागाकडे सादर केला असता, त्यामध्ये चारही पूल वाहतुकीसाठी धोकादायक असल्याचे नमूद केले होते. त्यामध्ये या पुलाचाही समावेश होता. परंतु इतके वर्षे उलटूनही हा पूल नव्याने बांधण्याची गरज आहे, असे आतापर्यंत एकाही लोकप्रतिनिधीला वाटले नाही. दिवसेंदिवस पूलाची अवस्था दयनीय होत असून.या पुलावर मोठ मोठे खड्डे पडू लागले आहेत. अकोट व दर्यापूरकडे जाणारी सार्वजनिक वाहतूक व जड वाहतुक या पुलावरून होत आहे. तसेच अकोट फैल व रेल्वे लाईन पलिकडील नागरी वस्तीला जोडणारा हा पूल महत्त्वाचा दुवा आहे. परिणामी पुलावर वाहतुकीची मोठ्या प्रमाणावर रहदारी असते. टिळक रोड व बसस्थानक, रेल्वेस्थानक परिसरातून येणारी वाहने तसेच अकोट व दर्यापूर मार्गावरून येणारी वाहने या पूलावरून मार्गक्रमण करतात. वाहतूकीचा मोठा भार हा पूल वाहत असतानाही यावर पडणाऱ्या खड्ड्यांकडे सार्वजनिक बांधकाम विभाग दरवेळी दुर्लक्ष करीत असते. पावसामुळे पुलावर जागोजागी खड्डे पडून वाहतुकीसाठी पूल धोकादायक बनला होता. ही बाब दैनिक अजिंक्य भारतने वृत्ताच्या माध्यमातून प्रशासनाच्या समोर आणली असता सार्वजनिक बांधकाम विभागाने दखल घेऊन पुलावरील खड्डे बुजवण्याचे काम सुरू केले आहे.

## नवीन पुलाची मागणी

अकोला शहरातील अकोट रोडवरील मोठा रेल्वे पूल ब्रिटिशकालीन असून या पुलाची निर्मिती सन १९३१ मध्ये करण्यात आली. या पुलाचे आयुर्मान ९४ वर्षाचे झाले असून पुलाचे नव्याने बांधकाम करण्याचा प्रस्ताव रेल्वेने सार्वजनिक बांधकाम विभागाकडे सादर केल्याची माहिती आहे.

# चिखलात गाडले विकासाचे दावे; नागरिक त्रस्त

### आसरा माता कॉलनीसह अनेक भागात रस्त्यांची दुर्दशा; महापालिका मात्र गप्प!





दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी

**अकोला, दि. १३ :** पावसामुळे शहरातील खोदलेले रस्ते चिखलमय झाले असून, महापालिकेच्या नियोजनशून्य कारभारामुळे नागरिकांचे प्रचंड हाल सुरू आहेत. डाबकी रोडवरील आसरा माता कॉलनीत तर परिस्थिती अत्यंत गंभीर असून, नागरिकांना चिखलातून पाय टाकायला जागा नाही. दुचाकी बाहेर काढण्यासाठी टिन टाकून गाड्या ओढाव्या लागत आहेत, तर पायदळ लोकांना चिखल तुडवत प्रवास करावा लागत आहे.

महापालिकेने रस्ते आणि भूमिगत गटार योजनेसाठी काही महिन्यांपूर्वी खोदकाम सुरू केले होते, मात्र पावसाळा सुरू होतानाही ही कामे अपूर्णच राहिली. त्यामुळे आता रस्त्यांवर मातीचे ढिगारे आणि चिखलाचे साम्राज्य पसरले आहे. हीच समस्या केवळ आसरा माता कॉलनीपुरती मर्यादित नसून डाबकी रोड परिसरासह इतर प्रभागांतील नागरिकही अशाच संकटाला सामोरे जात आहेत.

शाळकरी मुले, महिला, वृद्ध यांना विशेषतः याचा त्रास होत असून, ''महापालिका प्रशासन गप्प का?'' असा सवाल नागरिक उपस्थित करत आहेत. यावर तातडीने उपाययोजना न झाल्यास तीव्र आंदोलन छेडण्याचा इशाराही नागरिकांनी दिला आहे. आता महापालिकेचे प्रशासन याकडे केव्हा आणि कसे लक्ष देणार, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

> महापालिकेचा हा गलथान कारभार असह्य झाला आहे. विकासाच्या नावाखाली रस्ते खोदून ठेवले आणि आता पावसात चिखलात आम्ही रेटत आहोत. महिला, मुले, आजारी लोकांचे हाल सुरूच आहेत. प्रशासन फक्त फोटोसेशनपुरते जागे होते का? तातडीने उपाय न झाला तर आम्ही रस्त्यावर उतरण्याशिवाय पर्याय ठेवणार नाही!
>
> **- वैद्य ओमनाथ वाडीकर**

# प्रशासकीय मंजुरीअभावी रस्ते दुरुस्तीला ब्रेक

**अकोला:** शहराच्या पश्चिम भागातील अमृत योजनेअंतर्गत, भूमिगत गटार योजनेच्या दुसऱ्या टप्प्यातील पहिल्या टप्प्याचे काम सुरू झाले आहे. रस्त्याच्या मध्यभागी मलजल वाहिनी टाकण्यासाठी खोदकाम काम सुरू आहे, त्यामुळे शहरातील रस्ते खोदले जात आहेत. शासनाने भूमिगत गटार योजनेच्या दुसऱ्या टप्प्यातील पहिल्या टप्प्यासाठी ६८३ कोटी रुपयांच्या प्रस्तावाला मंजुरी दिली आहे. या योजनेशी संबंधित ७३५ कोटी रुपयांच्या रस्ते दुरुस्तीच्या प्रस्तावाला तांत्रिक मान्यता मिळाली असली तरी, हे प्रकरण अद्याप प्रशासकीय मंजुरीच्या प्रतीक्षेत आहे.

योजनेनुसार, महापालिकेने मुख्य व अंतर्गत रस्त्यांवर मलजल वाहिनी टाकण्यासाठी खोदकामास सुरुवात केली आहे. या कामांमुळे आधीच मंजूर झालेल्या ८६ कोटी रुपयांच्या ८२ रस्त्यांवर काम सुरू झाले आहे. या कामानंतर रस्त्यांची पुन्हा दुरुस्ती करावी लागेल आणि त्यासाठी महानगरपालिकेने ७३५ कोटी रुपयांचा नवीन प्रस्ताव शासनाकडे पाठवला आहे. तथापि, या प्रस्तावाला अद्याप प्रशासकीय मान्यता मिळालेली नाही. महानगरपालिका प्रशासन या प्रस्तावाच्या मंजुरीची वाट पाहत आहे.

भूमिगत गटार योजनेचे काम सुरू झाले असून ६८३ कोटी रुपये खर्चाच्या भूमिगत गटार योजनेच्या प्रस्तावाला शासनाने मंजुरी दिल्यानंतर प्रशासनाने प्रत्यक्ष काम सुरू केले आहे. यामध्ये मुख्य रस्त्यांसह लहान रस्त्यांचाही समावेश आहे. सध्या रस्त्याच्या मध्यभागी चॅनेल टाकण्याचे आणि नंतर चाचणीनंतर त्यांना प्रत्येक घराशी जोडण्याचे काम केले जाईल. यासाठी रस्त्याच्या दोन्ही बाजूंना पुन्हा खोदकाम करावे लागणार असल्याने, संपूर्ण दुरुस्ती प्रक्रिया या वर्षाच्या अखेरीपर्यंत लांबणीवर पडू शकते.

## भूमिगत गटार प्रकल्प

- पहिला टप्पा - ६८३ कोटी रुपये मंजूर
- रस्ते दुरुस्तीचा प्रस्ताव ७३५ रु. अद्याप मंजुरीसाठी प्रलंबित
- ८६ कोटी रुपयांच्या रस्त्यांच्या खोदकामाला आधीच मंजुरी देण्यात आली आहे.

## स्वच्छ अकोला सुंदर अकोला...



**शहरातील मध्यवर्ती भागात असलेले जुने बस स्थानक परिसरात घाणीचे साम्राज्य पसरले असून यामध्ये कुजलेल अन्न तसेच सडलेला भाजीपाला पावसाळ्याच्या दिवसात आणून टाकल्याने बस स्थानक परिसरात सर्व कडे दुर्गंधी पसरली आहे या दुर्गंधीचा सामना प्रवाशांना तसेच इतर जनसामान्य जनतेला सहन करावा लागत आहे. याकडे संबंधित प्रशासन लक्ष देईल का? अशी आस जनतेला लागलेली आहे. (छाया. संजय ताथुरकर)**

# अकोटच्या नवीन बायपासला तत्त्वत: मान्यता

दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी

**अकोला, दि. १२ :** अकोट शहराला वाहतूक कोंडीपासून मुक्त करण्याच्या दिशेने मोठे पाऊल उचलण्यात आले आहे. अकोला-अकोट-बैतुल कॉरिडॉरवरील (एन एच१६१ ए) वाढती वाहतूक आणि त्याचा अकोट शहरावर होणारा ताण लक्षात घेता, राष्ट्रीय महामार्ग १६१ ला २०४ शी शहराबाहेरील बायपास रस्त्याने जोडण्याची मागणी खासदार अनुप धोत्रे यांनी केंद्रीय रस्ते वाहतूक मंत्री नितीन गडकरी यांच्याकडे केली होती.या मागणीला ना. गडकरी यांनी तत्त्वतः मान्यता देत, संबंधित प्रस्ताव सादर करण्याचे निर्देश दिले आहेत.

अकोट शहरातील नागरिकांना, व्यावसायिकांना आणि प्रवाशांना मोठा दिलासा मिळणार आहे. या निर्णयाबद्दल खा. अनुप धोत्रे यांनी ना. गडकरी यांचे अभिनंदन करत आभार व्यक्त केले आहेत.

१६१ हा महामार्ग महाराष्ट्राच्या अकोला जिल्ह्यातून मध्यप्रदेश, तेलंगणा, आंध्रप्रदेश आणि मराठवाडा भागाला जोडतो. गेल्या काही वर्षांमध्ये या मार्गावरील वाहतूक झपाट्याने वाढली आहे. मात्र अकोट शहरातूनच या महामार्गाचा प्रवास होत असल्यामुळे शहराच्या अंतर्गत रस्त्यांवर आणि नागरिकांच्या दैनंदिन जीवनावर मोठा ताण आला आहे. शहरातील रस्ते अरुंद असून, दररोज होणारी अवजड वाहतूक दुर्घटनांचा धोका वाढवत आहे. परिणामी, बायपास रस्त्याची गरज अकोटकर नागरिक, स्थानिक लोकप्रतिनिधी आणि व्यापार उद्योग संघटनांनी सातत्याने मांडली होती. खा. अनुप धोत्रे यांनी या बाबतीत अकोटचे आमदार प्रकाश भारसाकळे आणि नागरिकांच्या वतीने दिल्ली येथे ना. नितीन गडकरी यांची भेट घेऊन या बायपासची गरज मांडली होती.

# हॉकर्स - नो हॉकर्स झोन निश्चिती रखडली

दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी

**अकोला, दि. १३ :** केंद्र सरकारने राष्ट्रीय फेरीवाला धोरण अंमलात आणले आहे. या धोरणाची महापालिकेच्या माध्यमातून २०१३ पासून अंमलबजावणी केली जात आहे. या धोरणांतर्गत महापालिकेने २०२४ मध्ये सदस्यीय नगर पथविक्रेता समिती गठीत केली होती.

नगर पथविक्रेता समिती सदस्य निवडणूक प्रक्रियेला आठ ते नऊ महिन्याचा कालावधी उलटूनही सदस्य निवडीचे अद्यापपर्यंत शासन राजपत्र प्रसिद्ध झालेले नाही. एनयूएलएमने समिती अधिसूचित करण्याचा प्रस्ताव ७ मार्च २०२५ रोजी राज्य शासनाकडे सादर केला आहे. या प्रस्तावाला शासनाकडून मंजुरी कधी मिळणार, असा प्रश्न उपस्थित केला जात आहे. सर्वेक्षणाच्या माध्यमातून एनयूएलएमने ४०३३ फेरीवाल्यांची नोंद केली होती. यानंतर फेरीवाला धोरणात शासनाकडून बदल करण्यात येऊन सुधारित निर्णय सरकारकडून जाहीर करण्यात आला. दरम्यान २० सदस्यीय नगर पथविक्रेता समिती स्थापन करण्याची कार्यवाही सुरू करण्यात आली.

पथविक्रेता समितीत नोंदणीकृत फेरीवाल्यांमधून आठ सदस्यांची निवडणुकीद्वारे नियुक्ती करणे बंधनकारक करण्यात आल्याने या आठ सदस्यांच्या निवडीसाठी कामगार उपायुक्त कार्यालयामार्फत निवडणूक घेण्यात आली. फेरीवाला समितीचे गठण होत नसल्यामुळे फेरीवाला धोरणाची अंमलबजावणी करताना अडचणी निर्माण होत आहेत. फेरीवाल्यांचे सर्वेक्षण, नवीन हॉकर्स झोन निश्चित करणे, सध्याच्या झोनचा आढावा घेणे, अशा विविध बाबी प्रलंबित आहेत.

## निवड प्रक्रिया पूर्ण

महापालिकेने ४०३३ नोंदणीकृत फेरीवाल्यांची अंतिम मतदार यादी जाहीर केली होती. ८ जागांसाठी २० सप्टेंबर २०२४ रोजी निवड प्रक्रिया पूर्ण करण्यात आली. या निवडीची अधिसूचना शासन राजपत्रात जाहीर होणे आवश्यक असल्याने मनपाच्या फेरीवाला विभागाने शासनाकडे प्रस्ताव पाठविला आहे. मात्र, शासन राजपत्र प्रसिद्ध होऊ शकलेले नाही.

## अशी आहे समिती

अध्यक्ष - आयुक्त महापालिका, सदस्य - पोलीस अधीक्षक अकोला, स्थानिक वाहतूक पोलीस निरीक्षक अकोला, वैद्यकीय आरोग्य अधिकारी महापालिका, नगर रचनाकार महापालिका, पथविक्रेत्यांचे आठ प्रतिनिधी, अशासकीय संघटना समुदाय आधारित संघटनांची दोन प्रतिनिधी, निवासी कल्याण संघाचे दोन प्रतिनिधी, व्यापारी संघाचा एक प्रतिनिधी, पणन संघाचा एक प्रतिनिधी, जिल्हा अग्रणी बँकेचा एक प्रतिनिधी असे एकूण २० जणांची समिती आहे.

# फटाके फोडणाऱ्या बुलेटवाल्यांवर वाहतूक पोलीसांचा हल्लाबोल!

### डझनभर बुलेटचे सायलेन्सर जप्त



दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी

**अकोला, दि. १३ :** गर्दीच्या रस्त्यांवर, शाळा-महाविद्यालय परिसरात 'हिरोगिरी' करत बुलेटला फटाक्यांसारखा आवाज करणाऱ्या तरुणांविरुद्ध अखेर वाहतूक पोलिसांनी कडक पावले उचलली आहेत. जिल्हा पोलीस अधीक्षक अर्चित चांडक यांच्या आदेशानंतर शहर वाहतूक शाखेने धडक मोहीम राबवली असून आतापर्यंत डझनभर बुलेट गाड्यांचे विशेष सायलेन्सर जप्त करण्यात आले आहेत.

शहरातील काही युवक सायलेन्सरमध्ये फटाके फोडणारी विशेष रचना बसवून रस्त्यांवर गाड्या 'रेस' करीत, नागरिकांची झोप उडवत, वयोवृद्ध व लहान मुलांचे हाल करत 'हुशारी' प्रदर्शित करत होते. ही ट्रेंडिंग स्टाईल आता त्यांच्या खिशावर आणि गाडीवर भारी पडत आहे.

वाहतूक शाखेचे पोलीस निरीक्षक मनोज बहुरे यांच्या नेतृत्वात ही मोहीम सुरू असून, सध्या शाळा-महाविद्यालय परिसरात, बाजारपेठेत आणि गर्दीच्या ठिकाणी हे विशेष लक्ष दिलं जात आहे. आतापर्यंत कारवाईत अनेक बुलेट चालकांवर दंड आकारण्यात आला असून त्यांच्या गाड्यांवर लावलेले फटाके सायलेन्सर पोलीसांनी ताब्यात घेतले आहेत.

जिल्हा पोलीस अधीक्षक अर्चित चांडक यांनी स्पष्टपणे इशारा दिला आहे की, अशा ध्वनीप्रदूषण करणाऱ्या गाड्यांना अजिबात सवलत दिली जाणार नाही. यापुढे अशा प्रकारे नियम मोडणाऱ्यांविरुद्ध गंभीर आणि कायदेशीर कारवाई करण्यात येईल.वाहतूक विभागाने नागरिकांना आवाहन केले आहे की, अशा बुलेटच्या आवाजांमुळे त्रस्त झाल्यास तात्काळ पोलिसांना कळवावे, जेणेकरून त्वरीत कारवाई करता येईल. ही मोहीम अधिक तीव्र करण्याची तयारी वाहतूक पोलिसांनी सुरू केली असून, ही 'फटाके सायलेन्सर' संस्कृती बंद न केल्यास वाहनधारकांना परवाना रद्दीकरणासारख्या कठोर कारवायांना सामोरे जावे लागू शकते. नागरिकांनी सहकार्य करावे आणि सुरक्षित, शांत शहरासाठी पुढे यावे, असे आवाहन वाहतूक विभागाकडून करण्यात आले आहे.

# मस्जिद म्हणजे फक्त नमाज नव्हे, माणुसकीचाही संदेश!

### इस्लाम धर्माची खरी ओळख पत्रकारांसमोर मांडणारा 'मस्जिद परिचय कार्यक्रम'

दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी



**अकोला, दि. १३ :** राईट वे फाउंडेशन, अकोला यांच्या वतीने समाजामध्ये सलोखा, समज आणि सौहार्द वाढविण्याच्या उद्देशाने एक अभिनव उपक्रम ''मस्जिद परिचय सद्भावना कार्यक्रम'' रविवार, दिनांक १३ जुलै २०२५ रोजी मोमिनपुरा येथील मस्जिद प्रांगणात आयोजित करण्यात आला. अकोला जिल्ह्यातील सर्व पत्रकार बांधवांसाठी विशेषतः आयोजित करण्यात आलेल्या या कार्यक्रमात इस्लाम धर्माची मूलभूत तत्त्वे, मस्जिदचे सामाजिक आणि धार्मिक महत्त्व तसेच कुरआनमध्ये माणुसकीला दिलेले स्थान याबाबत सखोल माहिती देण्यात आली.

कार्यक्रमाचे प्रमुख वक्ते मौलाना इस्माईल काश्मीरी यांनी इस्लाम म्हणजे शांतता, समर्पण, न्याय, करुणा व समानतेचा धर्म असल्याचे विशद केले. अजान म्हणजे नमाजीसाठी दिली जाणारी शांततामय साद असल्याचे सांगत त्यांनी तिचा अर्थ समजावून सांगितला. मस्जिद ही केवळ प्रार्थनास्थळ नसून, ती सामाजिक एकोपा, शिक्षण, सेवा आणि मानवी मूल्यांची जपणूक करणारे केंद्र आहे, असेही त्यांनी स्पष्ट केले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी राईट वे फाउंडेशनचे अध्यक्ष हाजी सज्जाद हुसैन होते. त्यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणात सांगितले की, ''आज इस्लाम विषयी अनेक गैरसमज समाजात पसरले आहेत. या गैरसमजांना संवाद आणि समजुतीच्या माध्यमातून दूर करून सौहार्द आणि ऐक्य निर्माण करणे, हाच आमचा खरा उद्देश आहे. मस्जिद ही द्वेष नव्हे, तर प्रेम आणि माणुसकीचा संदेश देणारी जागा आहे.''

कार्यक्रमाची प्रस्तावना जहूर सर यांनी केली, तर मस्जिदचे संपूर्ण परिचय अमिन सर यांनी सादर केले. उपस्थित पत्रकारांना मस्जिदमध्ये प्रत्यक्ष फेरफटका घडवून आणण्यात आला. यामध्ये नमाज प्रक्रिया, वुज़ू (शुचिर्भूत होण्याची पद्धत), मिंबर, कुरआन व सामाजिक उपक्रम यांची थेट माहिती देण्यात आली. विशेष म्हणजे पत्रकारांनी ही संपूर्ण प्रक्रिया प्रत्यक्ष पाहून अनुभवली.

कुरआनमधील ''एका जीवाचे रक्षण म्हणजे संपूर्ण मानवतेचे रक्षण'' या संदेशाचा संदर्भ देत मौलानांनी इस्लामच्या माणुसकीकेंद्रित दृष्टिकोनावर भर दिला. इस्लाम हा धर्म कधीही जबरदस्ती करत नाही, तर तो विचार, करुणा व सुसंवाद यांचा संदेश देतो, हे या कार्यक्रमात अधोरेखित करण्यात आले.

कार्यक्रमाच्या शेवटी सर्व पत्रकारांना इस्लाम व मस्जिद संदर्भातील माहितीपूर्ण साहित्य भेट म्हणून देण्यात आले. आभार प्रदर्शन फाउंडेशनचे अध्यक्ष हाजी सज्जाद हुसैन यांनी करत सर्व उपस्थितांचे मन:पूर्वक आभार मानले. ''संवाद आणि समजुतीच्या माध्यमातूनच द्वेषाची भिंत कोसळेल आणि धर्मांच्या पलीकडील खरी बंधुभावाची भावना निर्माण होईल,'' असे उद्गार त्यांनी यावेळी काढले.

या कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनामध्ये राईट वे फाउंडेशनचे अफजल गाझी, अमिन सर, जहूर सर, मोहम्मद जावेद, अली सर, मोहम्मद सलीम, अब्दुल हादी, अंजार हुसेन, सादिक अली, वसीम सर, औरंगजेब हुसेन, डॉ. जाकिर अली, अज़हर हुसैन मोटावली तसेच मस्जिद प्रशासन व स्वयंसेवक यांचे मोलाचे योगदान लाभले.हा कार्यक्रम संवादातून समजुतीकडे, आणि धार्मिक ऐक्याच्या दिशेने टाकलेले एक सकारात्मक पाऊल ठरले.

## थोडक्यात

### बाहेरगावी जाऊन येतो सांगून घरी परतलेच नाही

**मंगरूळपीर :** शहरातील संभाजीनगर भागात राहणारे मनोज विष्णू इंगळे (वय ३९) हे ११ जुलै रोजी घरातून बाहेर गेले असून, अद्याप परतलेले नाहीत. या प्रकरणी त्यांची पत्नी पुष्पा इंगळे यांनी मंगरूळपीर पोलिसात तक्रार दाखल केली. इंगळे यांनी बाहेरगावी जाऊन येतो असे सांगून घर सोडले. मात्र, रात्रीपर्यंत घरी परत न आल्याने नातेवाईक व परिचितांकडे विचारपूस केली असता त्यांचा ठावठिकाणा लागला नाही. त्यामुळे अखेर पुष्पा इंगळे यांनी पोलिस स्टेशन गाठून तक्रार दाखल केली. पोलिसांनी घटनेची नोंद घेऊन तपासकार्य हाती घेतले.

### सहा महिन्यांतच उखडला रिधोरा ते ब्राह्मणवाडा रस्ता

**मालेगाव :** तालुक्यातील रिधोरा ब्राह्मणवाडा रस्त्याचे डांबरीकरण सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत अवघ्या सहा महिन्यांपूर्वी करण्यात आले होते. मात्र, या रस्त्याची दुरवस्था होत असून जागोजागी खड्डे निर्माण झाले आहेत. रस्त्याचे काम अत्यंत निकृष्ट दर्जाचे झाले असल्याचा आरोप करत गावकरी करीत आहेत. दोषींवर कठोर कारवाई करण्यात यावी आणि संपूर्ण रस्ता नव्याने डांबरीकरण करून दुरुस्त करण्यात यावा, अशी मागणी केली आहे.

### क्षुल्लक कारणावरून दगडाने मारहाण करून जखमी!

**शेलु बाजार :** क्षुल्लक कारणावरून झालेल्या वादात एका व्यक्तीला डोक्यावर दगड मारून जखमी केल्याप्रकरणी दाखल तक्रारीवरून पोलिसांनी १२ जुलै रोजी मंगेश ठाकरे (चिखली झोलेबाबा) याच्यावर गुन्हा दाखल केला. सदाशिव साखरे यांच्या घरावर ११ जुलै रोजी आरोपीने दगड फेकले. आवाज ऐकून फिर्यादीने बाहेर येऊन जाब विचारला असता आरोपीने शिवीगाळ केली व हातातील दगड त्यांच्या दिशेने फेकला. तो डोक्याला लागल्याने सदाशिव साखरे जखमी झाले.

### मालेगाव न्यायालयाच्या नियोजित जागेसाठीचा प्रश्न मार्गी

**मालेगाव :** मालेगाव न्यायालयाच्या स्थापनेपासून सुरू असलेला जागेसाठीचा संघर्ष अखेर संपला आहे. ११ जुलै रोजी अधिकृत मोजणी करून ४ एकर जागा न्यायालयासाठी हस्तांतरित करण्यात आली. यासाठी न्यायमूर्ती गोविंदराव सानप यांच्या मार्गदर्शनात वकील संघाच्या सातत्यपूर्ण संघर्षाला यश प्राप्त झाले. १९९२ पासून न्यायालय खासगी इमारतीत सुरू होते. २०१५ मध्ये प्राथमिक आरोग्य केंद्राच्या जीर्ण इमारतीत ते स्थलांतरित झाले; मात्र ती जागाही अयोग्य होती. गेल्या दशकभरात वकिलांनी पंचायत समितीची जागा न्यायालयास मिळावी यासाठी सातत्याने संघर्ष केला. अखेर प्रशासनाला जाग आली आणि मोजणी करून जागा मंजूर झाली.

### रिसोड पोलिस स्टेशनच्या नवीन वसाहतीचा प्रश्न लागणार मार्गी!

**रिसोड :** रिसोड पोलीस स्टेशन अंतर्गत अधिकारी,कर्मचारी वर्गाच्या वसाहतीसाठी तत्कालीन ठाणेदार देवेंद्रसिंह ठाकूर यांनी मागणी केली होती. सद्यस्थिती रिसोड पोलीस निरीक्षक रामेश्वर चव्हाण यांचा सतत पाठपुरावा करत आहेत.यावर आमदार अमित झनक यांनी सुरू असलेल्या पावसाळी अधिवेशनात मुद्दा मांडल्याने येथील पोलिस वसाहतीचा प्रश्न लवकरच मार्गी लागण्याची शक्यता निर्माण झाली आहे.

### मराठा न्यायदान कक्षाच्या जिल्हाध्यक्षपदी ॲड. वैभव तिफणे

**वाशीम :** मराठा न्यायदान कक्षाच्या जिल्हाध्यक्षपदी ॲड.वैभव माणिकराव तिफणे यांची निवड झाली आहे. त्यांच्या नियुक्तीचे पत्र मराठा सेवा संघाचे राज्य उपाध्यक्ष अरविंदराव गावंडे यांच्या हस्ते नुकतेच देण्यात आले. ॲड.तिफणे यांच्या निवड प्रसंगी जिजाऊ ब्रिगेडच्या प्रदेशाध्यक्ष सीमाताई बोके, राज्य उपाध्यक्ष ज्योती कोथळकर, राज्य मार्गदर्शिका सुनीताताई जिचकार, मराठा सेवा संघाचे विभागीय अध्यक्ष अशोकराव महाले, जिल्हाध्यक्ष नारायणराव काळबांडे, आदी मान्यवरांची उपस्थिती होती.

# जिल्ह्यात घरफोडीचे नऊ गुन्हे उघड

## आंतर जिल्हा टोळीतील दोन आरोपींच्या आवळल्या मुसक्या

**दै. अजिंक्य भारत । प्रतिनिधी**

**वाशिम, दि. १३ :** वाशिम येथील एका साथीदाराच्या मदतीने घरफोडीचे गुन्हे करणारा सराईत गुन्हेगार ईश्वर उर्फ प्रभुराज युवराज पवार ( वय २५ वर्ष, रा. बिबी ता. लोणार जि. बुलढाणा) याला ताब्यात घेतल्यानंतर त्याने वाशिम जिल्हयातील एकुण ०९ घरफोडी केली असल्याची कबुली दिली.

विशेष पोलीस महानिरीक्षक रामनाथ पोकळे, अमरावती परिक्षेत्र अमरावती यांनी दि.०८.०७.२०२५ रोजी वाशिम येथील भेटीदरम्याण रात्रघरफोडीचे गुन्हयाबाबत आढावा घेवुन विशेष सुचना दिल्या. जिल्हा पोलीस अधिक्षक अनुज तारे यांनी उघडकीस न आलेल्या गुन्हयांना उघडकीस आणण्यावर भर देवुन स्थानिक गुन्हे शाखेला मार्गदर्शन करुन आदेश दिले.

त्यानुसार स्थानिक गुन्हे शाखेने घडलेल्या गुन्हयांच्या तांत्रीक बाबी तपासुन विश्लेषनात्मक अभ्यास केला. गुन्हेगारांचे रेकॉर्ड, सिसिटीव्ही फुटेज बघुन आरोपींनी घरफोडीकरीता वापरलेल्या पध्दतींचा अभ्यास केल्याने त्यावरुन असे लक्षात आले की, बुलढाणा जिल्हयातील विशीष्ट भागातील घरफोडीचे गुन्हे करणारे गुन्हेगारांच्या टोळया वाशिम, अकोला, अमरावती, बुलढाणा, परभणी, बिड असे महाराष्ट्रातील जिल्हयांमध्ये सक्रीय आहे. त्यावरुन सतत घरफोडीचे गुन्हेगारांवर पाळत ठेवुन त्यांच्या प्रत्येक हालचालीवर लक्ष ठेवल्या जात होते. आरोपींना पकडण्यासाठी स्थानिक गुन्हे शाखेचे सतत प्रयत्न चालुच होते.

दरम्यान घरफोडीचे गुन्हे करणारा सराईत गुन्हेगार ईश्वर उर्फ प्रभुराज युवराज पवार वय २५ वर्ष, रा. बिबी ता. लोणार जि. बुलढाणा याचे बाबत खात्रीशिर माहिती प्राप्त झाल्याने तात्काळ स्थानिक गुन्हे



शाखा, वाशिम चे टिमने ग्राम बिबी, जि. बुलढाणा येथे पोहचुन कमालीचे प्रयत्न करुन आरोपी ईश्वर पवार यास ताब्यात घेतले. त्याला विश्वासात घेवुन विचारपुस केली असता आरोपीने त्याचे साथीदाराचे नावे सांगुन वाशिम जिल्हयातील एकुण ०९ घरफोडी केली असल्याची कबुली दिली. आरोपीचा दुसरा साथीदार शामराव रामकिशन पवार वय ३२ वर्ष, रा. जांभरुन नावजी, जि.वाशिम यास ताब्यात घेवुन दोन्ही आरोपींना दि.१२.०७.२०२५ रोजी अटक करण्यात आली. असुन मा. न्यायालयाने अधिक तपासाकरीता ०४ दिवसांची पोलीस कोठडी मंजुर केली आहे.

आरोपींना विचारपुस केली असता त्यांनी प्राथमीक स्तरावर पोलीस स्टेशन रिसोड, मालेगाव, वाशिम ग्रामीण, मंगरुळपीर व कारंजा ग्रामीण येचील एकुण ०९ गुन्हयांची कबुली दिली आहे. इतर आरोपींचा शोध घेणे चालु आहे. पोलीस स्टेशन रिसोड चे ठाणेदार रामेश्वर चव्हाण व त्यांचे टिमला माहिती दिल्याने त्यांनी अधिकचे गुन्हे व गुन्हयातील चोरीस गेलेली मालमत्ता हस्तगत करण्याकरीता कसोशिने प्रयत्न करीत आहेत. जिल्हयातील व जिल्हयाबाहेरील आणखी घरफोडीचे व चोरीचे गुन्हे उघडकीस येण्याची शक्यता आहे.

सदर कारवाई अनुज तारे, पोलीस अधिक्षक वाशिम,. लता फड, अपर पोलीस अधिक्षक, वाशिम, नवदीप अग्रवाल, सहायक पोलीस अधिक्षक यांचे मार्गदर्शनात प्रदीप परदेशी, वरीष्ठ पोलीस निरीक्षक, स्थानिक गुन्हे शाखा, वाशिम सपोनि जगदीश बांगर, पोउपनि शेखर मास्कर, व अंमलदार दिपक घुगे, दिपक सोनोने, गजानन अवगळे, गजानन झगरे, सुरज खडके, प्रविण सिरसाट, गजानन गोटे, दिलीप देवकते, विठ्ठल महल्ले, संदीप दुतोंडे, अमोल इरतकर, विजय नागरे, सतोष वाघ, सुनिल तायडे, संदीप डाखोरे, किशोर इंगळे महिला अंमलदार, सुषमा तोडकर, यांनी सतत कार्यरत राहुन अचूक परिश्रम घेवुन गोपनिय माहिती मिळवुन केलेल्या तांत्रीक तपासामुळेच गुन्हे उघडकीस आले आहेत.

**सराईत गाव गुंड ठोकेवर एमपीडीए कायदयान्वये कारवाई.**

पोस्टे वाशिम शहर हद्दीत, नालंदा नगर येथे राहणारा संतोष आत्माराम ठोके याचेवर वाशिम जिल्हा तसेच अकोला जिल्हयामध्ये प्राणघातक हत्यारानिशी गंभीर दुखापती, खंडणी, चोरी, जबरीचोरीचे अनेक गुन्हे दाखल आहेत. त्याचेवर वारंवार प्रतिबंधक कारवाई केलेल्या आहेत. एवढयातच कारागृहातुन बाहेर आल्यानंतर संतोष ठोकेचे गुन्हेगारी कृत्य चालुच असल्याने त्याचेवर आणखी दोन दुखापतीचे गुन्हे दाखल झाले.

## दुचाकीच्या डिक्कीतून ४.५० लाख रुपये पळविले: चोरटे सीसीटीव्हीत कैद

**दै. अजिंक्य भारत । प्रतिनिधी**

**वाशिम, दि. १३ :** मंगरूळपीर मार्गावरील कारंजा कृषी उत्पन्न बाजार समितीच्या यार्ड क्रमांक २ मधून अज्ञात चोरट्यांनी अडत्याच्या दुचाकीच्या डिक्कीत ठेवलेले ४.५० लाख रुपये लंपास केल्याची घटना ११ जुलै रोजी घडली. या घटनेने परिसरात खळबळ उडाली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, कारंजा बाजार समितीतील अडते शांतीलाल रुणवाल यांनी शेतकऱ्यांच्या खरेदी केलेल्या मालाच्या चुकारा करण्यासाठी बँकेतून ४ लाख ५० हजार रुपये काढले. त्यांनी ती रक्कम आपल्या दुचाकीच्या डिक्कीत ठेवून यार्ड क्रमांक २ मधील हनुमान मंदिरात दर्शनासाठी गेले. दरम्यान, त्यांच्या मागावर असलेल्या अज्ञात चोरट्यांनी संधी साधून डिक्कीतून पैशांची पिशवी चोरली आणि आधीच तयार



असलेल्या दुसऱ्या दुचाकीवरून पसार झाले. ही संपूर्ण घटना बाजार समिती परिसरातील सीसीटीव्ही कॅमेऱ्यात कैद झाली असली, तरी चोरट्यांचे चेहरे आणि वाहन क्रमांक स्पष्टपणे ओळखू आलेले नाहीत. विशेष म्हणजे, मागील वर्षीही अशाच प्रकारे रुणवाल यांच्या दुचाकीतून ८ लाख रुपयांची चोरी झाली होती. या घटनेची तक्रार कारंजा शहर पोलीस ठाण्यात दाखल करण्यात आली असून, पोलिसांनी अज्ञात चोरट्यांविरुद्ध गुन्हा नोंदवून आहे. तपास सुरु केला.

## रेंगाळलेल्या वाईगौळ मधील महामार्गाच्या निर्मितीस प्रारंभ

**दै. अजिंक्य भारत । प्रतिनिधी**

**मानोरा, दि. १३ :** तालुक्यातून राष्ट्रीय महामार्ग विकास प्राधिकरणा द्वारा निर्माण करण्यात आलेल्या महामार्ग जवळपास पूर्ण झालेला आहे. काही तांत्रिक व कायदेशीर अडचणीमुळे वाईगौळ (अमरगड) या गावांमध्ये रखडलेला राष्ट्रीय महामार्ग स्थानिक नागरिकांनी केलेल्या आंदोलनामुळे प्रशासनाने रस्ता बांधकाम करण्यास सुरुवात केली आहे.



साखरडोह, कोलार, अभयखेडा आमगव्हाण, विठोली, बेलोरा, हातना, माऊली आणि वाई गौळ (अमरगड) ही गावे व मानोरा शहर नगरपंचायतीच्या मध्यभागातून या महामार्गाची निर्मिती राष्ट्रीय महामार्ग विकास प्राधिकरणाद्वारे कंत्राटदार कंपनीच्या माध्यमातून करण्यात आलेली आहे.

उपरोक्त शहर व गावातून निर्माण करण्यात आलेल्या या महामार्गाच्या दोन्ही बाजूच्या सिमेंट नाल्याचे बांधकाम पूर्ण झालेले असून तालुक्यातील वाई गौळ या गावातील नागरिकांनी महामार्ग निर्मिती दरम्यान योग्य मोबदला देण्यात येण्याच्या मागणीसाठी आंदोलन करून बांधकाम रोखले होते.

राष्ट्रीय महामार्ग विकास प्राधिकरणाकडून स्थानिक नागरिकांची शंका निरसन करण्यात आल्यानंतरही अनेक वर्षांपासून या गावातील राष्ट्रीय महामार्ग बांधकाम खोळंबलेले असल्याने स्थानिक नागरिक, विद्यार्थी व या गावातून येजा करणाऱ्या प्रवासी तथा वाहनांना अडचणीचा सामना करावा लागत होता. खोळंबलेले बांधकाम पूर्ण करण्यासाठी स्थानिक नागरिकांनी रास्ता रोको सुद्धा केले होते. प्रशासनाने महामार्ग बांधकाम सुरू करण्यात येण्यासंदर्भात दिलेल्या लेखी आश्वासना नुसार आता रखडलेल्या राष्ट्रीय महामार्गाच्या बांधकामासाठी आवश्यक असलेल्या गावालगाच्या सिमेंट नाल्याच्या कामाला गती देण्यात आल्याने महामार्ग बांधला जाण्याची शक्यता निर्माण झालेली असल्याचे निदर्शनास येत आहे.

## वात्सल्य हॉस्पीटलमध्ये शेतकऱ्यांसाठी दररोज मोफत तपासणी

**वाशीम :** सध्यास्थितीत पेरणी पाण्याचे दिव आहे वातावरणातही बदल झाला आहे. त्यामुळे रोगराईत वाढ झाली आहे. साथिचे रोगही वाढत आहे. त्यासाठी शेतकऱ्यांना डॉ. प्रदिप देशमुख यांच्या वात्सल्य हॉस्पीटलमध्ये गुरूर्षोणिमेपासून जनसेवा हीच रूग्ण सेवा म्हणून दररोज मोफत आरोग्य तपासणी करण्यात येणार आहे. डॉ. प्रदिप देशमुख यांनी कोरोनाकाळत रूग्ण सेवेसोबत इतरही सेवा मोफत देवून जनतसेवा केली होती. त्यानंतर आता शेतकऱ्यांसाठी सवलतीच्या दरात आरोग्य शिबिराचे आयोजन दररोज करीत आहेत. शिवाय मोफत उपचारही देत आहेत. बालरोग व स्त्रिरोग तपासणी, फि रूग्णाच्या इच्छेनुसार घेतात. शेतकऱ्यांच्या कुटुंबाची मोफतच तपासणी करतात. रूग्णाच्या इच्छेप्रमाणेच तपासणी करून इंजेक्शन सलाईन देवून आवश्यकतेनुसारच औषधी देतात. रूग्णांना विनाकारण खर्चात पाडत नाहीत. त्यांचे मानसिक समाधान करून रोगाची भिती दुर करतात. रक्त तपासणीमध्ये ३० ते ५० टक्के सुट देतात. आरबीएस शुगर तपासणी फक्त २० रूपयामध्ये करतात. केअर अडमिट रूग्णाला बिलात ३० ते ५० टक्के सुट देतात. रूग्णांना इच्छेनुसार दान स्वरूपात पेटी लावून समाधान झाल्यास रक्कम टाकण्यास सांगतात. दररोज प्रथम येणाऱ्या १० रूग्णांसाठी सर्व आरोग्य सेवा मोफत देतात. त्यामुळे रूग्ण सेवाही सेवा माणुन डॉ. प्रदिप देशमुख वात्सल्य हॉस्पीटल काटा रोड काटा चौफुली येथे दररोज आरोग्य तपासणी करतात.

## भाजीपाल्याची हर्रासी सकाळी सहा वाजता करा!

### सायंकाळच्या हर्राशित मिळेना भाव: शेतकरी व अडते यांची मागणी

**दै. अजिंक्य भारत । प्रतिनिधी**

**कारंजा (लाड), दि. १३ :** कारंजा बाजार समितीमध्ये भाजी पाला हर्रासी दुपारी ३ वाजता पासुन सुरू होते. परंतु शेतकऱ्यांना आपल्या शेतातील भाजीपाला काढून स्वच्छ करून बाजार समितीत पोहचे पर्यंत संध्याकाळचे ६ ते ७ वाजतात. अशा परिस्थितीत ३ वाजता सुरू झालेली हर्रासी ६ वाजे पर्यंत संपून जाते . परिणामी भाजीपाला विकत घेण्यासाठी व्यापारी नसल्यामुळे भाजीपाल्याला भाव मिळत नाही. त्यामुळे भाजीपाल्याची हर्रासी सकाळी ६ वाजता करण्याची मागणी शेतकरी आणि आडते यांनी केली आहे.



कारंजा बाजार समितीमध्ये भाजी पाला हर्राशीं दुपारी ३ वाजता पासुन सुरू होते , परंतु सर्व शेतकरी भाजीपाला उत्पादक यांनी आम्हाला विनंती केली आहे आहे की भाजीपाला हर्रासी ही संध्याकाळी होत असल्यामुळे आमचे मालाला व्यापारी नसल्यामुळे भाव मिळत नाही व माल तसाच राहतो त्यामुळे त्यांचा आर्थिक नुकसान होते,ह्या वेळेस बरेच व्यापारी बाजारात गेले असल्यामुळे ते संध्याकाळी हर्रासी मध्ये येवू शकत नाही.मात्र व्यापारी माल खरेदी करिता सकाळी बाजारात येऊ शकतात. अशी विनंती केली आहे. तसेच सर्व भाजीपाला अडते यांची सुद्धा अशी विनंती आहे की सर्व शेतकरी भाजीपाला उत्पादक यांचे कोणतेही आर्थिक नुकसान होऊ नये म्हणुन भाजीपाला लिलाव पूर्वी प्रमाणे सकाळी करण्यात यावा. अशी मागणी करण्यात आली आहे.

## संत्रा पिकाच्या नुकसान भरपाईसाठी शेतकऱ्यांचा बुधवारी मोर्चा

**मानोरा :** दोन महिन्या आधी झालेल्या अवकाळी पावसामुळे मानोरा तालुक्यातील संत्रा उत्पादक शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले असून, अद्याप कोणतीही भरपाई न मिळाल्याने शेतकरी संतप्त झाले आहेत. नुकसान भरपाईसाठी १६ जुलैला शेतकऱ्यांनी मोर्चा काढण्याचा इशारा दिला आहे. या पार्श्वभूमीवर संत्रा उत्पादक शेतकऱ्यांनी ११ जुलै रोजी तहसीलदार आणि तालुका कृषी अधिकारी यांना निवेदन सादर करून नुकसान भरपाईची मागणी केली. शेतकऱ्यांनी यापूर्वीही २९ मे रोजी तहसील कार्यालयात याच विषयावर शेतकऱ्यांनी निवेदन दिले होते. परंतु अद्याप कोणतीही ठोस कारवाई झाली नसल्याने आंदोलन करण्याचा पवित्रा घेतला आहे. शेतकऱ्यांनी संत्रा पिकासाठी पीक विमा घेतलेला असून, संबंधित विमा कंपनीकडून तत्काळ सर्वेक्षण करून नुकसानग्रस्तांना हेक्टरी ३ लाख रुपये आर्थिक मदत द्यावी, अशी मागणी करण्यात आली आहे. अन्यथा १६ जुलै रोजी तालुका कृषी अधिकारी कार्यालयावर मोर्चा काढण्यात येईल, असा इशारा निवेदनात देण्यात आला आहे.

## तेरे जैसा यार कहाँ ! : मृत पोलिस कर्मचाऱ्याचा उभारला पुतळा

**दै. अजिंक्य भारत । प्रतिनिधी**

**मानोरा, दि. १३ :** तालुक्यातील कारपा निवासी अनिल राठोड हा लाखंदूर येथील पोलीस स्टेशनमध्ये पोलीस हवालदार पदावर कार्यरत होता. रात्रपाळी आटोपून घरी परतताना त्याचा अपघाती मृत्यू झाला होता. आपल्या मित्राच्या स्मृती जपण्यासाठी त्यांच्या मित्रांनी एकत्र येऊन लोकवर्गणी गोळा केली. त्यामधून मृत राठोड यांचा पुतळा उभारल्याने मैत्रीच्या या नात्यातील संवेदनशीता सर्वांनी अनुभवली.

लाखंदूर येथील पोलीस स्टेशनमध्ये स्व अनिल.राठोड हे पोलीस हवालदार पदावर कार्यरत होते. गतवर्षी दि ७ जुलै ला आपली ड्युटी करून घरी जात असताना त्यांची गाडी रस्त्यावर साचलेल्या चिखलातून घसरून त्यांचा दुर्दैवी मृत्यू झाला होता. सामाजिक कार्यामध्ये आवड असलेल्या अनिल राठोड ची दुर्दैवी बातमी ऐकताच संपूर्ण गावावर व त्याच्या मित्र परिवारावर शोककळा पसरली होती.



प्रत्येकाला अडचणीमध्ये मदतीला धावून जाणारा अनिल राठोड असा एकाकी गेला. तो जेव्हा घरी यायचा त्यावेळी आपल्या गावातील मुलांविषयी त्यांच्या करिअर विषयी त्याच्या मनात काहीतरी चांगलं करत राहावे ही धडपड असायची.

सतत काहीतरी उपक्रम करत राहायचा, त्याच्याच संकल्पनेतून कारपा गावात त्याने सामान्य ज्ञान परीक्षा घ्यायचा. यामधून गरीब असलेल्या शिवा डीगांबर जाधव ची निवड करून त्याला दोन वर्ष अमरावतीला पाठवून व गावातीलच काही मित्रांच्या मदतीने दर महिन्याला पैसे जमा करून त्याला पुरवायचा. आज तोच मुलगा शिवा डीगांबर जाधव त्याच्या मदतीने अमरावती येथेच पोलीस हवालदार म्हणून सेवेत रुजू झाला आहे.

अनेक शैक्षणिक व सामाजिक उपक्रम राबवून त्याने एक आदर्श निर्माण केला. अशा अनिलचा दुर्दैव मृत्यू झाल्याने त्याच्या आठवणी स्मरणात राहाव्यात . म्हणून कारपा येथे त्याचे मित्र व कारपा गावातील काही लोकांच्या मदतीने त्याच्या पुतळ्याचे अनावरण नुकतेच करण्यात आले. त्यामध्ये त्याच्या सर्वच मित्रांनी पुढाकार घेऊन व काही गावकऱ्यांच्या मदतीने तो पुतळा त्याच्या शेतात उभारला. त्यावेळी त्याचा अगदी आठ वर्षाचा मुलगा त्याची मोठे बंधू निकम राठोड व त्यांच्या परिवारातील सर्वच सदस्य यावेळी हजर होते. पोहरागडचे संजय महाराज, माजी जि प सदस्य सचिन पाटील रोकडे,दिलीप चव्हाण, मनोहर राठोड, धनराज चव्हाण , हरी नायक, साहेबराव चव्हाण,मोतीसिंग राठोड, राजू महाराज, गंगाराम महाराज, सुभाष तारासिंग राठोड व मित्रपरिवार मोठ्या संख्येने हजर होते.

त्याच्या सोबत नोकरी करणारे भंडारा येथील पोलीस कर्मचारी मित्र शेषराव राठोड,अमोल मस्के ,सूरज शिंदे ,पृथ्वीराज राठोड, मनीष चव्हाण हजर होते. यावेळी त्याच्या भंडारा येथील पोलीस सहकाऱ्यांनी कारपा गावातील जिल्हा परिषद शाळेमध्ये त्याच्या स्मृतिदिनानिमित्त विद्यार्थ्यांना शालेय साहित्य वाटप करून एक चांगला संदेश दिला. कार्यक्रम अतिशय धीरगंभीर वातावरणात संपन्न झाला. यावेळी गावातील जिवलग मित्र व गावकरी मोठ्या संख्येने हजर होते.

## उद्या होणार २०१ जोडप्यांचा सामूहिक विवाह सोहळा

**दै. अजिंक्य भारत । प्रतिनिधी**

**कारंजा (लाड), दि. १३ :** तालुक्यातील पोहा येथे दिनांक १५ जुलै रोजी स्व. नरसिंग नाईक बहुउद्देशीय शिक्षण प्रसारक मंडळ वाघोळा, समाज कल्याण विभाग इतर मागास प्रवर्ग विभाग व एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प अकोला यांच्या संयुक्त विद्यमाने दुर्गादेवी संस्थान पोहा येथे भव्य सामूहिक विवाह सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. या सोहळ्यात तब्बल २०१ जोडप्यांचे विवाह संपन्न होणार आहेत.

कार्यक्रमाचे अध्यक्ष राजू पाटील राजे , मुख्य उद्घाटक आ. बाबूसिंग महाराज यांच्यासह आमदार सईताई डहाके, आ. श्यामभाऊ खोडे, आ. हरिशभाऊ



पिंपळे हे उपस्थित राहणार आहेत.

विशेष अतिथी म्हणून अमोल पाटणकर, कैलास देवरे, कुनाल झालटे, दिनेश शुक्ला, प्रवीण खंडारे, हेमेंद्र ठाकरे, पुरूषोत्तम चितलांगे, सुनील महाराज, कबीरदास महाराज, भक्तराज महाराज, दिलीप जाधव, सुरेश मापारी, जयकिशन भाऊ राठोड, दतराज डहाके, देवेंद्र ताथोड, विजय काळे, अशोक परलीकर, दिनेश राठोड, अशोक डोंगरदिवे, ज्योति गणेशपुरे, प्राजक्ता महितकर, वर्षा चव्हाण, आदींची उपस्थिती राहणार आहे.

अजिंक्य भारत

# आपला जिल्हा

अकोला । सोमवार, दि. १४ जुलै २०२५



## थोडक्यात

### गुरुपौर्णिमेनिमित्त श्री शुकदास महाराज यांना अभिवादन



**मुर्तिजापूर :** गुरुपौर्णिमेच्या पावन पर्वानिमित्त हिवरा आश्रम येथील विश्वस्त प्रशांत हजारी यांनी विवेकानंद आश्रमात जाऊन आपले सद्गुरू कर्मयोगी संत स्वामी शुकदास जी महाराज यांच्या समाधीचे दर्शन व पूजन करून अभिवादन केले. गुरुदेवांच्या समाधीस्थळी नतमस्तक होत, त्यांनी भक्तिभावाने पूजन करून गुरुपौर्णिमा साजरी केली. या दिवशी विवेकानंद आश्रमातील सकारात्मक आध्यात्मिक वातावरणात गुरुदर्शनानंतर त्यांच्या अंतर्मनात एक नवचैतन्य आणि ऊर्जा निर्माण झाल्याचे त्यांनी सांगितले.प्रशांत हजारी हे सन १९९७ पासून दरवर्षी गुरुपौर्णिमा निमित्त विवेकानंद आश्रमात जात आहेत. गुरुदेवांच्या कृपेने आजवर जीवनात त्यांना भौतिक व आध्यात्मिक दोन्ही प्रगतीचा मार्ग गवसला आहे, ''पूज्य गुरुदेव स्वामी शुकदास माऊली यांच्या कृपेने जीवनात दिशा, शांती आणि समृद्धी प्राप्त करून. त्यांच्या आशीर्वादानेच आज प्रशांत हजारी यशस्वी उद्योजक होऊन अनेक शेतकऱ्यांना व बेरोजगार युवकांना रोजगाराची संधी सुद्धा उपलब्ध करून दिलेली आहे श्री शुकदास महाराज त्यांच्या विचाराने प्रेरित होऊन अनेक कामे जीवनात प्रशांत हजारी करत आहे.

### आकोलखेड येथे भगवान बुद्ध व डॉ.बाबासाहेब आंबेडकर मुर्तींची प्रतिष्ठापना



**आकोलखेड :** येथे आषाढ पौर्णिमा वर्षावास प्रारंभ निमित्त तथागत भगवान गौतम बुद्ध व विश्वरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या मुर्तींची प्रतिष्ठापना ता.१० रोजीपौ करण्यात आली.सुरुवातीला भगवान गौतम बुद्ध यांच्या मुर्ती पासून ते डॉ.बाबासाहेब यांच्या पुतळ्या पर्यंत भिमकन्या लेझीम नृत्य मंडळ पिंपळोद यांच्या नृत्यावर मिरवणूक काढण्यात आली.व लाटी काटी अग्निगोळा असे प्रदर्शक या मिरणुकीमध्ये दाखवलेली. रमाई महिला मंडळ आकोलखेड ला सुनिल सरदार यांच्या कडून भगवान गौतम बुद्ध व विश्वरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांची मुर्ती भेट देण्यात आली.प्रमुख पाहुणे राजेश देवराव सरदार, तेजस्वीनी सरदार,नंदकिशोर गवते कार्यक्रमाच्या यशस्वी साठी यांनी परिश्रम घेतले सदानंद सिरसाट,विश्वास पंढरी सिरसाट,विश्वास सिरसाट,अशोक सिरसाट,अनिल सिरसाट, राजेश सिरसाट,मुकेश सिरसाट,प्रकाश गोपनारायन,देवानंद सिरसाट,बाबुराव सिरसाट, निलेश सिरसाट, राम खंडारे, सचिन सुपासे,प्रविण तायडे सम्यक सिरसाट,वैभव सिरसाट अक्षय सिरसाट,शुभम खिराडे,सुनील सोनोने,प्रविण सिरसाट,बाजीराव सिरसाट,रुपेश तायडे,बबन सिरसाट, अनुज सिरसाट सुजित सिरसाट वामनराव तोतडे,निरंजन सिरसाट ललित नगराळे,ऋषी वावरे,सुधीर खैरे, आदींचा सहभाग होता.

### पिक विमासाठी अर्ज करण्याची अंतिम दिनांक ३१ जुलै

**बोरगाव मंजू :** खरीप हंगाम २०२५ साठी अकोला जिल्ह्यात भारतीय कृषी विमा कंपनी कार्यरत असून खरीप हंगाम २०२५ साठी १ जुलै पासून अर्ज करने सुरू झाले असून अर्ज करण्याची अंतिम. दिनांक ३१ जुलै आहे.अंतिम दिनांकांची वाट न पाहता सर्व शेतकरी बांधवांनी आपण पेरणी केलेल्या अधिसूचित पिकाचा विमा काढून घ्यावा असे आवाहन भारतीय कृषी विमा कंपनी अकोला जिल्हा व्यवस्थापक सुजय निपाणे व तालुका व्यवस्थापक जयश्वर बोबडे यांच्यातर्फे करण्यात येत आहे. जिल्हासाठी सोयाबीन,तूर ,कपाशी , मूंग उडीद ,ज्वारी असे ६ पिके अधिसूचित आहेत पिक पेरणी पासून काढणी पर्यंतच्या कालावधीत विविध नैसर्गिक घटक ,कीड व रोगांचा प्रादुर्भाव इत्यादी कारणामुळे पिक कापणी प्रयोगाद्वारे येणारे सरासरी उत्पादन हे त्या महसूल मंडळासाठीच्या उंबरठा उत्पादनापेक्षा कमी असल्यास त्या महसूल मंडळामधील त्या पिकाचा विमा घेतलेल्या सर्व शेतकऱ्यांना समप्रमाणात नुकसान भरपाई मिळणार आहे.विमा योजनेत सहभागी होण्यासाठी शेतकऱ्यांनी आपला अँग्री स्टॅक नोंदणी क्रमांक सातबारा उतारा ,बँक पासबुक,आधार कार्ड आणि पेरणीचे स्वयंघोषणापत्र घेऊन कॉमन सर्विस सेंटर बँकच्या सहाय्याने सहभाग घेऊ शकता किंवा स्वतः शेतकरी www. pmfby.gov.in पोर्टलच्या सहाय्य घेऊ शकता योजनेच्या अधिक माहितीसाठी केंद्र शासनाचे कृषी रक्षक पोर्टल १४४४७ माहिती घेऊ शकता किंवा संबंधित पिक विमा प्रतिनिधी किंवा स्थानिक कृषी कार्यालयाशी संपर्क करू शकता असे आवाहन भारतीय कृषी विमा कंपनी अकोला जिल्हा व्यवस्थापक सुजय निपाणे व तालुका व्यवस्थापक जयश्वर बोबडे यांनी केले आहे.

# हिंगणा निंबा गावाकडे जाणाऱ्या रस्त्याला आले तलावाचे स्वरूप

दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी



**जानोरी मेळ , दि. १३ :** निंबा अंदुरा सर्कलमधील हिंगणा निंबा अतिशय गजबजलेल्या गावाजवळ असलेल्या हिंगणा निंबा गावाकडे जाणाऱ्या रस्त्याला तलावाचे स्वरूप आले आहे. हा रस्ता गायब झाला आहे. रस्त्यामध्ये पूर्णपणे तलावाचे स्वरूप प्राप्त झाले आहे या रस्त्यावर पावसाचे एवढे पाणी साचले आहे की कोठून मार्ग काढावा? व आपल्या गावाकडे जावे! हा प्रश्न नागरिकांना व विद्यार्थ्यांना पडलेला आहे

एक किलोमीटर अंतरावर श्री शिवाजी विद्यालय निंबा व कनिष्ठ विद्यालय निंबा आहे तेथे विद्यार्थी दररोज येणे जाणे करतात व पाचवीपासून ते एम ए पर्यंत विद्यार्थ्यांना येणे जाणे करावे लागते हा त्रास कधी दूर होईल? व आपणाला कधी चांगला रस्ता होईल? हे अजूनही गुलदस्त्यातच आहे. तसेच माजी सरपंच सुखलाल तायडे माजी सरपंच मुकेश तायडे यांनी आमदार नितीन देशमुख यांच्या उपस्थितीमध्ये पावसाळी अधिवेशनामध्ये जाऊन रस्त्याबाबत निवेदन दिले आहे.

> मी स्वतः पावसाळी अधिवेशनामध्ये आमदार नितीन देशमुख यांच्याकडे निवेदन सादर केले आहे लवकरच यावर तोडगा निघेल अशी अपेक्षा आहे व रस्ता करून मिळेल असे आश्वासन मिळाले.
>
> **- सुकलाल तायडे,** माजी सरपंच हिंगणा (निंबा)

तसेच तंटामुक्ती अध्यक्ष राजेश तायडे, वृक्षप्रेमी शुद्धोधन तायडे यांनी श्रमदान करून त्या रस्त्यातील पाणी जाण्यासाठी विसर्ग तयार केला. या रस्त्याने खूप मोठी कसरत करावी लागते जर रस्ता दुरुस्त नाही झाला तर गावकरी आंदोलनाच्या पवित्रामध्ये आहेत असे जितेंद्र तायडे हिंगणा यांनी सांगितले.

# श्री शिवाजी शिक्षण संस्थेच्या उपाध्यक्षाना अश्लील शिवीगाळ





दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी

**अकोट, दि. १३ :** शहरातील दर्यापूर मार्गावर असलेल्या श्रद्धासागर येथे १२ जुलै रोजी दुपारी १२ वा.स्व.बी. टी.धांडे यांच्या स्मृतिदिन कार्यक्रमात शिवाजी शिक्षण संस्थेचे उपाध्यक्ष एड. गजानन केशवराव फुंडकर व इतर प्रमुख पाहुणे आमंत्रित होते. हा कार्यक्रम सुरु असताना दर्यापूर तालुक्यातील भामोद येथील शिवाजी शिक्षण संस्थेच्या हायस्कूलचे शारीरिक शिक्षक अजय पंजाबराव हिंगणकर यांनी बदलीच्या कारणावरून संस्थेचे उपाध्यक्ष गजानन पुंडकर यांना अश्लील शिवीगाळ केली. या सर्व प्रकारामुळे उपाध्यक्ष गजानन पुंडकर यांना चांगलाच मनस्ताप झाला व त्यांनी झालेल्या प्रकाराबद्दल १२ जुलै रोजी दुपारी अकोट शहर पोलीस स्टेशनला कालवाडी येथील रहिवाशी शिक्षक अजय पंजाबराव हिंगणकर विरुद्ध अश्लील शिवीगाळ केल्याची तक्रार दाखल केली आहे.

अकोट शहर पोलिसांनी अजय पंजाबराव हिंगणकर विरुद्ध गुन्हा नोंदविला आहे. पुढील तपास अकोट शहर पोलीस करीत आहेत.

# पातुर येथील मुजावरपुरा परिसरातून गाय चोरी

दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी

**पातुर, दि. १३ :** पातुर पोलीस स्टेशन अंतर्गत येत असलेल्या मुजावर पुरा येथील कास्तकार तथा पशुपालक समीर इक्बाल शेख खैराती हे दिनांक ८/ ७/ २०२५ रोजी सकाळी चार वाजताच्या सुमारास चारापाणी करण्यासाठी आणि गाईचे दूध काढण्यासाठी गेले असता गाय दिसून आली नाही त्यांनी चार-पाच दिवस गाईचा शोध घेतला मात्र मिळून आली नाही म्हणून दिनांक १३/७/२०२५ ला पातुर पोलिसात तक्रार दिली ज्यामध्ये दोन ते तीन संशयित मास विक्रेते यांच्यावर संशय दर्शविला आहे कारण दहा ते पंधरा वर्षापासून सदरचे संशयित मास विक्री करीत आहेत सदर गाईच्या चोरीमुळे आपल्यावर मोठा आर्थिक भार पडला असून सदरची बाब गंभीर असून सदर प्रकरणी कायदेशीर कारवाईची मागणी केली आहे.

> सदर गाय चोरी प्रकरणी तक्रार प्राप्त झाली असून त्यामध्ये तक्रार तपासात ठेवण्याचे निर्देश वरिष्ठांनी दिले आहेत सखोल चौकशी आणि तपासानंतर कायदेशीर कारवाई करण्यात येईल
>
> **- पी.एस.आय मेश्राम** पोलीस स्टेशन पातुर

# नैसर्गिक आपत्तीसाठी शासना कडून आर्थिक मदत



दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी

**अकोट, दि. १३ :** तालुक्यातील ग्राम बोर्डी येथील शेतकरी लक्ष्मण शालिग्राम गुरेकार यांच्या मौजे कासोद शिवपूर येथील शेतात अचानक झालेल्या वादळी वाऱ्यासह,अवकाळी पावसाने वीज पडून शेतात निंबाच्या झाडाला बांधलेल्या दोन बैलाचा जागेवरच मृत्यू झाला होता. या नैसर्गिक आपत्तीमध्ये शासना कडून बैल मालकांना ६४ हजार रुपयांची आर्थिक मदत म्हणून त्यांना अकोटचे आ.प्रकाश भारसाकळे यांच्याहस्ते धनादेश सुपूर्द करण्यात आला आहे.यावेळी आ.प्रकाश भारसाकळे,अकोटचे तहसीलदार सुनील चव्हाण,बोर्डी शिवपूरचे तलाठी राजाभाऊ खामकर, पुरुषोत्तम चौखंडे, गोपाल मोहोड, यांची उपस्थिती होती.

> शेतातील निंबाच्या झाडाला बांधलेल्या दोन बैलांचा वीज पडून मृत्यू झाला होता.त्याची आर्थिक मदत म्हणून ६४ हजार रुपयांचा धनादेश मिळाला.
>
> **- लक्ष्मण गुरेकार** शेतकरी बोर्डी.

> मौजे कासोद शिवपूर येथील शेतशिवारात वीज पडून दोन बैलांचा मृत्यू झाला होता.त्याचा पंचनामा करून अहवाल तहसीलदार यांचेकडे सादर करण्यात आला होता. त्याची आर्थिक मदत म्हणून आज धनादेश वितरीत करण्यात आला.
>
> **राजाभाऊ खामकर** तलाठी शिवपूर

# केंद्र शासनाच्या दिशा समितीवर राजेश नागमते यांची निवड

**अकोट :** भाजपाचे व विविध संस्थेचे प्रतिनिधी



राजेश नागमते यांची केंद्र सरकारच्या दिशा समितीवर अशासकीय सदस्य म्हणून जिल्हाधिकारी अकोला यांनी एका पत्रकाद्वारे नियुक्ती केली आहे. जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा अकोला (दिशा समिती)च्या माध्यमातून केंद्र शासनाच्या योजना तळागाळातील लोकांपर्यंत पोहचणे व लाभार्थ्यांना योजनेचा लाभ मिळवून देणे यासाठी ही समिती कार्यरत राहील.या समितीचे अध्यक्ष खा. अनुप धोत्रे हे असून त्यांच्या अभ्यासू नेतृत्वात ही समिती कार्य करणार आहे.राजेश नागमते यांच्यासह विजयसिंग सोळुंके,श्रीकृष्ण चव्हाण, सिंधू मालोकर यांची सुध्दा दिशा समितीवर समितीवर निवड करण्यात आली आहे.या सर्वांनी आपल्या निवडीचे श्रेय खा.अनुप धोत्रे,भाजपा प्रदेश सरचिटणीस आ.रणधीर सावरकर यांच्यासह राज्य व राष्ट्रीय नेतृत्व यांना देतात.

# बौद्ध धम्मातील वर्षावास आरंभ

दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी

**अकोट, दि. १३ :** आषाढी पौर्णिमेपासून बौद्ध धम्मातील वर्षावास आरंभ होत आहेत. प्रत्येक ठिकाणी बौद्ध आणि त्याचा धम्म,या ग्रंथाचे पठण केल्या जाते. बौद्ध धम्मातील उपासिका महिलांना तीन महिन्याचे उपवास ठेवून बौद्ध विहारांमध्ये धम्मग्रंथाचे पठण केल्या जाते. मोठ्या हर्षवल्लासामध्ये नियमितपणे दररोज ठरलेल्या वेळेनुसार महिला एकत्रित होऊन बौद्ध धम्माची शिकवण धम्मग्रंथाच्या माध्यमातून घेतल्या जाते. आषाढी पौर्णिमा'', ज्याला गुरुपौर्णिमा देखील म्हणतात, बौद्ध धम्मात वर्षावासाच्या (पावसाळ्यातील तीन महिन्यांचा काळ) सुरुवात म्हणून साजरी केली जाते. याच दिवशी तथागत भगवान गौतम बुद्धांनी आपल्या पहिल्या पाच शिष्यांना सारनाथ येथे प्रवचन दिले होते. आषाढी पौर्णिमा आणि वर्षावास:

वर्षावास:पावसाळ्यातील तीन महिन्यांसाठी (आषाढ, श्रावण आणि भाद्रपद) भिक्खूंनी (बौद्ध भिक्षूंनी) एकाच ठिकाणी वास्तव्य करून ध्यान, चिंतन आणि धम्म शिकवण्यावर लक्ष केंद्रित करणे, याला वर्षावास म्हणतात. आषाढी पौर्णिमा:या दिवशी वर्षावासाला सुरुवात होते. या दिवशी भिक्खूंना त्यांच्या गुरुजनांचा (ज्येष्ठ भिक्खू) आदर करण्याचा आणि धम्म शिकवण्याचा नियम आहे. धम्मचक्र प्रवर्तन भगवान बुद्धांनी याच दिवशी सारनाथ येथे आपल्या पहिल्या पाच शिष्यांना प्रवचन देऊन धम्मचक्र प्रवर्तित केले, ज्यामुळे बौद्ध धर्माचा पाया घातला. गुरुपौर्णिमा:बुद्धांच्या या कार्यामुळे आषाढी पौर्णिमा गुरुपौर्णिमा म्हणूनही साजरी केली जाते. या दिवशी गुरुजनांचा (शिक्षक, मार्गदर्शक) आदर करणे, त्यांचे आशीर्वाद घेणे शुभ मानले जाते.

**या दिवसाचे महत्व:**

बौद्ध धर्मात आषाढी पौर्णिमेला विशेष महत्व आहे, कारण या दिवशी अनेक महत्वाच्या घटना घडल्या, ज्या बौद्ध धम्मासाठी मार्गदर्शक ठरल्या. वर्षावासाच्या काळात भिक्खूंना एकाच ठिकाणी राहून धम्माचा अभ्यास करण्याची संधी मिळते आणि त्यातून समाजाला धम्म शिकवण देण्याचा प्रयत्न केला जातो, या दिवसाच्या निमित्ताने, गुरुजनांचा आदर करणे, त्यांचे आशीर्वाद घेणे आणि धम्म मार्गावर चालण्याचा संकल्प करणे महत्वाचे मानले जाते.

# विद्यांचल द स्कूलमध्ये नवनियुक्त विद्यार्थी परिषदेचा पदग्रहण समारंभ संपन्न




दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी

**अकोट, दि. १३ :** विद्याचरण द स्कूलमध्ये नवनियुक्त विद्यार्थी परिषदेचा पदग्रहण समारंभ यशस्वीरित्या पार पडला.दरवर्षी सीबीएसई च्या सूचनेनुसार,शाळेतील विद्यार्थ्यांना निवडणुकांचे महत्त्व पटवून देण्यासाठी आणि त्यांच्यात नेतृत्वगुण विकसित करण्यासाठी दरवर्षी नवीन विद्यार्थी परिषदेची स्थापना केली जाते. यावर्षी देखील विद्यार्थी परिषदेच्या स्थापनेसाठी पदग्रहण समारंभ सलग ११ व्या वर्षी मोठ्या थाटामाटात पार पडला.शाळेच्या चारही सभागृहांच्या म्हणजेच चॅलेंजर्स,रिफॉर्मर्स, सेव्हिअर्स आणि वॉरिअर्स या हाऊस च्या विद्यार्थ्यांनी निवडणुकीत भाग घेतला.सत्र २०२५-२६ साठी विद्यार्थी परिषदेसाठी निवडणूक घेण्यात आली. यावर्षी देखील विद्यार्थ्यांनी इलेक्ट्रॉनिक पद्धतीने मतदान केले.ज्यामुळे नियुक्त विद्यार्थ्यांची निवड अतिशय पारदर्शक झाली.या निवडणुकीत ज्युनियर हेड बॉय प्रत्युष घाटोळ,ज्युनियर हेड गर्ल अन्विका थोरात आणि हेड बॉय दिव्यांश अग्रवाल आणि स्वरा भुयार आणि आरुषी धर्माळे यांची हेड गर्लसाठी निवड झाली.तसेच विविध क्लबचे हाऊस कॅप्टन,व्हाइस कॅप्टन आणि कॅप्टन यांची निवड करण्यात आली.या समारंभात निवड झालेल्या विद्यार्थ्यांना त्यांच्या पदाचे आणि कामाचे महत्त्व सांगण्यात आले आणि विद्यार्थ्यांचा शपथविधी समारंभ आयोजित करण्यात आला.यावेळी मीनाक्षी लक्ष्मण काटोले (पी. एस.आय.अकोट)संस्थेचे अध्यक्ष नरेश भुतडा यांच्यासह संचालक दिनेश भुतडा,सचिव श्रीमती सारिका भुतडा,सदस्य राजेश भुतडा प्रशासकीय अधीक्षक प्रशांत विनायक प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते.कार्यक्रमाची सुरुवात दीपप्रज्वलन आणि मूर्तीपूजनाने झाली.शाळेत कार्यक्रम आणि पाहुण्यांचा स्वागत समारंभ आयोजित करण्यात आला होता.नृत्य शिक्षक विनायक दाते,आशिष पंडागळे,रोहित नलोडे,प्रियदर्शिनी दास यांच्या मार्गदर्शनाखाली माध्यमिक विभागातील विद्यार्थ्यांनी नृत्य रचना सादर करून सर्वांना मंत्रमुग्ध केले.याप्रसंगी प्राचार्या डॉ.शैलजा त्रिवेदी यांनी नवनियुक्त सदस्य विद्यार्थ्यांना तत्परता आणि प्रामाणिकपणाची शपथ दिली.प्रमुख पाहुण्या मीनाक्षी काटोले यांनी आपल्या भाषणात असा विश्वास व्यक्त केला की शाळेने दिलेल्या मूल्यांद्वारे ही पिढी निश्चितच नाव कमवेल.त्यांनी शाळेच्या शिस्त आणि नियोजनाचे कौतुकही केले.कार्यक्रमाचे संचालन विनय शर्मा आणि श्रीमती मेघा जगताप यांनी केले. आभार प्रदर्शन अविन जयस्वाल यांनी केले.संचालक दिनेश भुतडा,सचिव श्रीमती सारिका भुतडा,प्रशासकीय अधीक्षक प्रशांत विनायक यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यक्रमाचे नियोजन आणि यशस्वी अंमलबजावणी श्रीमती नेहा अग्रवाल,श्रीमती मेघा जगताप,अविन जयस्वाल,विनय शर्मा,यांनी केली.कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी शाळेतील सर्व शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी कठोर परिश्रम घेतले.

# सोशल मीडियावर संत रामपाल महाराजांच्या विरुद्ध अपमानास्पद टिप्पणी

## बार्शिटाकळी येथील अनुयायांनी केली कारवाईची मागणी

दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी



**बार्शिटाकळी, दि. १३ :** सोशल मीडियावर हिमांशू जोशी याने संत रामपाल आणि त्यांच्या अनुयायांविरुद्ध दिशाभूल करणारे, आक्षेपार्ह आणि उत्तेजक साहित्य पसरवत आहेत. त्यामुळे धार्मिक भावना दुखावल्या आणि समाजात तणाव पसरवल्याबद्दल त्यांचेवर योग्य कारवाईची मागणी केली आहे. येथील संत रामपाल महाराजांच्या अनुयायांनी काल शनिवार १२ जुलै रोजी मोठ्या संख्येने स्थानिक पोलिस ठाण्यात पोहोचून पोलीस निरीक्षक प्रवीण धुमाळ यांना निवेदन सादर केले आणि हिमांशू जोशी नावाच्या व्यक्तीविरुद्ध तक्रार दाखल केली.

हिमांशू जोशी याने फेसबुक आणि यूट्यूबवर लाईव्ह येऊन संत रामपाल महाराजांना लक्ष्य करत त्यांच्या अनुयायांवर आक्षेपार्ह टिप्पणी देखील करत आहेत. अनुयायांच्या मते, जोशी धार्मिक ग्रंथ जाळण्याबद्दल आणि संत रामपाल यांच्या अनुयायांवर हल्ला करण्यास लोकांना प्रवृत्त करण्याबद्दल बोलतात. अनुयायांनी असाही आरोप केला की जोशी संघटनेवर उत्तराखंडमधून मुलींचे अपहरण करून त्यांना हरियाणाला घेऊन जाण्यासारखे गंभीर आरोप करत आहेत. तो आश्रम उद्ध्वस्त करण्याची धमकी देतो आणि शिष्यांना अपशब्दांनी बोलतो. या आरोपांना निराधार आणि संघटनेची प्रतिमा मलिन करणारे म्हणत, अनुयायांनी ठाणेदार प्रवीण धुमाळ यांच्याकडे कारवाई ची मागणी केली आहे.हिमांशू जोशी याने धार्मिक भावना दुखावल्याबद्दल, प्रक्षोभक प्रचार केल्याबद्दल आणि सामाजिक सौहार्द बिघडवल्याबद्दल कठोर कायदेशीर कारवाई करावी. यावेळी रामदास फाटे, श्रावण भातखडे, संतोष बोबडे, शंकर देवळे, गंगाधर बोबडे, अंकुश लोकरे, भगवान बोबडे, साईनाथ मैसमारे, कांताबाई देवळे, बबन शिंदे आदींची उपस्थिती होती.

अजिंक्य भारत

आपलं बुलडाणा



बुलढाणा,सोमवार १४ जुलै २०२५ www.ajinkyabharat.com

## थोडक्यात

### डोणगाव ग्रा.प. च्या बांध-कामाची चौकशी करणार

**खामगाव** - डोणगाव येथील ग्रामपंचायत अधिकारी दिपक तांबारे यांचे निलंबन करण्यात आले आहे आणी आता डोणगाव येथील १५ व्या वित्त आयोगातून झालेल्या बांधकामाची चौकशी करण्याची मागणी डोणगाव येथील माजी ग्रामपंचायत सदस्य शेख आयुब शेख गुलाब यांनी दि. १५ मे व २६ जून ला जिल्हा परीषद बांधकाम विभागाला केली होती त्यानुसार जिल्हा परिषदचे कार्यकारी अभियंता यांनी दि. २६ जून ला उपविभागीय अधिकारी जिल्हा परिषद बांधकाम उपविभाग जळगाव जामोद यांना पत्र देऊन त्वरित ग्रामपंचायत डोणगाव येथील झालेल्या बांधकामाची पाहणी करुन स्थळ पंचनामा करून चौकशी करून अहवाल पाठवण्याचे आदेश दिले आहेत.

### प्रा.दिलीप झोटे यांचा कार्यकर्त्यांसह राष्ट्रवादीत प्रवेश

**खामगाव** : बुलडाणा जिल्हा सामाजिक न्याय विभागाचे जिल्हाध्यक्ष प्रा.दिलीपकुमार झोटे यांनी त्यांच्या कार्यकर्त्यांसह राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटात बुधवारी प्रवेश केला. प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे, पालकमंत्री मकरंद पाटील जिल्हाध्यक्ष ॲड. नाझेर काझी आ.मनोज कायंदे यांच्या उपस्थितीत मुंबईत थेट उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या हस्ते पक्षप्रवेशाचा कार्यक्रम पार पडला.

प्रा.दिलीपकुमार झोटे यांचे समवेत प्रकाश काकडे, बबनराव कासारे, अनिल साळवे, सुरेश मगर, पंढरी म्हस्के यांच्यासह शेकडो कार्यकर्त्यांनी एकत्र पक्षात प्रवेश करत तालुक्याच्या राजकारणात नवा अध्याय सुरू केला.मान्यवर प्रमुख नेत्यांनी प्रा.झोटे व कार्यकर्त्यांचे पक्षात स्वागत केले. पक्ष प्रवेशानंतर प्रा.दिलीपकुमार झोटे यांनी मी पक्षनेते अजितदादांच्या नेतृत्वावर नितांत श्रद्धा ठेवून राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये प्रवेश करत आहे. देऊळगाव राजा तालुक्यांत पक्ष बळकट करण्यासाठी सर्वस्व पणाला लावणार असल्याचे सांगितले.

### शेतकऱ्याची दुचाकी लंपास

**बीबी** : पोलीस स्टेशन अंतर्गत पिंपरी खंदारे येथून एका शेतकऱ्याची दुचाकी चोरीला गेल्याची घटना ८ जुलै रोजी घडली. या प्रकरणी अज्ञात आरोपीविरूध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. आदिल जमीर शेख हे शेतीचे कामे करण्यासाठी शेतात गेले मात्र पाऊस चिखल असल्यामुळे शेतापर्यंत दुचाकी जात नसल्याने शेताला लागूनच बीबी सुलतानपूर हायवेवर शेताच्या बांधावर साईडला हिरो कंपनीची एच एफ डिलक्स क्रमांक एम एच २० ७६६० किंमत अंदाजे ४५ हजार रुपये किमतीची दुचाकी एका बाजूला उभी ठेवली होती.

### कृषी उत्पन्न बाजार समिती, खामगाव बाजार भाव

| वान | भाव |
| --- | --- |
| ज्वारी | १६०० – २४५० |
| गहू | २४०० – २४७५ |
| तुर | ५६५० – ६६५० |
| हरभरा | ३७०० – ५६७५ |
| सोयाबीन | ३८२५ – ४४०० |
| भुईमुग | ३७०० – ५८०० |
| धने | ४८०० – ५४०० |
| उडीद | ३००० – ५५०० |
| मूंग | ५७०० – ६००० |
| मलाई चना | ५२००–५२०० |

# मनरेगा योजनेतील तक्रारींचा केल्या जाणार निपटारा!

## केंद्रीयमंत्री प्रतापराव जाधव यांचा पुढाकार

अजिंक्य भारत/ प्रतिनिधी

**बुलडाणा दि. १३ :** केंद्र पुरस्कृत महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेतील लाभार्थींना येणाऱ्या समस्या व अडचणींचा निपटारा तात्काळ होऊन लाभार्थींपर्यंत या योजना सहज पोहचविण्याच्या दृष्टीकोनातुन केंद्रिय मंत्री प्रतापराव जाधव यांच्यावतीने तक्रार निवारण शिबीर घेण्यात येणार आहे. या योजनेसंदर्भात काही तक्रारी असल्यास त्याा लेखी स्वरुपात शिवसेना तालुका प्रमुखांकडे सादर कराव्यात. असे आवाहन केंद्रीयमंत्री प्रतापराव जाधव यांच्या जनसंपर्क कार्यालयातुन करण्यात आले आहे.

केंद्र सरकारच्यावतीने (मनरेगा ) महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेअंतर्गत येणारे विविध कामे प्रधानमंत्री आवास योजना, ( घरकुल ) सिंचन विहीर . गोठा बांधकाम योजने लाभ पोहोचवण्याचं लाभार्थींच्या काही तक्रारी असल्यास त्या तक्रारीचा तत्काळ निपटारा करुन योजनेचा लाभ लाभार्थ्या पर्यंत पोहोचविण्याच्या दृष्टीकोनातुन केंद्रीय मंत्री



प्रतापराव जाधव यांच्यावतीने जिल्हास्तरावर जिल्हाधिकारी व संबंधित विभागाच्या प्रमुखांच्या उपस्थितीत शिबीराचे आयोजन करण्यात येणार आहे. ज्या नागरीकांच्या या योजनेसंदर्भात काही तक्रारी असतील त्याा तक्रारी शिवसेनेच्या तालुका प्रमुखांकडे सविस्तर लेखी स्वरुपात स्वतःचे नाव व स्वतःचा मोबाईल नंबरसह सादर कराव्यात. तालुक्यातील तक्रारी या संबधित तालुक्याचे शिवसेना तालुका प्रमुख यांच्याकडे सादर कराव्यात. शिवसेना तालुका प्रमुखांचे दुरध्वनी क्रमांक याप्रमाणे बुलढाणा तालुका प्रमुख धनंजय बारोटे, मोताळा तालुका प्रमुख रामदास चौथनकर, चिखली गजानन मोरे,अनिल चित्ते,वैभव देशमुख ,भगवान सुलताने ,सुरेशतात्या वाळुकार, राजेंद्र बघे, रामेश्वर थारकर ,अजय पारस्कार ,केशवराव ढोकणे, सुनिल जुनारे,विजय साठे यांच्याकडे तसेच मेहकर येथील शिवसेना जनसंपर्क कार्यालय आणि बुलढाणा येथील केंद्रिय मंत्री प्रतापराव जाधव यांच्या जनसंपर्क कार्यालयात २० जुलै पर्यंत आपल्या तक्रारी सादर कराव्यात.

असे आवाहन केंद्रीय मंत्री तथा शिवसेना नेते प्रतापराव जाधव यांच्या जनसंपर्क कार्यालयाच्या वतीने करण्यात आले आहे.

## आर्किड नेचर फाउंडेशन जळगाव (खा.) ची गो ग्रीन फाउंडेशनच्या 'ओमकार वनास'भेट

अजिंक्य भारत/ प्रतिनिधी

**शेगाव दि.१३ :** पर्यावरण क्षेत्रात भरीव कामगिरी करणाऱ्या आर्किड नेचर फाउंडेशन जळगाव (खा.) च्या सतरा ते अठरा सदस्यांनी शेगाव शहराचे नैसर्गिक सौंदर्य जोपासणा-या गो ग्रीन फाउंडेशन शेगाव ने निर्मित '' ओमकार वनास ''प्रत्यक्ष भेट देऊन गो ग्रीन च्या कार्याचे कौतुक केले.

गो ग्रीन फाउंडेशन ने शेगाव शहरात वेगवेगळ्या ठिकाणी वृक्षारोपण करून ब्रम्हांडवन, न्यायवन,स्मृतीवन,आक्सिजन पार्क, रोटरी वन, स्वराज्यवन,ओमकार वनाची निर्मिती केलेली असून हजारो वृक्षाची लागवड व संगोपन केलेले आहे.

त्यामुळे आता गो ग्रीन फाउंडेशन ची ओळख नुसती शेगाव शहरापुरती मर्यादित न राहता संपूर्ण महाराष्ट्रभर पसरत आहे. त्याचाच एक भाग म्हणून जळगाव खान्देश येथे पर्यावरणाचे काम करणारी संस्था आर्किड नेचर सुध्दा गो ग्रीन च्या कार्याचा परिचय झाला त्यामुळे गो ग्रीन ने केलेल्या कार्याला प्रत्याक्ष भेट देण्याची त्यांची उत्कंठा आज पूर्ण झाली. गो ग्रीन फाउंडेशन शेगाव ने निर्माण केलेल्या वनापैकी ''ओमकार वनास'' आर्किड नेचरच्या सदस्यांनी प्रत्यक्ष भेट दिली. त्यावेळी गो ग्रीन फाउंडेशन चे अनेक सदस्य उपस्थित होते. ह्याप्रसंगि आर्किड नेचरच्या सदस्यांना गो ग्रीन फाउंडेशन चे सन्मान पत्र देऊन सन्मानित करण्यात आले. तसेच गो ग्रीन फाउंडेशनला सुध्दा आर्किड नेचरचे सन्मान पत्र देऊन सन्मानित करण्यात आले.

गो ग्रीन फाउंडेशन चे कार्य दिवसागणिक असेच विस्तारत जाउन वसुंधरेचे रक्षण करोत सदिच्छा आर्किड नेचरच्या सदस्यांनी व्यक्त केली.

## ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे यांना शिक्षक संघटनांच्या शिष्टमंडळाचे निवेदन

अजिंक्य भारत/ प्रतिनिधी

**साखरखेर्डा दि.१३ :** बुलढाणा जिल्ह्यातील केंद्रप्रमुख नियुक्ती मुळ सेवाज्येष्ठता शासन निर्णयानुसार व्हावी यामागणीसाठी पदविकाधारक शिक्षकांचे एक शिष्टमंडळ ग्राम विकास मंत्री ना. जयकुमार गोरे यांना भेटले असून आपल्या मागणीचे निवेदन सादर केले आहे.

बोराटवाडी ता. माण जिल्हा सातारा येथे दि. १३जुलै रोजी बुलढाणा जिल्हा परिषदमध्ये केंद्रप्रमुख पदोन्नती काही कारणांमुळे मागील अनेक दिवसांपासून रखडलेली आहे. त्याामुळे सेवाज्येष्ठ प्राथमिक शिक्षकांवर फार मोठा अन्याय झालेला आहे. त्यातील अनेक लोक सेवानिवृत्त झाले आहेत . यासंदर्भात आज दि. १३ जुलै रोजी बुलढाणा जिल्ह्यातील प्राथमिक शिक्षक संघटनांच्या शिष्टमंडळाने महाराष्ट्र राज्याचे ग्रामविकास मंत्री मा ना जयकुमार गोरे यांची बोराटवाडी येथे त्यांच्या निवासस्थानी भेट घेऊन आपल्या मागणीचे निवेदन देऊन याविषयी चर्चा केली. केंद्रप्रमुख पदोन्नती ही पदवीधर प्राथमिक शिक्षकांची मूळ सेवाज्येष्ठता म्हणजेच प्रथम नेमणूक दिनांकानुसार करण्यात यावी असे स्पष्ट निर्देश २७ सप्टेंबर २०२३ च्या शासन निर्णयांमध्ये असूनही त्यााकडे आतापर्यंत सहेतुक डोळेझाक करण्यात आलेली आहे. या शासन निर्णयाच्या आधारे आतापर्यंत बुलढाणा जिल्हा परिषदेने केंद्रप्रमुख पदोन्नती करणे अपेक्षित होते. परंतु या शासन निर्णयामधील शब्दांचे चुकीचे अर्थ काढल्यामुळे मागील एक वर्षापासून केंद्रप्रमुख पदोन्नती प्रक्रिया खोळंबलेली आहे . पदवीधर सहायक शिक्षक या पदावर सहा वर्षे अखंडित सेवा तसेच मूळ सेवाज्येष्ठता आणि गुणवत्ता हे मुद्दे विचारात घेऊन पदोन्नती करणे अपेक्षित होते. परंतु शिक्षण संचालक शरद गोसावी यांनी प्रस्तुत शासन निर्णयाच्या संदर्भात संभ्रम निर्माण करणारे परिपत्राक काढल्यामुळे संपूर्ण महाराष्ट्रात केंद्रप्रमुख पदोन्नती प्रक्रियेमध्ये अडथळा निर्माण झालेला आहे. ही बाब मा ना. जयकुमार गोरे यांच्या लक्षात आणुन देण्यात आली.

## सडोणगांव नगरीत प्रार्थना मंडळाची स्थापना



अजिंक्य भारत/ प्रतिनिधी

**डोणगाव दि.१३ :** मेहकर तालुक्यातील अध्यात्मिक केन्द्र म्हणून ओळख असलेल्या विवेकानंद आश्रमाचे संस्थापक प पू शुकदास महाराजश्री चे कार्य अध्यात्मिक व समाजोन्नतीचे आहे. असे मत डि एन धाडकर यांनी डोणगांव नगरीत प्रार्थना मंडळाच्या स्थापना प्रसंगी व्यक्त केले

दि १२ जुलै रोजी पलसिध्द मठामध्ये आयोजित कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विवेकानंद आश्रमाचे माजी उपाध्यक्ष डि एन धाडकर तर प्रमुख मार्गदर्शक उपाध्यक्ष अशोक थोरहाते, माजी प्राचार्य जीवनसिंह दिनोरे, प्राचार्य रमेश पवार, डॉ गजानन उल्हामाले, पुरोषोत्तम अकोटकर, शिवदास सांबापुरे,बालु स्वामी,सौ सिंधुताई धाडकर आदी मान्यवर उपस्थित होते, सर्व प्रथम दिपप्रज्वलन करुन जगतगुरु स्वामी पलसिध्द, महात्मा बसवेश्वर,प पू शुकदास महाराजश्री च्या प्रतिमेचे पूजन करुन आयोजकांनी मान्यवरांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले, प्रास्ताविक मनोगतातून आश्रमचे विश्वात संजय भारती यांनी प्रार्थना मंडळ स्थापना मागचा उद्देश स्पष्ट करुन महाराज श्री यांच्या अनुभूती व बोधवचने यावर प्रकाश टाकला, सामूहिक प्रार्थना करण्यात आली, विवेकानंद आश्रमाचे संस्थापक अध्यक्ष प पू शुकदास महाराजश्री यांच्या अनुभूती व बोधवचने या ग्रंथाची समाज हिताच्या उद्देशाने जनसामान्यांना माहिती व्हावी म्हणून प्रार्थना मंडळाची स्थापना करण्यात आली असून प्रार्थना मंडळाच्या सर्व सदस्यांना आध्यात्मिक पुस्तके व प्रसाद देण्यात आला.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन हमीद मुल्लाजी तर आभार प्रदर्शन डॉ संजय धाडकर यांनी मानले, यशस्वीतेसाठी प्रार्थना मंडळाचे सदस्य सुरेश आप्पा फिसके, प्रकाश जैन,मेटांगळे ,कृष्णा आप्पा साखळकर,डिंगाबर बुरखंडे, गणेश पळसकर,दिपक बुरखंडे,निरज आमले,कविताताई गटुले आदिनी अथक परिश्रम घेतले.

## लोकाभिमुख अधिकारी जनतेला प्रिय: निरोप भेट घेतांना अप्पर पोलिस अधीक्षक बी.बी. महामुने यांचे प्रतिपादन

अजिंक्य भारत/ प्रतिनिधी

**चिखली दि.१३ :** जबाबदारीपूर्वक काम करणे हे तर अधिकार्याचे कर्तव्यच आहे. काम करतांना जर अधिकाधिक लोकाभिमुख होवून केले तर परिणाम चांगले येतात. जनतेच्या सकारात्मक सहभागाशिवाय कायदा आणि सुव्यवस्था राखण्यातील यश मिळू शकत नाही आणि लोकाभिमुख अधिकारी जनतेला प्रिय असतात, असे प्रतिपादन अप्पर पोलिस अधीक्षक बी.बी. महामुने यांनी केले.

बुलढाण्यातील कार्यकाळ पूर्ण केल्यावर श्री महामुने यांची रत्नागिरी याठिकाणी बदली झाली आहे. बदलीच्या ठिकाणी रूजू होण्यासाठी जाण्यापूर्वी अप्पर पोलिस अधीक्षकांची पत्रकारांसोबत स्नेहभेट झाली. जिल्हा पत्रकार भवनमध्ये काल, शुक्रवारी या भेटीदरम्यान श्री महामुने यांनी त्यांच्या कार्यकाळातील



सुंदर अनुभवांना उजाळा दिला. पत्राकार आणि पोलिस प्रशासन यांच्यातील समन्वयामुळे मोठे गुन्हे उघडकीस आणण्यात मदत झाली असल्याचेही ते म्हणाले. पोलिसांची प्रतिमा समाजासमोर मांडण्याचे काम पत्रकार करतात. पत्रकार आरश्याचा धर्म निभावतात. बुलढाण्यातील पत्रकारांनी आरश्याचा धर्म कधी सोडला नाही. त्यामुळे कर्तव्यबद्धतेच्या मार्गावरून पोलिस प्रशासन ढळत नाही, असे गौरवोद्गार काढतांना अप्पर पोलिस अधीक्षकांनी बुलढाणेकर जनतेचेही सहकार्य आणि प्रेमाबद्दल आभार मानले. बुलढाणा जिल्हा पत्रकार संघाचे अध्यक्ष रणजीतसिंग राजपूत यांनी श्री महामुने यांचा शॉल आणि बुके देवून सत्कार केला. याप्रसंगी मराठी पत्रकार परिषदचे बुलढाणा जिल्हा मार्गदर्शक भानुदास लकडे, पत्रकार हल्ला विरोधी कृती समितीचे समन्वयक राजेश डिडोळकर, परिषद प्रतिनिधी नितीन शिरसाट, प्रदेश प्रतिनिधी गणेश निकम, जिल्हा पत्रकार संघाचे कार्याध्यक्ष वसीम शेख, सचिव शिवाजी मामनकर, कोषाध्यक्ष ब्रम्हानंद जाधव, विभागीय संघटक रहेमत अली शहा, लक्ष्मण दंदाले व इतरांची यावेळी उपस्थिती होती.

## अंढेरा ठाणेदार रुपेश शक्करगे अक्शन मोडवर; अवैध धंदे तसेच बेशिस्त वाहतूक खपवून घेणार नाही

अजिंक्य भारत/ प्रतिनिधी

**अंढेरा दि.१२ :** अंढेरा पोलिस स्टेशनचे ठाणेदार रुपेश शक्करगे हे अवैध धंदे विरोधात अक्शन मोडवर आले असुन त्यांनी आता आपला तिसरा डोळा उघडला असुन अंढेरा पोलिस स्टेशन अंतर्गत येणाऱ्या जवळपास सर्वच गावात अवैध देशी दारू विक्री असो, किंवा अवैध गुटखा विक्री,वरली मटका, पत्ता क्लब यासारखे अवैध धंदे यापुढे खपवून घेतले जाणार नसुन बिट जमदार यांना अवैध धंद्यावर कडक कारवाई करण्याचे आदेश दिले आहे.तसेच अंढेरा पोलिस स्टेशन अंतर्गत येणाऱ्या गावात कुठे अवैध दारू विक्री असो किंवा अवैध धंदे सुरू असल्यास नागरिकांनी अंढेरा ठाणेदार यांना कळवावे असे आवाहन करण्यात आले आहे.

अंढेरा येथील बस स्टॅण्डला लागुनच अंढेरा येथे इंग्रजकालीन पोलिस स्टेशन असुन भर पोलिस स्टेशनच्या गेटवर तसेच भर दिवसा बस स्टॅण्ड वर बेशिस्त वाहतूकीमुळे प्रवाशांना नाहक त्रासाला सामोरे जावे लागत होते.नागरिक मोठ्या संख्येने भर रस्त्यावर आपली, मोटारसायकल असो,अपे असो किंवा इतर खाजगी वाहन भर रस्त्यावर उभे करत असल्याने पोलिसांना तसेच सर्वसामान्य नागरिकांना, शालेय विद्यार्थ्यांना तसेच मोल मंजुरी करणारे गरीब महिला नाहक त्रासाला सामोरे जावे लागत होते.याबाबत नागरिकांच्या वाढत्या तक्रारीची दखल घेत अंढेरा पोलिस स्टेशनचे ठाणेदार रुपेश शक्करगे अक्शन मोडवर आले असुन ट्रॅफिक पोलिस हवालदार



विनायक टेकाळे तसेच स्थानिक बिट जमदार गजानन वाघ यांना कारवाई करण्याचे सक्तीचे आदेश दिले असुन यापुढे कुठलीही बेशिस्त वाहतूक खपवून घेतली जाणार नसल्याचे सांगितले. ट्रॅफिक हवालदार विनायक टेकाळे आणि बिट जमदार गजानन वाघ हे सकाळ आणि संध्याकाळ बस स्टॅण्ड वर पेट्रोलिंग करत असुन वाहन धारकांना शिस्त लावत असुन नियम मोडणाऱ्यावर कडक कारवाई करत आहे. गेल्या दोन दिवसांपासून अंढेरा बस स्टॅण्ड वर कुठल्याही वर्दळ नसुन ट्रॅफिक हवालदार विनायक टेकाळे यांनी अपे चालकांना आपले अपे भगवान बाबा चौकातच उभे करण्याच्या सुचना दिल्याने तसेच वाहन धारक आपल्यावर पोलिस कारवाई होईल या भितीने आपले वाहन कुठेच उभे करत नसुन बस स्टॅण्ड परिसरात एक प्रकारे शुकशुकाट पहावयास मिळत आहे.सदर कारवाई पथकात ट्रॅफिक हवालदार विनायक टेकाळे,बिट जमदार गजानन वाघ, नितीन पुसे,अमोल रोरे, किशोर जाधव यांचा समावेश होता.बस स्टॅण्ड वरील अवैध दारू विक्री बंद! अंढेरा बस स्टॅण्डला लागुनच श्री औन्ढेश्वर महाविद्यालय असुन या परिसरात दवाखाने, मेडिकल असल्याने मोठ्या संख्येने रुग्ण उपचारासाठी येत असतात.महाविद्यालय परिसरात अवैध दारू विक्री होत असल्याबाबत अनेकांनी ठाणेदार रुपेश शक्करगे यांना सांगितले असुन शालेय विद्यार्थ्यांना तसेच महाविद्यालयीन विद्यार्थीनींना मद्य प्राशन करणार्या व्यक्तीकडुन नाहक त्रासाला सामोरे जावे लागत असे.मद्य प्राशन केलेली व्यक्ती भर रस्त्यावर अश्लील भाषेत शिवीगाळ करतात.काही टपोरी मुले सुद्धा विनाकारण महाविद्यालय सुटते वेळी बस स्टॅण्डवर उभे राहत असे या सर्व प्रकाराची गंभीर दखल घेत यापुढे बस स्टॅण्ड तसेच महाविद्यालयीन परिसरात अवैध दारू विक्री झाल्यास तात्काळ कायदेशीर कारवाई करण्यात येईल अशा सुचना संबंधिताना पोलिस स्टेशन ला बोलावुन देण्यात आल्या आहेत.दि.१२जुलै२०२५ रोजी डिग्रस आणि भरोसा येथे अवैध दारू विक्री करणाऱ्यानां रंगेहाथ पकडून ठाणेदार रुपेश शक्करगे यांनी कारवाई केल्याने अवैध दारू विक्री करणाऱ्याचे चांगलेच धाबे दणाणले आहे

अंढेरा पोलिस स्टेशन अंतर्गत येणाऱ्या गावात कुठेही अवैध दारू विक्री किंवा वरली मटका सुरू असल्यास नागरिकांनी पोलिसांना कळवावे.तात्काळ कारवाई करण्यात येईल.

**रुपेश शक्करगे**
**ठाणेदार,पोलिस स्टेशन अंढेरा**

अजिंक्य भारत
आपलं अमरावती
सोमवार, दि. १४ जुलै २०२५

## थोडक्यात

### तांत्रिक अडचणी घोळ, विद्यार्थी,पालकांना मनस्ताप;अकरावी प्रवेश प्रक्रियेतील दोष निरसन होईना

**अमरावती :** अकरावी ऑनलाइन प्रवेश प्रक्रियेतील गोंधळनाट्य अद्यापही कायम असल्याचे पाहायला मिळात. जिल्हाभरातून अकरावीच्या प्रवेशासाठी विद्यार्थी अर्ज भरण्याच्या हजारो प्रयत्नात असले तरी कंपनीकडून तांत्रिक अडचणीमुळे विद्यार्थी व पालकांना मनस्ताप सहन करावा लागत आहे.केंद्रीय प्रवेश समितीअंतर्गत अकरावी प्रवेशाची ऑनलाइन प्रक्रिया गुरुवार, २६ जूनपासून पुन्हा सुरू झाली आहे. याच दिवशी विद्यार्थ्यांना अलॉट झालेल्या महाविद्यालयांची यादी जाहीर होणार होती. यानंतर २७ पासून पहिली फेरी सुरू होणार होती. मात्र काही अपरिहार्य कारणास्तव गुणवत्ता यादी ही प्रसिध्द होवू शकली नाही. परिणामी आता ही यादी ३० जून रोजी प्रसिध्द होणार आहे. अकरावीची ऑनलाइन प्रवेश प्रक्रिया १९ मेपासून सुरू करण्यात आली.

### जिल्हा परिषद लिपिकवर्गीय कर्मचाऱ्यांचे पदोन्नती स्तर कमी करण्याची मागणी : राज्य शासनाकडे तातडीची विनंती

**अमरावती:** जिल्हा परिषद लिपिकवर्गीय गट-क संवर्गातील कर्मचाऱ्यांचे पदोन्नती स्तर कमी करून समान पदनाम व पदोन्नती संधी मिळाव्यात, यासाठी राज्य शासनाकडे जोरदार मागणी करण्यात आली आहे. याबाबत जिल्हा परिषद लिपिकवर्गीय कर्मचारी संघटनेने ग्रामविकास मंत्री मा. जयकुमार गोरे व प्रधान सचिव ग्रामविकास विभाग यांच्याकडे सविस्तर निवेदन सादर केले आहे. सामान्य प्रशासन विभागाने २३ एप्रिल २०२२ रोजीच्या परिपत्रकानुसार सर्व विभागातील लिपिकवर्गीय कर्मचाऱ्यांचे पदोन्नती टप्पे कमी करण्याचे आदेश दिले होते. मात्र अद्याप त्याची अंमलबजावणी झालेली नाही, ही बाब लक्षात घेता जिल्हा परिषद कर्मचारी संघटनेकडून या निर्णयाची तातडीने अंमलबजावणी करण्याची मागणी करण्यात आली.

### आज अमरावतीतील विकासकामांची आ . रवी राणा करणार पाहणी;

**अमरावती:** आमदार तथा विधानसभा आश्वासन समितीचे अध्यक्ष रवी राणा यांनी दिनांक १४ जुलै २०२५ (सोमवार) रोजी दुपारी १.०० वाजता अमरावती महानगरपालिका क्षेत्रातील विविध विकासकामांची पाहणी करण्याचा दौरा निश्चित केला आहे. या पाहणीत अकोली रोड रेल्वे अंडर ब्रिज, भातकुली अंडर पास ब्रिज, तसेच साईनगर चौक ते अकोली गाव दरम्यान नगरोत्थान योजनेअंतर्गत सुरू असलेले कॉँक्रीट रस्त्याचे काम व स्वच्छता या ठिकाणांचा समावेश आहे. विकासकामांची सद्यस्थिती, प्रगती व गुणवत्तेचा आढावा घेऊन तात्काळ कार्यवाहीसाठी संबंधित विभागांना सूचना दिल्या जाणार आहेत.

### सुपरस्पेशालिटी हॉस्पिटलमध्ये महिलेच्या पर्सवर डल्ला

**अमरावती :** स्थानिक सुपरस्पेशालिटी हॉस्पिटलमध्ये चिठ्ठी काढत असलेल्या महिलेच्या पर्सवर अज्ञात चोरट्याने डल्ला मारला. तिच्या पर्समधून रोकडसह सोन्याचे दागिने असा एकूण ४४ हजारांचा ऐवज चोरून नेल्याची घटना ११ जुलै रोजी दुपारी १२ वाजताच्या सुमारास घडली. याप्रकरणी महिलेच्या तक्रारीवरून गाडगेनगर पोलीस ठाण्यात अज्ञात चोरट्याविरूध्द गुन्हा दाखल करण्यात आला.

### महापालिका कार्यालयात कचरा घंटा गाडीतून बॅटऱ्या लंपास

**अमरावती :** महापालिका कार्यालयात दोन उभ्या कचरा घंटा गाडीतून १० हजार रूपये किंमतीच्या बॅटऱ्या अज्ञात चोरट्याने चोरून नेल्याची घटना १० ते ११ जुलै दरम्यान घडली. याप्रकरणी कुलदीप किशोर चावरे यांच्या तक्रारीवरून राजापेठ पोलीस ठाण्यात अज्ञात चोरट्याविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला.

### मोटारसायकल लंपास

**अमरावती :** राजकमल ते राजापेठ मार्गावरील दर्यानजिक उभी करून ठेवलेली ॲक्टिव्हा एमएच २७ सीएस १७२४ किंमत अंदाजे ५० हजार अज्ञात चोरट्याने चोरून नेल्याची सातरगाव शिवारात १० जुलै रोजी घडली. याप्रकरणी महिलेच्या तक्रारीवरून कोतवाली पोलीस ठाण्यात अज्ञात चोरट्याविरूध्द गुन्हा दाखल करण्यात आला.

### दारू विक्रेत्यांवर पोलिसांची धाडी, मुद्देमाल हस्तगत

**अमरावती :** विलास नगरात देशी दारूची अवैध विक्री होत असल्याची माहिती मिळताच पोलिसांनी धाड घालून रोशन ढाले याला ताब्यात घेत त्याच्याजवळून ३५ नग देशी दारू बॉटल्स किंमत अंदाजे २८०० रूपयांचा मुद्देमाल जप्त केला. गाडगेनगर पोलिसांनी ही कारवाई ११ जुलै रोजी केली. पोहेकॉ फिरोज खान यांच्या फिर्यादीवरून गुन्हा दाखल करण्यात आला. जयस्तंभ चौकातील एका हॉटेलजवळून दर्शन माकोडे याला ताब्यात घेत त्याच्याजवळून १२८० रूपयांचा दारू बॉटल्स जप्त केल्या. खाटीकपुरा, भातकुली येथे धाड घालून शुभम आठवले याला ताब्यात घेत त्याच्याजवळून ११ नग देशी दारू बॉटल्स किंमत अंदाजे ५५० रूपयाचा माल जप्त करून गुन्हा दाखल करण्यात आला. समजपत्रावर सर्वांची सुटका करण्यात आली.

# इंटिग्रेटेड क्लासेसचे बोगस महाविद्यालयांसोबत टाय-अप

## विद्यार्थ्यांच्या अटीवर चालतात महाविद्यालये संचमान्यता वाचविण्याचे नामवंत महाविद्यालयापुढे आव्हान

**दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी**



**अमरावती, दि. १३ :** इंजिनियर व डॉक्टर बनविणारी फॅक्टरी अशी जाहिरात करून पालकांना भूरळ घालणाऱ्या इंटिग्रेटेड क्लासेसने आपला धंदा चालविण्याआठी शहरातील अनेक बोगस महाविद्यालयांशी टायप केले आहे. त्यामुळे क्लासला प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्याला त्याच्या मर्जीप्रमाणे नव्हे तर क्लास सांगेल त्या महाविद्यालयात घ्यावा लागतो. ही महाविद्यालये विद्यार्थ्यांना शाळेत उपस्थित राहण्यापासून सूट देते. शिक्षण मंडळाकडून घेतल्या जाणाऱ्या बोर्डाच्या परीक्षेला पात्र होण्यासाठी असलेली विद्यार्थ्यांची माहिती (जसे की विद्यार्थ्यांचे परीक्षा अर्ज, ७५ टक्के उपस्थितीचा अहवाल, प्रत्येक्षिक परीक्षेचे गुण) ही महाविद्यालय शिक्षण मंडळाकडे पाठवून परीक्षेचे सर्व सोपस्कार पार पाडते. सुसज्ज इमारतीत ही महविद्यालय सुरू असून शासनाच्या शालेय शिक्षण विभागाचे महाविद्यालय चालविण्यासाठी असलेली सर्व मानके गुंडाळून ठेवण्यात आली आहे. केवळ सुसज्ज इमारती उभ्या असून एक प्राचार्य, एक शिक्षक व शिपाई इतकाच स्टाफ. वर्गखोल्या, प्रत्येक्षिक वर्गासाठी प्रयोगशाळा, ग्रंथालय या व इतर सुविधा दिसून येत नाही. क्लासला प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्याला शहरापासून दूर असलेल्या या बोगस महाविद्यालयाच्या पर्यायाचा विचार करु शकतात. ही महाविद्यालये कायम विनाअनुदानित तत्वावर चालविली जात असून ३० ते ४० हजार रुपये प्रति वर्ष विद्यार्थ्यांकडून शुल्क वसूल केले जाते. त्याचबरोबर विद्यार्थ्याने ज्या क्लासला प्रवेश घेतला असेल त्या क्लासकडून २० ते ३० हजार रुपये प्रत्येक विद्यार्थ्यामागे महाविद्यालयाला दिल्या जाते. त्याबदल्यात या विद्यार्थ्यांचे संपूर्ण शैक्षणिक रेकॉर्ड, प्रत्येक्षिक परीक्षेचे नियोजन महाविद्यालायकडून केले जाते. याव्यतिरिक्त या महाविद्यालयात कोणालाही प्रवेश दिला जात नाही. निव्वळ पैसे कमविण्याच्या नादात या महाविद्यालयांनी तरुणांच्या भवितव्याशी खेळ चालविला आहे.

### नामवंत महाविद्यालयाला फटका

दहावी परिक्षेतून उत्तीर्ण झालेले ८० टक्के विद्यार्थी हे इंजिनियर अथवा वैद्यकीय तसेच इतर अभ्याक्रमच्या प्रवेश परीक्षेची तयारी करण्यासाठी क्लास लावतात. त्यामुळे क्लासला प्राधान्य देऊन महाविद्यालयातील वर्ग आम्ही करणार नाही ही अट मान्य केली तरच विद्यार्थी महाविद्यालयात प्रवेश घेत होते. याचा फटका शहरातील नामवंत महाविद्यालयांना बसू लागला. अशा महाविद्यालयात प्रवेश घटू लागल्याने याचा परिणाम या महाविद्यालयाच्या संचमान्यतेवर होऊ लागला व महाविद्यालये अडचणीत येण्याची शक्यता निर्माण झाली. त्यामुळे नाईलाजास्तव या महाविद्यालयानासुद्धा हाच मार्ग पत्करावा लागला आणि याही महाविद्यालयात असे प्रवेश देण्यात येऊ लागले.

### अॅडमिशन अमरावतीत क्लास अकोल्यात

दहावीनंतर ११ वी आणि १२ वी सोबतच, काही विशिष्ट प्रवेश परीक्षांची (IIT, JEE, NEET) तयारी करण्यासाठी अनेकजण अकोला, नांदेड, लातूर तसेच राजस्थानमधील कोटा येथे चालणाऱ्या क्लासला प्राधान्य देतात. अशा क्लासला प्रवेश घेऊन नियमित वर्गासाठी मात्र प्रवेश अमरावतीमधील एखाद्या महाविद्यालयात घेतला जातो.

### वास्तविक ज्ञानापासून दुरावतोय विद्यार्थी

सैद्धांतिकदृष्ट्या, नियमित १२ वीचा अभ्यासक्रम पूर्ण करून त्यानंतर घेतल्या जाणाऱ्या इंजिनियरिंग अथवा वैद्यकीय अभ्यासक्रमाच्या प्रवेश परिक्षेकडे लक्ष केंद्रित करणे आवश्यक आहे. मात्र इंटिग्रेटेड कोर्समध्येही, ते तुम्हाला तुमच्या बोर्डसाठी अजिबात शिकवत नाहीत, ते फक्त तुमच्या IIT-JEE, NEET परिक्षेवर लक्ष केंद्रित करतात आणि संपूर्ण अभ्यासक्रम आणि अध्यापन पद्धती विशेषतः याच स्पर्धा परीक्षेसाठी डिझाइन केलेली असते, बोर्डासाठी नाही. त्यामुळे विद्यार्थ्यांची बोर्ड परीक्षेतील गुणांची टक्केवारी घसरत आहे उलट प्रवेश परिक्षेची टक्केवारी त्यापेक्षा जास्त येत असल्याने विद्यार्थी हा वास्तविक ज्ञानापासून दूर जात असल्याची गंभीर बाब समोर आली आहे.

# शहर स्वच्छता अभियानाच्या माध्यमातून शहराचा ऐतिहासिक वारसा जोपासण्याचे युवक काँग्रेसचे प्रयत्न

**दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी**




**अमरावती, दि. १३ :** शहरात ठिकठिकाणी साचलेला कचरा, मनपाच्या दुर्लक्षामुळे वाढलेली अस्वच्छता व काही निवडक ठेकेदारांच्या मनमानी कारभाराविरुद्ध अमरावती शहर युवक काँग्रेसद्वारे 'गांधीगारी' पद्धतीने आवाज उठवत विशेष स्वच्छता अभियान राबविले आहे.

जननायक राहुलजी गांधी यांच्या वाढदिवसानिमित्त दि. १९ जून पासून या अभियानाची सुरुवात करण्यात आली होती. पुढील टप्प्यात आज दि. १३ जुलै, रविवार रोजी जवाहर गेट रस्त्यावरील ऐतिहासिक परकोटाच्या परिसरात उगवलेले गांजर गवत व तणकट काढून परिसराची साफसफाई करण्यात आली. जुन्या अमरावती शहराच्या इतिहासाची साक्ष देणारा हा परकोट म्हणजे या शहराचा एक सांस्कृतिक वारसा आहे. डॉ. सुनील देशमुख यांच्या पालकमंत्री पदाच्या कार्यकाळात त्यांच्या विशेष प्रयत्नाने या परकोटाचे सौंदर्यीकरण करण्यात आले होते. मात्र गेल्या काही दिवसांपासून प्रशासनाच्या दुर्लक्षामुळे या परकोटा समोरील परिसरात सर्वत्र गांजर गवत व तणकटे मोठ्या प्रमाणात वाढल्याने पराकोटाचे सौंदर्य झाकोळल्या गेले होते.

तसेच या परिसरात काही असामाजिक तत्वांकडून दारूच्या बाटल्या व कचरा टाकण्यात आल्याने स्वच्छतेचा प्रश्न निर्माण झाला होता. मात्र युवक काँग्रेस कार्यकर्त्यांनी मोठ्या मेहनतीने परिसरातील कचरा उचलून व गांजर गवत काढून स्वच्छता मोहीम यशस्वीरित्या राबवली. यावेळी मनपा प्रशासनाला पूर्वकल्पना देऊनसुद्धा प्रशासनाने कुठलीही यंत्रणा मदतीला न दिल्याने मनपा प्रशासनाची या ऐतिहासिक परकोटाच्या स्वच्छतेबाबतची अनास्था साफ दिसून आली आहे. यावेळी परिसरातील नागरिकांनीही युवक काँग्रेसच्या आवाहनाला उत्तम प्रतिसाद दिला व युवक काँग्रेसच्या अभियानाचे स्वागत केले. यावेळी माजी महापौर विलासभाऊ इंगोले, माजी महापौर मिलिंदभाऊ चिमोटे, शहर काँग्रेस अध्यक्ष बबलूभाऊ शेखावत, माजी नगरसेवक संजय शिरभाते, प्रा.अजय गुल्हाने, सुरेश रतावा, पंकज लुंगीकर, नौशाद भाई, जुबेर खान व परिसरातील इतर नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# जिल्ह्यातील नऊ तालूक्यांतील ४८२ गावांना संभाव्य पुरावा धोका

**दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी**

**अमरावती, दि. १३ :** मान्सून तोंडावर असल्याने जिल्हा प्रशासन मान्सून पुर्व उपाय योजनांकरिता सज्ज झाला आहे. जिल्ह्यात ९ तालुक्यांतील ४८२ गावांना संभाव्य पुराचा धोका असल्याने अशा गावांकडे लक्ष वेधत जिल्हास्तरावर २४ व तालूकास्तरावर १६८ बचाव पथक अत्याधुनिक साहित्यांसह सक्रिय करण्यात आले आहे.

७ जूनपासून मान्सून सक्रिय होणार आहे. जिल्ह्यात आपत्तीमुळे होणारे नुकसान टाळण्याकरिता तसेच नागरिकांच्या बचावाकरिता दरवर्षी जिल्हा आपत्ती व्यवस्थापनाद्वारे उपाय योजना केल्या जातात. अतिवृष्टीने नदी, नाल्यांना पुर येऊन गावांना, नागरिकांना होणारा धोका टाळण्याकरिता तसेच यापासून त्यांचा बचाव करण्याकरिता आपत्ती व्यवस्थापनाने पुर्व नियोजन केले आहे. सन २०१७ च्या सर्वेनुसार जिल्ह्यात ४८२ गावांना संभाव्य पुरावा धोका उदभवू शकतो. त्यामुळे या गावांकडे आपत्ती विभागाने लक्ष केंद्रीत केले आहे. यातील ११ गावांना मोठ्या नद्यांमुळे धोका आहे तर ३०२ गावे ही लहान नाले, नद्यांमुळे प्रभावित होतात. अशी परिस्थिती उदभवल्यास त्यांच्याकरिता पर्यायी व्यवस्था म्हणून ६८६ तात्पुरते निवाऱ्यांची व्यवस्था करण्यात आली आहे.

# झेडपीत वाहन चालक कंत्राटचा घोळ कायम

**दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी**

**परमविर मल्टीपरपर्ज संस्थेला कंत्राट मिळताच ५ ते ७ वाहनचालकांना डावलले, ईपीएफ व इएसआयसीचे हफ्तेही बुडविले, प्रबुद्ध संस्थेचा आरोप**

**अमरावती, दि. १३ :** जिल्हा परिषदेत आरोग्य विभागातील वाहन चालक कंत्राटचा घोळ कायम असल्याने याचा सर्वाधिक फटका वाहन चालकांना सहन करावा लागत आहे.ज्या परमवीर संस्थेने यापुर्वीच्या कंत्राटमध्ये बहुतांश कर्मचाऱ्यांचे ईपीएफ व इएसआसीचे हफ्ते बुडविले त्याच संस्थेला पुन्हा जिल्हा परिषदेने कंत्राट दिला आहे.त्यामुळे आता या संस्थेविरधात तक्रारी करणाऱ्या कर्मचाऱ्यांना नियुक्तीचे आदेशच दिले नाही. याबाबतची तक्रार प्रबुध्द संस्थेने सिईओंकडे दिली आहे.

जिल्हा परषिदेच्या आरोग्य विभागात सन २०१७ ते २०२२ दरम्यान वाहन चालकाचा कंत्राट परमवीर संस्थेकडे होता. या कंत्राटदरम्यान या संस्थेने काही कर्मचाऱ्यांचे इपीएफ व इएसआयसीची हफ्तेच भरले नाही.त्यामुळे त्यावेळी कर्मचाऱ्यांनी या संस्थेविरोधात तक्रारी देखील केल्या आहेत. दरम्यान २०२२ मध्ये वाहन चालकांकरीता नविन निविदा मागविण्यात आल्या.यामध्ये प्रबुध्द संस्थेला याचा कंत्राट देण्यात आला. या संस्थेकडे केवळ सहा महीने कंत्राट असताना सदर संस्था कर्मचाऱ्यांना विहित मुदतीत वेतन देत नसल्याचा ठपका ठेवत आरोग्य विभागाने प्रबूध्द संस्थेचा कंत्राट सहा महीन्यात रद्द केला. त्यामुळे या संस्थेने न्यायालयाचा दरवाजा ठोठावला. सदर प्रकरण न्यायप्रविष्ट असतानाच दरम्यान सदरचा कंत्राट परमवीर संस्थेला देण्यात आला असा आरोप प्रबुध्द संस्थेचे अध्यक्ष प्रविण वाडेकर यांनी केला आहे. परंतु या संस्थेला कंत्राट मिळताच ज्या कर्मचाऱ्यांनी आपल्या विरोधात तक्रारी केल्या त्यांना नियुक्तीचे आदेशच दिले नाही.तर मागील तक्रारी मागे घेतल्यानंतरच आदेश देईलअशीही अट लादण्यात आल्याने कर्मचाऱ्यांची मात्र चांगलीच कसरत होत आहे.या कंत्राटच्या घोळात मात्र कर्मचाऱ्यांना नाहक त्रास सहन करावा लागत आहे.याबाबतची तक्रार देखील प्रविण वाडेकर यांनी सिइओंना दिली आहे. पुर्वीच्या कंत्राटदार संस्थेने कुठल्याही प्रकारचे ईपीएफ, ईएसआयसी व इतर शासकीय कपातीचा भरणा नाही. परंतु सदर पुर्वीच्या कंत्राटदारावर असे कुठल्याही प्रकारचे कंत्राट रद्द करण्याची प्रक्रिया व ब्लॅकलिस्ट करण्याची प्रक्रिया साधारणता २० वर्षांचा कालावधी अद्यापपर्यंत झाला नाही.



**गुंज :** गुंज ता. महागाव जि. यवतमाळ येथे माजी मंत्री बच्चू कडू यांच्या ७/१२ कोरा यात्रेस ग्रामस्थांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

# महामार्गावरील बार आणि रेस्टॉरेन्टला मध्यरात्रीपर्यंत परवानगी कुणाची?

## पोलीस यंत्रणेचा वचक राहीला नाही; हत्येच्या घटनेने शासकीय यंत्रणेवर शंका

**दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी**

**नांदगाव पेठ, दि. १३ : राष्ट्रीय महामार्गावरील हॉटेल्स,बार आणि रेस्टोरेन्टला रात्री ११ वाजेपर्यंतच पोलीस विभागाची परवानगी असतांना नांदगाव पेठ हद्दीत येणाऱ्या हॉटेल्स, बार आणि रेस्टोरेन्टला मध्यरात्रीपर्यंत कुणाची परवानगी आहे असा प्रश्न शनिवारी झालेल्या राजकुमार सुंदरानी यांच्या हत्येच्या घटनेमुळे निर्माण झाला आहे.**



पोलीस विभागावर नेमके दडपण कुणाचे आहे हे समजायला अवघड असून राजकीय नेत्यांच्या बार अँड रेस्टोरेन्टला मध्यरात्री ३ ते ४ वाजेपर्यंत मुभा दिली जात असेल आणि त्याठिकाणी गुंड प्रवृत्तीचे लोक येऊन शहराची शांतता आणि सुव्यवस्था बिघडवत असेल तर याला जबाबदार कोण हा यक्षप्रश्न यानिमित्ताने उपस्थित होतो आहे.

आषाढी एकादशीच्या दिवशी राज्यात ड्राय डे घोषित असतांना महामार्गालगत असलेल्या न्यू किशन बार अँड रेस्टोरेन्ट मधून दिवसभर खुलेआम दुप्पट भावाने मद्यविक्री सुरू होती. रात्री साडे नऊ वाजता संबंधित प्रकारची माहिती पोलिस प्रशासनाला देण्यात आल्यानंतर एका तासात नांदगाव पेठ पोलिसांनी त्या बार वर धाड टाकली तेव्हा असा कोणता प्रकार झालाच नाही, शांतता आहे असा पोलिसांकडून फोटो सह वरिष्ठांना अहवाल जाणे ही बाब खेदजनक असून अश्या लपवालपवी मुळेच एस.ए.इम्पेरियल बार अँड रेस्टोरेन्ट समोर मध्यरात्री साडे तीन वाजता हत्येसारखा प्रकार घडतोय याला कुठेतरी पोलिस प्रशासन जबाबदार असल्याचे बोलले जात आहे.

दहा दिवस उलटूनही न्यू किशन बार अँड रेस्टोरेन्ट आणि येथून फुकट मद्याची बॉटल घेऊन जाणारे पोलीस कर्मचारी यांच्यावर कोणत्याही प्रकारची कार्यवाही झाली नाही हे विशेष! त्या दिवशी कार्यवाही झाली असती तर आज कदाचित ही दुर्दैवी घटना घडली नसती. महामार्गावरील असे अनेक हॉटेल्स, बार अँड रेस्टोरेन्ट आहेत जेथे रात्री ग्राहक कितीही वाजता गेले तरी मागच्या दाराने आत मध्ये घेतात. आणि मद्य व जेवणाची सुविधा पुरवितात. नेत्यांच्या हॉटेल्स ला वेगळे नियम आहेत आणि तेच रस्त्यांवरील पोटाची खळगी भरणारे लहान सहान हॉटेल्स आहेत त्यांना मात्र दहा वाजता कडक शिट्टी मारून पोलीस कर्मचारी घड्याळाची वेळ इशाऱ्याने दाखवत डोळे वटारून हॉटेल्स बंद करण्याचा आदेश देतात हे तरी कितपत योग्य आहे असा प्रश्न खऱ्या अर्थाने निर्माण होत आहे.

नांदगाव पेठ ला नव्याने लाभलेले पोलीस निरीक्षक दिनेश दहातोंडे हे अतिशय शिस्तप्रिय,कायद्याची कडक अंमलबजावणी करणारे आणि जनतेच्या सुरक्षेसाठी झटणारे अशी त्यांची पूर्वीची ओळख आहे त्यामुळे त्यांच्याकडून नांदगाव पेठ हद्दीतील नागरिकांना भरपूर अपेक्षा असून यापुढे हद्दीत बेकायदेशीर व्यवसाय करणाऱ्यांवर तसेच कायद्याचे उल्लंघन करणाऱ्यांवर खाकी वर्दीचा दंडुका बसला पाहिजे तरच हद्दीत आणि पर्यायाने शहरात शांतता आणि सुव्यवस्था निर्माण होईल यात शंका नाही.

## थोडक्यात



### बारावी परीक्षेत यश मिळविल्याबद्दल समर्थ चांदेकरचा मंत्र्यांच्या हस्ते गौरव

**यवतमाळ:** एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प (आयटीडीपी) पांढरकवडा व पुसद या दोन्ही स्तरांवर बारावी विज्ञान शाखेत प्रथम क्रमांक मिळविल्याबद्दल समर्थ राजू चांदेकर याचा गौरव करण्यात आला. शनिवारी, १२ जुलै रोजी झालेल्या एका कार्यक्रमात त्याला मान्यवरांच्या हस्ते प्रशस्तिपत्र देऊन सन्मानित करण्यात आले. यावेळी मृद व जल संधारण मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री संजय राठोड, आदिवासी विकास मंत्री प्राचार्य डॉ. अशोक उईके, आमदार राजू तोडसाम, अप्पर आयुक्त जितेंद्र चौधरी आणि जिल्हाधिकारी विकास मीना उपस्थित होते. समर्थच्या या शैक्षणिक यशाबद्दल त्याचे विविध स्तरातून कौतुक होत आहे. त्याला पुढील वाटचालीस शुभेच्छा देण्यात येत आहेत.



### ढाणकी स्मशानभूमीत 'जीवनांकुर' संस्थेतर्फे वृक्षारोपण

**उमरखेड :** येथील जीवनांकुर बहुउद्देशीय सेवाभावी संस्थेतर्फे ढाणकी येथील स्मशानभूमीत शंभर करवंदाच्या रोपांची लागवड करण्यात आली. पर्यावरण संरक्षणासाठी संस्थेने उचललेल्या या पावलाचे सर्वत्र कौतुक होत असून, या वृक्षांच्या संगोपनाची जबाबदारी मोक्षधाम समितीने स्वीकारली आहे. 'जीवनांकुर' संस्था आणि 'देवगिरी वृक्ष भिशी' यांच्या माध्यमातून गेल्या अनेक वर्षांपासून पर्यावरणपूरक उपक्रम राबविले जात आहेत. त्याचाच एक भाग म्हणून, रविवारी ढाणकीतील स्मशानभूमीत हे वृक्षारोपण करण्यात आले. या कार्यक्रमाला मोक्षधाम समितीचे अध्यक्ष सुभाष कुचेरिया, जीवनांकुरचे सचिव हरिश्चंद्र चिल्लोरे, सुरेश तुप्तेवार, अतुल येरावार, अमोल तुपेकर, गजानन गंजेवाड, संतोष तिरमकदार यांच्यासह अनेक वृक्षमित्र आणि नागरिक उपस्थित होते. या उपक्रमामुळे स्मशानभूमीच्या सौंदर्यात भर पडणार असून, पर्यावरणाचेही रक्षण होण्यास मदत होणार आहे.



### कोल्ही सोसायटीची अविरोध निवडणुकीची परंपरा कायम

**यवतमाळ :** येथील कोल्ही विविध कार्यकारी सोसायटीची अध्यक्ष आणि उपाध्यक्ष पदाची निवडणूक बिनविरोध पार पडली. ज्यामुळे गावातील एकीची परंपरा पुन्हा एकदा सिद्ध झाली आहे. या निवडणुकीमुळे गावातील एकात्मिक वातावरण पुन्हा एकदा दिसून आले. सोसायटीच्या अध्यक्षपदासाठी सूचक म्हणून भाजपचे जिल्हा उपाध्यक्ष तथा सोसायटीचे संचालक प्रकाश भूमकाळे होते, तर संचालक अशोक वानखडे यांनी अनुमोदन दिले. उपाध्यक्षपदासाठी नारायण परिमल यांनी सूचक महणून, तर प्रमोद मस्के यांनी अनुमोदन दिले. ही निवड प्रक्रिया सर्वानुमते पार पडल्याने, गावात आनंदाचे वातावरण आहे. दरवर्षीप्रमाणे याहीवर्षी ही निवडणूक अविरोध व्हावी, यासाठी प्रकाश भूमकाळे, गोलू शिंदे, राजू सहारे, तुषार गादे, प्रशांत परिमल, संजय महल्ले, बाळू सहारे, शंकर सयाम, अमोल गुजर, मिलिंद गुजर आणि सुबोध नगराळे यांनी विशेष परिश्रम घेतले. त्यांच्या या प्रयत्नांचे सर्वत्र कौतुक होत आहे.

# बोगदा ठरतोय 'मृत्यूचा सापळा'

## एकाचा बळी घेऊनही प्रशासन 'झोपेतच'; अहेरअल्ली येथील बोगद्यामुळे नागरिकांचा जीव धोक्यात

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी

✦ रमेश सिडाम







झरी-जामणी, दि. १३ : पाटण-बोरी ते वणी राज्य महामार्गावरील अहेरअल्ली गावाजवळ असलेला रेल्वेचा बोगदा, नागरिकांसाठी 'मृत्यूचा सापळा' बनला आहे. अत्यंत अरुंद असलेल्या या बोगद्यात एकाच वेळी एकच वाहन जाऊ शकते आणि समोरून येणारे वाहनही दिसत नाही. काही वर्षांपूर्वी येथे एका दुचाकीस्वाराचा बळी गेल्यानंतरही, प्रशासनाने यावर कोणताही तोडगा काढलेला नाही. आता पावसाळ्यात येथे पाणी साचत असल्याने, नागरिकांमध्ये आणि विशेषतः विद्यार्थ्यांच्या पालकांमध्ये भीतीचे वातावरण आहे.

अहेरअल्ली गावाजवळ असलेला हा बोगदा, परिसरातील अनेक गावांसाठी महत्वाचा मार्ग आहे. मात्र, त्याची रचना अत्यंत धोकादायक आहे. बोगदा इतका अरुंद आहे की, एका वाहनाला दुसऱ्या वाहनाची वाट पाहत थांबावे लागते. दोन-तीन वर्षांपूर्वी, याच बोगद्यात समोरून येणारी एसटी न दिसल्याने, एका मोटारसायकलस्वाराचा जागीच मृत्यू झाला होता. ही दुर्घटना घडूनही, प्रशासनाने या बोगद्याच्या दुरुस्तीकडे किंवा रुंदीकरणाकडे पूर्णपणे दुर्लक्ष केले आहे. सध्या पावसाळ्याचे दिवस असून, या बोगद्यात पाणी साचत आहे. गावातील लहान मुलांना याच पाण्यातून आणि खड्ड्यांतून शाळेत जावे लागत आहे. या जीवघेण्या बोगद्यामुळे, अपघात होण्याची मोठी शक्यता निर्माण झाली आहे. त्यामुळे, शासनाने या गंभीर समस्येकडे तातडीने लक्ष घालून, नागरिकांना आणि शाळकरी मुलांना सुरक्षा प्रदान करावी, अशी मागणी गावातील पोलिस पाटील दिलीप राऊत, सरपंच हितेश राऊत आणि शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष संजय मन्ने यांच्यासह समस्त गावकऱ्यांनी केली आहे. पावसाळ्यात या बोगद्यात गुडघाभर पाणी साचते. अहेरअल्ली गावातील लहान मुलांना शाळेत जाण्यासाठी दुसरा कोणताही जवळचा मार्ग नाही. त्यामुळे, त्यांना दररोज याच खड्डेमय आणि पाण्याने भरलेल्या बोगद्यातून जीवघेणा प्रवास करावा लागतो. या धोकादायक परिस्थितीमुळे, विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेचा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे.

**एका बळीनंतरही प्रशासन झोपेतच**

**या बोगद्याची धोकादायक रचना नवीन नाही. दोन-तीन वर्षांपूर्वी, याच ठिकाणी एका मोटारसायकलस्वाराचा एसटीला धडकून दुर्दैवी मृत्यू झाला होता.. एवढी मोठी दुर्घटना घडूनही, संबंधित विभागाने किंवा प्रशासनाने यावर कोणताही कायमस्वरूपी तोडगा काढलेला नाही. आजही हा बोगदा तसाच असून, तो एका नवीन अपघाताला निमंत्रण देत आहे. प्रशासनाच्या या उदासीनतेमुळे नागरिकांमध्ये तीव्र संताप आहे.**

**CAPTION** राज्यपालांचे स्वागत...



**यवतमाळ :** राजस्थानचे राज्यपाल हरीभाऊ बागडे यांचे शनिवारी सायंकाळी यवतमाळ येथील शासकीय विश्रामगृहात आगमन झाले. यावेळी, जिल्हाधिकारी विकास मीना आणि जिल्हा पोलिस अधीक्षक कुमार चिंता यांनी त्यांचे पुष्पगुच्छ देऊन त्यांचे स्वागत केले. ते सोमवारी, दि. 14 महागाव तालुक्यातील गुंज येथे असलेल्या नॅचरल शुगर युनिटला भेट देणार आहेत.

### शकुंतलाबाई गुल्हाने यांचे निधन



यवतमाळ, दि. १३ : शहरातील शकुंतलाबाई आनंदराव गुल्हाने (वय ८४) यांचे शनिवारी, १२ जुलै रोजी रात्री ११:३० वाजता अल्पशा आजाराने निधन झाले. त्या आर्वी (जि. वर्धा) येथील मूळ रहिवासी होत्या. त्यांच्या पश्चात तीन मुले, दोन मुली आणि नातवंडांसह मोठा आप्तपरिवार आहे. त्या प्राचार्य दिलीप गुल्हाने, अरविंद गुल्हाने आणि प्रवीण गुल्हाने यांच्या आई होत. त्यांच्यावर रविवारी (दि. १३) दुपारी पांढरकवडा रोडवरील मोक्षधामात अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या निधनाने गुल्हाने कुटुंबियावर शोककळा पसरली आहे.

## विद्यार्थिनींना मोफत सायकल वाटप

### मुलींची शैक्षणिक गळती थांबवण्यासाठी महत्वपूर्ण उपक्रम




दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी

**पुसद, दि. १३ :** मुलींची शैक्षणिक गळती थांबावी, या उद्देशाने येथील मातोश्री सुभद्राबाई जिल्हेवार माध्यमिक विद्यालयात, मानव विकास योजनेअंतर्गत विद्यार्थिनींना मोफत सायकलींचे वाटप करण्यात आले. या उपक्रमामुळे विद्यार्थिनींचा शाळेतील प्रवास सुकर होणार आहे.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे अध्यक्ष सुभाष कोसलगे होते. त्यांनी आपल्या भाषणात, 'अनेक पालकांची आर्थिक परिस्थिती बेताची असल्याने, ते मुलींना सायकल घेऊन देऊ शकत नाहीत. शासनाने ही अडचण ओळखून ही योजना आणली आहे,' असे सांगत योजनेचे कौतुक केले. विस्तार अधिकारी उमेश वाघमारे यांनीही शासनाच्या या योजनेमुळे मुलींचे शाळेत येण्याचे प्रमाण वाढेल, असा विश्वास व्यक्त केला. यावेळी काकडदाती, बोरी, धनसळ, मुलतानवाडी, कवडीपूर येथील १७ विद्यार्थिनींना मान्यवरांच्याहस्ते सायकली देण्यात आल्या. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन बाळकृष्ण मंदाडे यांनी केले, तर आभार प्रदर्शन छाया वाघमारे यांनी केले.

## '७/१२ कोरा' पदयात्रेला सरपंच संघटनेचा पाठिंबा

### विदर्भ सरचिटणीस जवादे यांची घोषणा

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी

**राळेगाव, दि.१३:** शेतकऱ्यांच्या संपूर्ण कर्जमुक्तीसाठी, आमदार बच्चू कडू यांनी सुरू केलेल्या '७/१२ कोरा' पदयात्रेला, महाराष्ट्र सरपंच संघटनेने जाहीर पाठिंबा दिला आहे. संघटना या आंदोलनात केवळ पाठिंबाच देणार नाही, तर सक्रिय सहभागही नोंदवणार आहे, अशी घोषणा संघटनेचे विदर्भ सरचिटणीस सुधीर जवादे यांनी केली आहे.

ही पदयात्रा पापळ (जि. अमरावती) ते चिलगव्हाण (जि. यवतमाळ) यादरम्यान काढण्यात आली आहे. शेतकऱ्यांना सन्मान आणि न्याय मिळवून देणे हा या यात्रेचा मुख्य उद्देश आहे. या आंदोलनाला पाठिंबा देण्यामागील भूमिका स्पष्ट करताना, सुधीर जवादे म्हणाले की, 'आज ग्रामीण भागात नागरिकांमध्ये प्रचंड असंतोष आहे. सततची नापिकी, कर्जबाजारीपणा, शेतमालाला मिळणारा कमी भाव आणि शासनाच्या तुघलकी कारभारामुळेशेतकरी आत्महत्येच्या गर्तेत सापडला आहे. शासनाने कर्जमाफीचे दिलेले वचनही पाळलेले नाही.' ते पुढे म्हणाले की, 'अशा गंभीर परिस्थितीत, बच्चू कडू यांनी या पदयात्रेच्या माध्यमातून शेतकऱ्यांच्या ज्वलंत प्रश्न ऐरणीवर आणले आहेत. त्यामुळे, त्यांच्या या 'जिवंत मातीच्या स्वातंत्र्याच्या लढ्याला' सरपंच संघटनेचा पूर्ण पाठिंबा दिला आहे. ही पदयात्रा बहिऱ्या शासनाच्या डोळ्यांत अंजन घालणारे मोठे आंदोलन ठरेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.' या आंदोलनात संघटनेचे पदाधिकारी, कार्यकर्ते, तसेच गावपातळीवरील शेतकरी, शेतमजूर आणि महिलांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहनही सुधीर जवादे यांनी केले आहे. सरपंच हा गाव आणि प्रशासन यांच्यातील महत्त्वाचा दुवा असतो. सरपंच संघटनेने या आंदोलनाला पाठिंबा दिल्याने, हा लढा आता केवळ एका नेत्याचा किंवा संघटनेचा राहिलेला नाही, तर तो गावपातळीपर्यंत पोहोचला आहे. गावागावांतील लोकप्रतिनिधीच आता शासनाच्या धोरणांविरोधात रस्त्यावर उतरल्याने, या आंदोलनाला मोठे बळ मिळाले आहे आणि सरकारवरचा दबाव आणखी वाढला आहे.

> **'ग्रामीण भागात आज प्रचंड असंतोष आहे.**
>
> 
>
> **शेतीची अवस्था दयनीय झाली आहे. जगाचा पोशिंदा शेतकरी महामागाई आणि नापिकी व नैसर्गिक संकटाच्या चक्रव्यूहात सापडला आहे. अशा वेळी प्रहारचे संस्थापक बच्चू कडू यांनी यांनी पदयात्रा सुरू करून हेप्रश्न ऐरणीवर आणले आहेत. या आंदोलनाला महाराष्ट्र सरपंच संघटनेने जाहीर पाठिंबा दिला आहे. संघटनेच्या पदाधिकारी, कार्यकर्ते व गाव पातळीवरील शेतकरी, शेतमजूर, महिला भगिनी यांनी मोठ्या संख्येने या पदयात्रेत सहभागी व्हावे.**
>
> **-सुधीर जवादे,**
> **विदर्भ सरचिटणीस,**
> **महाराष्ट्र सरपंच संघटना.**

## भांब राजा येथे गुरुपौर्णिमेला उसळला भक्तीचा महासागर

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी

**आर्णी, दि. १३ :** भगवंत अध्यात्म अनुसंधान शक्तीपिठ, भांब (राजा) येथे, गुरुपौर्णिमेनिमित्त आयोजित 'तीन तप पूर्ती' (३६ वर्षे) सोहळा, हजारो भाविकांच्या उपस्थितीत मोठ्या उत्साहात आणि भक्तिमय वातावरणात संपन्न झाला. सद्गुरू भगवंत माऊलींच्या समाधी स्थळी आयोजित या कार्यक्रमात, साक्षी भगवंत विनोद आक्कावार यांच्या अमृतमय नामसंकीर्तनाने संपूर्ण परिसर मंत्रमुग्ध झाला होता.

गुरुवारी, १० जुलै रोजी गुरुपौर्णिमेच्या दिवशी, या विशेष सोहळ्याला सकाळपासूनच भाविकांनी गर्दी केली होती. कार्यक्रमाची सुरुवात समाधी मंदिरातील अभिषेक पूजेने झाली. यानंतर, साक्षी भगवंत विनोद आक्कावार यांनी आपल्या कीर्तनातून उपस्थितांना मंत्रमुग्ध केले. गेल्या ३६ वर्षांपासून अखंडपणे ज्ञानदानाचे निःस्वार्थ कार्य करणाऱ्या साक्षी भगवंतांचा, दुघोरा येथील साधक परिवाराच्यावतीने कृतज्ञतापूर्वक सन्मानचिन्ह देऊन सत्कार करण्यात आला. याचवेळी, हजारो लोकांना वनौषधींच्या माध्यमातून निःशुल्क रोगमुक्त करणाऱ्या सिद्धाचार्य वाघ गुरुजी यांचाही, त्यांच्या सेवापूर्तीबद्दल विशेष सन्मान करण्यात आला. सद्गुरू साक्षी भगवंत माऊलींच्या गादीला तीन तप पूर्ण झाल्याने, यावर्षीच्या गुरुपौर्णिमेच्या उत्सवात एक विशेष चैतन्य निर्माण झाले होते. या सोहळ्याला यवतमाळ, नागपूर, भंडारा आणि वाशिम या जिल्ह्यांसह, राज्याच्या विविध भागांतून साधक आणि भक्तगण मोठ्या संख्येने उपस्थित होते. नामसंकीर्तनानंतर महाप्रसादाने कार्यक्रमाची सांगता झाली. या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी, शक्तीपिठ संस्थानचे अध्यक्ष आणि कार्यकारी मंडळाने विशेष परिश्रम घेतले.

# एकीकडे सुसज्ज पूल, दुसरीकडे 'माणूसमाऱ्या' पुलाचा धोका

## प्रशासनाला सवाल, दाभा रस्त्यावर पूल झाल्याने आनंद, आरंभी-चिरकुटा पुलाची उंची वाढविण्याची मागणी

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी

✦ जय राठोड



**दिग्रस, दि. १३ :** तालुक्यातील आरंभी-दाभा रस्त्यावर, स्वातंत्र्यानंतर प्रथमच नवीन आणि सुसज्ज पूल बांधण्यात आल्याने ग्रामस्थांमध्ये आनंदाचे वातावरण आहे. मात्र, दुसरीकडे जवळच्याच चिरकुटा रस्त्यावरील कमी उंचीचा 'माणूसमाऱ्या' पूल आजही मृत्यूचा सापळा बनून उभा आहे. या पुलाचे बांधकाम करणे देखील आवश्यक असल्याचे ग्रामस्थांचे म्हणणे आहे.

आरंभी-दाभा रस्त्यावर पूर्वी पूल नसल्याने, नागरिकांना आणि शेतकऱ्यांना वर्षानुवर्षे नाल्यातूनच जीवघेणा प्रवास करावा लागत होता. मात्र, आता येथे पूल आणि डांबरी रस्ता तयार झाल्याने, दोन्ही गावांतील नागरिकांनी सुटकेचा निःश्वास सोडला आहे. पण, याच आनंदासोबत त्यांची मागणी आहे. आरंभी-चिरकुटा मार्गावरील नाल्याच्या पुलाची उंची अत्यंत कमी असल्याने, थोडासा पाऊस पडला तरी तो पाण्याखाली जातो आणि वाहतूक पूर्णपणे ठप्प होते. चार वर्षांपूर्वी, याच पुलावरून वाहून गेल्याने आरंभी येथील माय-लेकींचा दुर्दैवी मृत्यू झाला होता. गतवर्षीही एका तरुणाचा जीव थोडक्यात वाचला. एवढ्या मोठ्या घटना घडूनही, प्रशासन या समस्येकडे गांभीर्याने पाहत नाहीत. ज्या तीव्रतेने दाभा रस्त्यावरील पूल तयार झाला, त्याच धर्तीवर या जीवघेण्या पुलाची उंचीही तातडीने वाढवण्यात यावी, अशी मागणी आता जोर धरू लागली आहे. याकडे जिल्हा प्रशासन व लोकप्रतिनिधींनी लक्ष द्यावे, अशी मागणी नागरिकांकडून केली जात आहे.

**स्वातंत्र्यानंतरचा पूल**

**आरंभी आणि दाभा या गावांना जोडणाऱ्या रस्त्यावर, देशाच्या स्वातंत्र्यापासून पूलच नव्हता. नागरिकांना आणि शेतकऱ्यांना अक्षरशः नाल्याच्या पाण्यातूनच ये-जा करावी लागत होती. पावसाळ्यात तर अनेक दिवस संपर्क तुटायचा. मात्र, आता या नाल्यावर नवीन पूल आणि रस्त्याचे डांबरीकरण झाल्याने, दोन्ही गावांतील ग्रामस्थांनी आणि शेतकऱ्यांनी समाधान व्यक्त केले आहे.**

**माय-लेकींचा बळी विसरलात का?**

**चार वर्षांपूर्वी, जुलै महिन्यात आरंभी येथील माय-लेकी याच पुलावरून प्रवास करताना, पाण्याच्या प्रवाहात वाहून गेल्या होत्या. त्यांचा दुर्दैवी मृत्यू आजही ग्रामस्थांच्या मनात ताजा आहे. गतवर्षीही एका तरुणाचा जीव थोडक्यात वाचला. एवढ्या मोठ्या घटना घडूनही, या समस्येकडे जिल्हा प्रशासन गांभीर्याने पाहत नसल्याने, 'आणखी किती बळी घेणार?' असा संतप्त सवाल ग्रामस्थ विचारत आहेत.**

# पोटगव्हाणच्या लेकीची 'सिडनी'पर्यंत गगनभरारी; १.६० कोटींची शिष्यवृत्ती

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी

✦ कैलास कोडापे

**राळेगाव, दि.१३: एकेकाळी, 'लायकी नसताना मुलीला मोठ्या शाळेत का शिकवता?' असा अपमानजनक टोमणा तहसीलदारांकडून सहन करणाऱ्या एका सामान्य शेतकरी कुटुंबातील मुलीने, आज आपल्या कर्तृत्वाने थेट ऑस्ट्रेलियातील सिडनी विद्यापीठापर्यंत गगनभरारी घेतली आहे. कळंब तालुक्यातील पोटगव्हाण येथील भूमिका नरेश गायकवाड हिने एक कोटी ६० लाख रुपयांची 'नॅशनल ओव्हरसीज' शिष्यवृत्ती मिळवून, संघर्षावर मात करीत यशाला गवसणी कशी घालायची, याचा एक आदर्श घालून दिला आहे.**

### संकटावर पाय देऊन अस्तित्व निर्माण करा



**भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना आपला आदर्श मानणारी भूमिका, आजच्या तरुणाईला एक महत्त्वाचा संदेश देते. ती म्हणते, 'येणाऱ्या संकटांवर रडत बसण्यापेक्षा, त्याच संकटांवर पाय देऊन आपले नवीन अस्तित्व निर्माण करता येते.' तिचा हा आत्मविश्वास आणि दृढ निश्चय, अनेक ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांसाठी आणि विशेषतः मुलींसाठी एक मोठे प्रेरणास्थान ठरला आहे.**

> **'अत्यंत प्रतिकूल परिस्थितीतून शिक्षण घेत भूमिकाने नेहमीच शैक्षणिक प्रावीण्य टिकवून ठेवले. तिचे हे यश कौतुकास्पदच आहे. मुलींनी ध्येय निश्चित करून जिद्दीने प्रयत्न केले, तर आकाशालाही गवसणी घालता येते, हे भूमिकाने सिद्ध करून दाखविले आहे.'**
>
> **-संजय मोरे,**
> **सरपंच, पोटगव्हाण ता. कळंब जि. यवतमाळ.**

पोटगव्हाण येथील एका सामान्य शेतकरी कुटुंबात जन्मलेल्या भूमिकेचा प्रवास अत्यंत खडतर होता. मुलीला चांगले शिक्षण मिळावे, म्हणून तिच्या वडिलांनी गाव सोडून वर्धा गाठले. मात्र, सलग तीन वर्षे दुष्काळामुळे, त्यांना भूमिकेची शाळेची फी भरणेही शक्य झाले नाही. त्यावेळी, शासकीय मदतीसाठी ते कळंबच्या तहसीलदारांकडे गेले असता, त्यांना मदत करण्याऐवजी हिणवण्यात आले. अशा कठीण काळात, पोटगव्हाणचे सरपंच संजय मोरे आणि शेतकरी नेते किशोर तिवारी हे तिच्यासाठी धावून आले. किशोर तिवारी यांनी सलग तीन वर्षे भूमिकेची फी भरून तिचे शिक्षण सुरू ठेवले. या मदतीच्या जोरावर, भूमिकेने मागे वळून पाहिले नाही. तिने दहावी आणि बारावीत उत्तम गुण मिळवून, 'जेईई' परीक्षेतही यश मिळविले आणि नागपूरच्या जे.डी. कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगमध्ये प्रवेश घेतला. विशेष म्हणजे, कोणत्याही शिकवणीशिवाय, केवळ यूट्यूबवर अभ्यास करून, तिने 'आयईएलटीएस' ही परीक्षा उत्तीर्ण केली आणि सिडनी विद्यापीठात प्रवेश मिळविला. ती आता 'कॉमर्स एक्सटेन्शन अँड ग्लोबल लॉजिस्टिक्स' या विषयात संशोधन करणार आहे. नॅशनल ओव्हरसीज स्कॉलरशिप अंतर्गत एक करोड ६० लाख रुपयाची स्कॉलरशिप घेणारी भूमिका ही जिल्ह्यातील पहिली विद्यार्थिनी आहे. ती आपल्या यशाचे श्रेय आईवडील, शिक्षक आणि नालंदा ॲकॅडमीचे कपिल वानखेडे यांना देते.

## थोडक्यात

### विनाकारण वाहन अडवून शिवीगाळ

**आर्णी :** येथे रहदारीच्या रस्त्याच्या वादातून एका व्यक्तीचे वाहन अडवून त्याला शिवीगाळ केल्याची घटना घडली. याप्रकरणी पोलिसांनी एकावर गुन्हा दाखल केला असून, पुढील तपास सुरू केला आहे. निलेश शामसुंदर चिंतावार यांनी याप्रकरणी पोलिसांत तक्रार दिली. तक्रारीनुसार, आरोपी रामचंद्र डोमाजी राठोड हा रहदारीच्या रस्त्याच्या कारणावरून त्यांच्यासोबत नेहमी वाद घालतो आणि वाहन अडवतो. त्याला समजावून सांगण्याचा प्रयत्न केला असता, तो शिवीगाळ करतो. या त्रासाला कंटाळून निलेश यांनी अखेर पोलिसांत धाव घेतली. त्यांच्या तक्रारीच्या आधारे आर्णी पोलिसांनी रामचंद्र राठोड याच्याविरुद्ध गुन्हा नोंदविला आहे. पोलिस याप्रकरणी अधिक चौकशी करत आहेत.

### शारदा चौकातून वाहन चोरीस

**यवतमाळ :** शहरातील शारदा चौकातून एका व्यक्तीची लुना गाडी आणि इतर साहित्य चोरीला गेल्याची घटना घडली आहे. यात एकूण ३९ हजार ३०० रुपयांचा मुद्देमाल लंपास झाला आहे. याप्रकरणी काशिनाथ कोडापे (रा. लोणी घाटाणा) यांनी पोलिसांत तक्रार दिली. तक्रारीनुसार, अज्ञात चोरट्याने त्यांची टीव्हीएस लुना, मोबाईल, तणनाशक, विजेचे बोर्ड, बूट आणि घड्याळ असा एकूण ३९,३०० रुपयांचा ऐवज चोरून नेला. त्यांनी आपले साहित्य आणि लुना शारदा चौकात ठेवले होते. काही वेळानंतर परत आले असता, त्यांना ते जागेवर दिसले नाही. या तक्रारीवरून शहर पोलिसांनी अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा नोंदवला असून, त्याचा शोध सुरू केला आहे.

### एकास दगडाने मारहाण

**पुसद :** दारू पिण्यासाठी पैसे मागितल्याची माहिती आईला का दिली, या कारणावरून एका युवकाने मित्राच्या डोक्यावर दगडाने हल्ला करून त्याला जखमी केले. ही घटना पुसद येथे घडली असून, याप्रकरणी पोलिसांनी आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. शंतनु साहेबराव राऊत यांनी याप्रकरणी पोलिसांत तक्रार दिली. तक्रारीनुसार, आरोपी अप्पू विनोद कांबळे याने दारू पिण्यासाठी पैसे मागितल्याची बाब शंतनुने त्याच्या आईला सांगितली. याचा राग मनात धरून अप्पूने शंतनुसोबत वाद घालून त्याला शिवीगाळ केली. त्यानंतर त्याने दगडाने शंतनुच्या डोक्यावर मारून त्याला जखमी केले. या तक्रारीवरून पुसद शहर पोलिसांनी अप्पू कांबळे याच्याविरुद्ध गुन्हा नोंदवला असून, पुढील तपास सुरू केला आहे.

# शेतकरी बापाला जिवंत ठेवण्यासाठीच हा लढा!

## बच्चू कडू : '७/१२ कोरा करा' यात्रेचा आज समारोप

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी

उमेश इंगोले/विनोद कोपरकर

- **आंदोलनाला अभूतपूर्व प्रतिसाद**
- **राज्यभरातून येणार शेतकरी**
- **आंदोलकांनी केली शेतात उतरून मदत**
- **दिव्यांग बांधवही मोठ्या संख्येत सहभागी**

**महागाव, दि.१३:** 'शेतकऱ्याला लुटणारी ही व्यवस्थाच बदलली पाहिजे,' असा घणाघात करीत, 'प्रहार'चे संस्थापक बच्चू कडू यांनी आज, रविवारी, दि. १३ जुलै रोजी हजारो शेतकऱ्यांसह डोळ्यांवर काळ्या पट्ट्या बांधून पदयात्रा केली. त्यांच्या '७/१२ कोरा करा' यात्रेचा उद्या, सोमवारी (दि. १४) समारोप होत आहे. या आंदोलनाला आता राज्यव्यापी स्वरूप प्राप्त झाले आहे. यात, हजारो दिव्यांग बांधवही सहभागी झाले असून, उद्या तालुक्यातील अंबोडा येथे जाहीर सभेला लाखोंचा जनसागर उसळण्याची शक्यता वर्तविली जात आहे.

'७/१२ कोरा करा'या पदयात्रेचा आज, रविवारी सातवा दिवस होता. ही यात्रा काळी (दौ.) वरून सकाळीच निघाली असून वाटेतील गुंज येथे सभा घेतली. यावेळी बोलताना बच्चू कडू म्हणाले की, 'शेतकरी बापाला जिवंत ठेवण्यासाठीच हा लढा आहे. शेतकऱ्यांचे शोषण करणारी यंत्रणाचं बदलली पाहिजे.' सरकारने शेतकऱ्यांच्या प्रश्नांकडे डोळेझाक केली असल्याचेही ते म्हणाले. याचा निषेध करण्यासाठी, बच्चू कडू आणि आंदोलकांनी डोळ्यांवर काळ्या पट्ट्या बांधून आणि हातात विळे घेऊन, महाराष्ट्रातील पहिले शेतकरी शहीद साहेबराव करपे यांच्या स्मृतीला अभिवादन करण्यासाठी त्यांच्या जन्मगावी चिलगव्हाणच्या दिशेने कूच केले. पदयात्रेदरम्यान, वाटेत एका शेतकरी जोडप्याला शेतात निंदण करताना पाहून, सर्व आंदोलकांनी थेट शेतात उतरून त्यांचे संपूर्ण शेत निंदून दिले. या घटनेने आंदोलनातील सामाजिक बांधिलकीचे दर्शन घडले. यावेळी बोलताना बच्चू कडू म्हणाले, 'ही प्रस्थापित व्यवस्था शेतकऱ्याला मारणारी आणि ठेकेदाराला तारणारी आहे.' 'शेतकरी आत्महत्या हे सरकारचे पाप आहे.' 'ज्या भगिनीचे कुंकू पुसले गेले आहे, तिचा लढा आता माझा लढा आहे,' असे भावनिक उद्गार त्यांनी काढले. या आंदोलनाला आता राज्यभरातून पाठिंबा मिळत असून, उद्या आंबोडा येथे होणाऱ्या समारोपीय सभेकडे संपूर्ण राज्याचे लक्ष लागले आहे.



### शेतकरी-शहीद साहेबराव करपेंच्या भूमीत समारोप

**या यात्रेचा समारोप चिलगव्हाण येथे, राज्यातील पहिले शेतकरी-शहीद साहेबराव करपे यांच्या स्मृतीला अभिवादन करून होणार आहे. १९८६मध्ये, शासकीय धोरणे आणि कर्जबाजारीपणाला कंटाळून, करपे यांनी कुटुंबासह आत्महत्या केली होती. त्यांच्या याच कर्मभूमित, 'आणखी साहेबराव करपे होऊ देणार नाही,' असा निर्धार करून, ही यात्रा सरकारला जाब विचारणार आहे. त्यामुळे, या समारोपाकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.**





### आंदोलनाला शिवसेना, मनसेसह अनेकांचा पाठिंबा

**या आंदोलनाला शिवसेना (उबाठा) पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी पाठिंबा जाहीर केला आहे. तसेच मनसेचे बाळा नांदगावकर यांनी प्रत्यक्ष सहभागी होऊन पाठिंबा दिला आहे. तसेच छावा संघटना, महाराष्ट्र राज्य सरपंच संघटनेसह अनेकांनी पाठिंबा दिला आहे. उद्याच्या सभेच्या सुरुवातीला सप्त खंजीरीवादक सत्यपाल महाराज यांचे प्रबोधनपर कीर्तन होणार आहे. तसेच सभेला आमदार भास्कर जाधव, आमदार रोहित आर. पाटील यांचीही उपस्थिती राहणार आहे.**

## बाभूळगाव तालुक्यात राजकीय भूकंप...

# विविध पक्षांतील कार्यकर्त्यांना पालकमंत्र्यांनी बांधले शिवबंधन

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी



**बाभूळगाव, दि.१३:** आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर, बाभूळगाव तालुक्यातील विविध पक्षांच्या सुमारे ४० प्रमुख कार्यकर्त्यांनी आणि पदाधिकाऱ्यांनी शिवसेनेत प्रवेश केला आहे. राज्याचे मृद व जलसंधारण मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री संजय राठोड यांच्या उपस्थितीत, शनिवारी (दि.१३) यवतमाळ येथील विश्रामगृहात हा पक्षप्रवेश सोहळा पार पडला.

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या आदेशानुसार, ग्रामीण स्तरावर पक्षबांधणी मजबूत करण्याच्या अभियानांतर्गत, उपजिल्हाप्रमुख सचिन महल्ले यांच्या नेतृत्वावर विश्वास ठेवून, काँग्रेस, भाजप, राष्ट्रवादी काँग्रेस आणि शिवसेना (उबाठा) या पक्षांतील कार्यकर्त्यांनी हा प्रवेश केला. यावेळी संपर्कप्रमुख हरिहर लिंगनवार, सहसंपर्क प्रमुख श्रीधर मोहोड, जिल्हाप्रमुख गजानन डोमाळे, पराग पिंगळे, उपजिल्हाप्रमुख सचिन महल्ले आणि राजेंद्र पांडे हे प्रमुख पदाधिकारी उपस्थित होते. बाजार समितीचे संचालक डॉ. बबन बोंबले यांचेसह गवंडीचे सरपंच सुधीर कडूकार, सारंग दातारकर, उपसरपंच प्रवीण चेंडकापूरे, गणेश येळणे, विक्रम चौधरी, दीपक कराळे, चंद्रशेखर अलोणे, संतोष भाकरे, अनिकेत चौधरी, उमाकांत येंडे, गजानन येलेकार, राहुल ओकटे, जय मांगुळकर, पवन चरडे, अमन इंगोले, अक्षय शेळके, अरविंद कावरे, प्रवीण ढगे, गोवर्धन कुदमेथे, अरुण डोंगरे, अनिस्खा पठाण, शैलेश गावंडे, राजू राऊत, प्रसाद गहिरे, अक्षय चांदेकर, अजय शिंदे, प्रणीत वंजारी, सचिन राजूरकर, दिनेश मोरे, राजू डेबुर, विनोद मेघरे, रमेश लांजेकर, मोरेश्वर बोंबले, गजानन कंगाले, शुभम साखरकर, प्रणय कडूकार, पंकज ढाले, चंदू वंडले, विठ्ठल चौधरी यांचेसह सुमारे चाळीस कार्यकर्त्यांनी शिवसेना पक्षाचे शिवबंधन बांधले.

# उमरसरा परिसरात दूषित पाणीपुरवठा

## नागरिकांचे आरोग्य धोक्यात

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी



**यवतमाळ, दि.१३:** यवतमाळ शहरातील उमरसरा (प्रभाग क्रमांक २२) परिसरात, गेल्या वर्षभरापासून महाराष्ट्र जीवन प्राधिकरणातर्फे दूषित आणि दुर्गंधीयुक्त पाणीपुरवठा होत आहे. परिणामी, नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले आहे. याप्रकरणी, तातडीने कारवाई करीत स्वच्छ पाणीपुरवठा करावा आणि पाणीपुरवठ्याचे वेळापत्रक सुधारावे, अशी जोरदार मागणी प्रदीप नसकरी आणि किशोर वानखेडे यांनी निवेदनाद्वारे केली आहे.

हे निवेदन महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या उपमुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांना देण्यात आले आहे. यानुसार, उमरसरा, वसंत ले-आउट, गुरुमाऊली सोसायटी, संकट मोचन परिसर आणि आनंद नगर यांसह इतर अनेक वस्त्यांमध्ये दूषित पाणीपुरवठा होत आहे. या दूषित पाण्यामुळे परिसरातील नागरिकांमध्ये, विशेषतः लहान मुले आणि वृद्धांमध्ये, सर्दी, खोकला, डोकेदुखी, घशाचे आजार आणि पोटदुखी यांसारख्या आजारांचे प्रमाण वाढले आहे. यामुळे, नागरिकांमध्ये प्रशासनाच्या कारभाराविरोधात तीव्र असंतोष पसरला आहे. याशिवाय, रात्रीच्या वेळी होणाऱ्या पाणीपुरवठ्याचे वेळापत्रकही अत्यंत अनियमित असल्याचा आरोप नागरिकांनी केला आहे.

### चाकूहल्ल्यात तरुण जखमी

**यवतमाळ, दि. १३ :** 'माझ्या परिसरात का आला' असे म्हणत, दारूच्या नशेत असलेल्या एका व्यक्तीने तरुणाच्या पोटावर चाकूने वार करून त्याला जखमी केले. ही घटना यवतमाळ शहरातील बांगरनगर येथे घडली. याप्रकरणी रितेश प्रकाशराव गावंडे यांनी पोलिसांत तक्रार दिली. ते मित्र यश विनोद बांगरे याच्यासोबत गणेशमूर्ती बनविण्यासाठी गेले होते. त्यावेळी आरोपी अमोल नारनवरे याने दारूच्या नशेत त्यांच्याशी विनाकारण वाद घातला. 'माझ्या एरियात का आला' असे महणत त्याने यशच्या पोटात चाकूने वार केले. या तक्रारीवरून शहर पोलिसांनी अमोल नारनवरे याच्याविरुद्ध गुन्हा नोंदविला असून, पुढील तपास सुरू केला आहे. गेल्या काही दिवसांपासून शहरात शरीर दुखापतींच्या घटनांमध्ये कमालीची वाढ झाली आहे. त्यामुळे याकडे लक्ष देण्याची गरज निर्माण झाली आहे.

# बेरोजगारांच्या खात्यांमध्ये कोट्यवधींची उलाढाल

## मामा-भाच्यावर गुन्हे दाखल; 'रोजगार हमी'च्या नावाखाली मजुरांची फसवणूक

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी

**यवतमाळ, दि.१३:** 'रोजगार हमी योजनेचा लाभ देण्याच्या नावाखाली, बेरोजगार तरुणांची बँक खाती उघडून, त्यात कोट्यवधी रुपयांची अफरातफर केल्याप्रकरणी, पांढरकवडा येथे मामा-भाच्यावर गुन्हे दाखल झाले आहेत. हा पैसा क्रिकेट सट्ट्याचा असून काळा पैसा पांढरा करण्यासाठी वापरल्याचा संशय आहे. गुन्हा दाखल होताच मामा-भाचे दोघेही आरोपी फरार झाले आहेत. या मोठ्या प्रकरणाचा तपास आता यवतमाळच्या स्थानिक गुन्हेशाखेकडे (एलसीबी) देण्यात आला आहे.

पांढरकवडा तालुक्यातील चोपण, वाघोली, वसंतनगर यांसारख्या गावांमधील सुशिक्षित बेरोजगार तरुणांना, संशयित आरोपी मयूर राजेश चव्हाण (वय २३, रा. चोपण) आणि त्याचा मामा मनोहर राठोड (वय ४५, रा. जरंग, ता. घाटंजी) यांनी रोजगार हमी योजनेचे आमिष दाखवले. त्यांच्याकडून आधार कार्ड, पॅन कार्ड यांसारखी कागदपत्रे घेऊन, बँक ऑफ महाराष्ट्र शाखेत त्यांची खाती उघडण्यात आली. त्यानंतर, मार्च ते जून या तीन महिन्यांच्या काळात, या खात्यांमधून दररोज लाखो रुपयांचे व्यवहार करण्यात आले. एका प्राथमिक तपासात, केवळ १५ खात्यांमधून तब्बल ७ कोटी ५३ लाख रुपयांची उलाढाल झाल्याचे समोर आले आहे. या प्रकरणी गुन्हा दाखल होताच, तो तपासासाठी स्थानिक गुन्हेशाखेकडे वर्ग करण्यात आला आहे. स्थानिक गुन्हे शाखेचे पोलिस निरीक्षक सतीश चवरे यांनी या प्रकरणासाठी एक स्वतंत्र पथक नेमले आहे. सहाय्यक पोलिस निरीक्षक दत्ता पेंढारकर तपास करत आहेत. पोलिसांनी बँकेकडे सर्व खात्यांची सविस्तर माहिती मागवली आहे. सायबर टीमकडून यूपीआय आणि इतर लिंक्सची तपासणी सुरू आहे. पोलिस अधीक्षक कुमार चिंता यांनी या प्रकरणाचा सखोल तपास करून, प्रत्येक संबंधिताचे जबाब नोंदविण्याचे आदेश दिले आहेत.

### गुन्हा दाखल होताच मामा-भाचे फरार

**या संपूर्ण रॅकेटमध्ये, मयूर राजेश चव्हाण (वय २३, रा. चोपण) आणि त्याचा मामा मनोहर राठोड (वय ४५, रा. जरंग) हे मुख्य आरोपी आहेत. त्यांनीच तरुणांना आमिष दाखवून त्यांची बँक खाती उघडली. त्यांच्याविरोधात पांढरकवडा पोलिस ठाण्यात फसवणुकीचा गुन्हा दाखल होताच, दोघेही फरार झाले आहेत. पोलिस आता त्यांच्या शोधासाठी पथके तयार करत आहेत.**

### या तरुणांच्या खात्यांचा झाला वापर

**या प्रकरणात स्थानिक गुन्हे शाखेने आतापर्यंत १५ तरुणांचे जबाब नोंदवले आहेत. ज्यांच्या खात्यांचा गैरवापर झाला त्यात वाघोली येथील श्रीधर चव्हाण, शुभम चव्हाण, किशोर राठोड, निकेश राठोड, तरुण कार्लावार आणि चोपण येथील विवेक जाधव, अमर वानखेडे, अभिषेक जाधव, सचिन चव्हाण, कृष्णा राठोड, ऋषिकेश जाधव, सुजित चव्हाण, किरण राठोड, प्रीतम राठोड आणि नरेश राठोड यांचा समावेश आहे.**

# मंगरूळ येथील बुद्धविहारात वर्षावास पर्वाला प्रारंभ

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी



**मंगरुळ, दि. १३ :** आषाढ पौर्णिमेचे औचित्य साधून, येथील बुद्ध विहारात वर्षावास पर्वाला भक्तिमय वातावरणात सुरुवात झाली. डॉ. बाबासाहेब आंबेडकर लिखित 'बुद्ध आणि त्यांचा धम्म' या ग्रंथाच्या वाचनाने या तीन महिन्यांच्या धम्म साधनेला प्रारंभ करण्यात आला.

कार्यक्रमाच्या सुरुवातीला सावित्रीबाई फुले महिला मंडळाने त्रिशरण आणि पंचशील प्रदान केले. त्यानंतर, वर्षावासाचे महत्व आणि बौद्ध धम्मात स्त्रियांचे योगदान यावर सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले. 'बौद्ध धम्म हा मानवी कल्याणाचा धम्म असून, त्याच्या आचरणाने मनुष्य दुःखमुक्तीच्या मार्गावर जातो,' असे प्रतिपादन यावेळी करण्यात आले. सिद्धार्थ गौतम बुद्धांचा जन्म, त्यांचे वैवाहिक आयुष्य आणि मानवी कल्याणासाठीची त्यांची भूमिका यावरही प्रकाश टाकण्यात आला. या वर्षावास काळात पुढील तीन महिने नियमित पठण आणि विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन केले जाणार आहे. या कार्यक्रमाला गावातील उपासक-उपासिका मोठ्या संख्येने उपस्थित होते.